अकोला । शनिवार
दि. १० मे २०२५
वर्ष : १९ अंक : ६९
पाने : ८ + ४

दैनिक **अजिंक्य भारत** बातम्यांचा गतिमान पाठलाग

www.ajinkyabharat.com | स्वागत मूल्य ३ रुपये




जडेजाने चेन्नई सुपर किंग्जसाठी रचला इतिहास
(पान ७ वर...)

## तापमान °C
विदर्भात आज

| जिल्हा | कमाल | किमान |
|---|---|---|
| अकोला | 39.2 | 25.7 |
| चंद्रपूर | 40.0 | 27.0 |
| ब्रम्हपूरी | 40.1 | 23.1 |
| अमरावती | 38.4 | 20.7 |
| वर्धा | 39.5 | 25.0 |
| नागपूर | 40.6 | 24.4 |
| यवतमाळ | 39.4 | 24.4 |
| गडचिरोली | 37.8 | 23.6 |
| वाशिम | 38.2 | 00.0 |
| भंडारा | 39.0 | 22.0 |
| गोंदिया | 37.7 | 23.2 |
| बुलढाणा | 36.2 | 22.4 |

## तोंडघशी पडलेल्या पाकिस्तानच्या कुरापती सुरुच!

# पाकिस्तानचे ड्रोन भारताने पाडले!

### ▌उरी सेक्टरमध्ये गोळीबार! ▌सांबा, उरी, अखनूर जैसलमेरमध्ये पूर्ण ब्लॅकआऊट

जम्मू, दि. ९ वृत्तसंस्था

**भारत आणि पाकिस्तानमध्ये युद्धाची परिस्थिती कायम आहे. आज पुन्हा एकदा पाकिस्तानने जम्मू-काश्मीरमधील उरी, तंगधार, केरन, मेंढर, नौगाम आणि पूंछ या सहा सेक्टरमध्ये गोळीबार सुरू केला. त्याच वेळी पंजाबमधील फिरोजपूरमध्ये क्षेपणास्त्र हल्ला करण्यात आला. तर दुसरीकडे, चंदीगड आणि अंबाला येथे हवाई हल्ल्याचा इशारा देण्यात आला आहे. पंजाबमधील फिरोजपूर आणि राजस्थानमधील जैसलमेरमध्ये संपूर्ण ब्लॅकआउट लागू करण्यात आला आहे. भारताने पाकिस्तानला चोख प्रत्युत्तर देत त्यांचे ४ ड्रोन पाडल्याचे समजत आहे.**



भारतानं दहशतवाद्यांवर केलेल्या एअर स्ट्राईकनंतर अर्थात ऑपरेशन सिंदूरनंतर पाकिस्तानकडून देखील भारतावर हल्ला करण्यात आला. मात्र, पाकिस्तानच्या हल्ल्याचा प्रयत्न फसलाय. पाकिस्ताननं पंजाब, जम्मू, राजस्थान, गुजरातमधील अनेक शहर टार्गेट केली होती. मात्र, पाकिस्तानचा हल्ला भारतानं हवेत उडवून लावला आहे. भारतानं पाकिस्तानच्या १५ मोठ्या शहरांवर जोरदार हल्ला केला. भारतानं हल्ल्यात रावळपिंडीमधील लष्करी अधिका-यांची तळं देखील उद्धवस्त केली आहेत.. तसंच लाहोर, कराचीमधील एअर डिफेन्स सिस्टिम देखील भारतानं खाक केली आहेत. त्यामुळे पाकिस्तानमधील अनेक शहरात आणीबाणी लागू करण्यात आलीय. भारताच्या -४००नं पाकिस्तानचे सर्व हल्ले परतवून लावले आहेत.

पहलगाम हल्ल्याचा बदला घेण्यासाठी भारतानं ऑपरेशन सिंदूर राबवलं. हवाई हल्ले करुन दहशतवाद्यांचे ९ तळ बेचिराख करण्यात आले. भारताच्या कारवाईनं चिडलेल्या पाकिस्ताननं दुसऱ्याच दिवशी भारताच्या १२ शहरांवर हवाई हल्ल्याचे प्रयत्न केले. पण एस-४०० हवाई सुरक्षा यंत्रणेनं सगळे हल्ले हाणून पाडले. यानंतर भारतानं पाकिस्तानी शहरांवर ड्रोनच्या माध्यमातून प्रतिहल्ला चढवला. या सगळ्या घडामोडींमुळे भारत आणि पाकिस्तानचे संबंध अतिशय ताणले गेलेले आहेत. अशा परिस्थितीत जम्मू काश्मिरमधील उरी सेक्टरमधील नियंत्रण रेषेवर पाकिस्तानने पुन्हा एकदा गोळीबार सुरू केला आहे. उखळी तोफांचा मारा सुरू आहे. गोळीबार आणि स्फोटांचे आवाज ऐकू येत आहेत. पूंछ मध्येही गोळीबार सुरू आहे. जम्मू विमानतळ परिसरात सायरनचे आवाज ऐकू आल्याचे सांगितले जात आहे.

सांबा, अखनूर, उरी सेक्टरमध्ये ब्लॅकआऊट केला गेला आहे. दरम्यान, राजस्थानातील जैसलमेर येथे खबरदारी म्हणून पूर्ण ब्लॅकआऊट करण्यात आला आहे. मध्यरात्रीच्या कारवाईनंतर, पाकिस्तानच्या छंब आणि सियालकोट सेक्टरमध्ये आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाली आहे. या दोन्ही ठिकाणच्या लोकांना घराबाहेर न पडण्याच्या (पान २ वर)

### मोदींची तिन्ही दलांच्या प्रमुखांसोबत बैठक

» **नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आज सशस्त्र दलाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेतली. सीमावर्ती भागातील परिस्थिती आणि शस्त्रसज्जतेचा आढावा यावर उच्चस्तरीय बैठकीत चर्चा झाली. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील तणाव वाढलेला असताना ही बैठक झाली आहे.पंतप्रधान मोदींच्या नेतृत्त्वात झालेल्या बैठकीला तिन्ही दलांच्या प्रमुखांसह सीडीएस हजर होते. या बैठकीत ऑपरेशन सिंदूरची प्रगती, सीमेवरील तणाव, भविष्यातील रणनीतीवर चर्चा झाली. सैन्याची तयारी, तातडीनं करण्याची कारवाई हे विषय बैठकीच्या केंद्रस्थानी होते. पाकिस्तानला सगळ्या आघाड्यांवर घेरण्याचा भारत सरकारचा प्रयत्न आहे. आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर पाकिस्तानची कोंडी करण्याचे प्रयत्न भारताकडून सुरु आहेत. त्या पार्श्वभूमीवर ही बैठक महत्त्वाची मानली जात आहे.

## थोडक्यात

### काश्मीरच्या रणभूमीत मुंबईचा जवान शहीद!



**मुंबई :** पाकिस्तानच्या कपटी कारवायांना उधळून लावताना भारतीय सैन्य दलाचे २ जवान शहीद झाले आहेत. त्यामध्ये, मुंबईतील रहिवाशी असलेले आणि मूळचे आंध्र प्रदेशचे असलेल्या मुरली नाईक यांना वीरमरण आले आहे. भारतीय सैन्याचे दुसरे जवान दिनेश शर्मा यांनाही पूँछ सेक्टरमध्ये पाकिस्तानशी लढताना वीरमरण प्राप्त झाले. गोळीबारात जखमी झाल्यानंतर शर्मा यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र, उपचारादरम्यान त्यांनी अखेरचा श्वास घेतला. देशासाठी लढता लढता ते शहीद झाले. घाटकोपरच्या झोपडपट्टीत वाढलेला, पण छातीत मातृभूमीची ज्वाळा असलेला मुरली नाईक अखेर देशासाठी शहीद झाला.

## पाकिस्तानकडून तुर्कीच्या ड्रोनने भारतावर हल्ला!

नवी दिल्ली, दि. ९ वृत्तसंस्था

भारत-पाकिस्तान सीमेवरील तणाव वाढला असून, पाकिस्तानने तुर्कीच्या असिसगार्ड सोंगार ड्रोनचा वापर करून भारतातील सैन्य तळ आणि धार्मिक स्थळांवर हल्ल्याचा प्रयत्न केला आहे. भारतीय सैन्याने हे हल्ले हाणून पाडत पाकिस्तानच्या कुटील योजनांचा पर्दाफाश केला. विदेश सचिव विक्रम मिस्री आणि कर्नल सोफिया कुरैशी यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, पाकिस्तान सैन्य ठिकाणांबरोबरच धार्मिक स्थळांनाही लक्ष्य करत आहे, जेणेकरून भारतात सांप्रदायिक तणाव पसरवता येईल.

**पाकिस्तानचे हवाई हल्ले आणि ड्रोन घुसखोरी :** कर्नल सोफिया कुरैशी यांनी सांगितले की, ७ आणि ८ मे च्या रात्री पाकिस्तानी लष्कराने भारताच्या पश्चिम सीमेवर अनेकदा हवाई क्षेत्राचे उल्लंघन केले. यावेळी ३६ ठिकाणी ३०० ते ४०० ड्रोनद्वारे घुसखोरीचा प्रयत्न झाला. या ड्रोनचा हेतू भारताच्या हवाई संरक्षण (पान २ वर)

### नागरी विमानांना धोका

» विंग कमांडर व्योमिका सिंह यांनी पाकिस्तानच्या बेजबाबदार वर्तनावर प्रकाश टाकला. त्यांनी सांगितले की, ७ मे रोजी रात्री ८:३० वाजता पाकिस्तानने भारतावर अयशस्वी ड्रोन आणि क्षेपणास्त्र हल्ला केला, तरीही त्याने आपले नागरी हवाई क्षेत्र बंद केले नाही. पाकिस्तान जाणीवपूर्वक नागरी विमानांचा ढाल म्हणून वापर करत आहे. त्यांना माहीत आहे की, भारताची हवाई संरक्षण यंत्रणा त्वरित प्रत्युत्तर देईल, तरीही ते नागरी विमानांना धोक्यात टाकत आहेत, असे सिंह म्हणाल्या. फ्लाइट रडार २४ च्या डेटानुसार, भारताने आपले हवाई क्षेत्र बंद केले असताना, कराची-लाहौर दरम्यान पाकिस्तानात नागरी उड्डाणे सुरू होती. भारतीय वायुसेनेने संयम दाखवत आंतरराष्ट्रीय नागरी उड्डाणांची सुरक्षा सुनिश्चित केली.






## स्वदेशी तंत्रज्ञान : भारताच्या 'आकाश' क्षेपणास्त्राने बजावली महत्त्वाची भूमिका!

नवी दिल्ली, दि. ९ वृत्तसंस्था

गुरुवारी भारतीय शहरांना लक्ष्य करून पाकिस्तानी ड्रोन हल्ले हाणून पाडण्यात स्वदेशी बनावटीच्या जमिनीवरून हवेत मारा करणाऱ्या 'आकाश' क्षेपणास्त्र हवाई संरक्षण यंत्रणेने महत्त्वाची भूमिका बजावली. ८ आणि ९ मे च्या मध्यंतरी रात्री, भारतीय सैन्याने जम्मू आणि काश्मीरमधील पश्चिम आघाडी आणि नियंत्रण रेषेवर पाकिस्तानने केलेले अनेक ड्रोन हल्ले यशस्वीरित्या उधळून लावले आणि त्यांना प्रत्युत्तर दिले. अशा प्रकारे आकाश क्षेपणास्त्राने आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. भारतीय लष्कर आणि हवाई दलाने पाकिस्तान सीमेवर क्षेपणास्त्र प्रणाली तैनात केली आहे. भारताने विकसित केलेल्या आकाश जमिनीवरून हवेत मारा करणाऱ्या क्षेपणास्त्र हवाई संरक्षण प्रणालीचा



वापर भारतीय सैन्य दलांनी भारतीय लक्ष्यांवर पाकिस्तानी हल्ले हाणून पाडण्यासाठी प्रभावीपणे केला आहे. भारतीय लष्कर आणि हवाई दल दोघांकडेही पाकिस्तान सीमेवर क्षेपणास्त्र प्रणाली आहेत. 'आकाश' हे संरक्षण संशोधन आणि विकास संघटनेने विकसित केले आहे. डीआरडीओने विकसित केलेली 'आकाश' ही मध्यम पल्ल्याची जमिनीवरून हवेत मारा करणारी क्षेपणास्त्र संरक्षण प्रणाली आहे. हे डीआरडीओने विकसित केले आहे आणि भारत डायनॅमिक्स लिमिटेडने निर्मित क्षेपणास्त्रे. (पान २ वर)

## मुख्यमंत्र्यांनी घेतला राज्यातील सुरक्षा, सज्ञतेचा आढावा

मुंबई, दि. ९ वृत्तसंस्था

भारत आणि पाकिस्तान यांच्या दरम्यान वाढत असलेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पोलिस आणि प्रशासकीय यंत्रणेकडून राज्यातील सुरक्षा आणि सज्जतेचा आढावा घेतला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यावेळी उपस्थित होते. मॉकड्रिल, ब्लॅकआऊट इत्यादी सर्वच बाबतीत समग्र आढावा घेताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी विविध दिशानिर्देश दिले. प्रभारी मुख्य सचिव राजेशकुमार, राज्याच्या पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला, मुंबई पोलिस आयुक्त देवेन भारती, मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी, नागरी सुरक्षाचे अतिरिक्त पोलिस महासंचालक प्रभातकुमार, गृहविभागाच्या (पान २ वर)

## पाकिस्तानचा गेम; 'सायलेंट किलर'ने बजावली महत्वाची भूमिका!

नागपूर, दि. ९ वृत्तसंस्था

मागच्या २ दिवसांपासून भारत आणि पाकिस्तानमध्ये मोठ्या प्रमाणात तणाव वाढला आहे. काही दिवसांपूर्वी जम्मू काश्मीरच्या पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा भारताने बदला घेतला आहे. भारताने पाकिस्तानातील ९ दहशतवादी ठिकाणांवर एअर स्ट्राईक केला. या हल्ल्यात १०० हून अधिक दहशतवाद्यांचा खात्मा करण्यात आला. यानंतर पाकिस्तानने काल रात्री भारतावर प्रतिहल्ला केला. भारतानेदेखील त्याला चोख प्रत्युत्तर दिले. यामध्ये नागपूरच्या सायलेंट किलरने मोलाची भूमिका बजावली.

पहलगाम हल्ल्याचा बदला घेण्यासाठी भारताने ऑपरेशन सिंदूर ही मोहिम राबवत पाकिस्तानातील दहशतवादी स्थळ उद्ध्वस्त केली



होती.त्यानंतर पाकिस्तान भारतावर प्रतिहल्ला करणार याची कल्पना भारतीय लष्कराला होती. त्यामुळे प्रत्येक राज्याच्या सीमाभागात भारताने पाकिस्तानला प्रतिउत्तर देण्यासाठी शस्त्रसाठा ठेवला होता. काल रात्री पाकिस्तानने भारतावर ड्रोनचा हल्ला केल्यानंतर नागपूरच्या सोलार निर्मित नागास्त्राचा वापर भारताने त्यांचे सगळे ड्रोन पाडले.

**नागास्त्र १ ची वैशिष्ट्ये :** नागास्त्र १ या स्वदेशी बनावटीच्या आत्मघाती ड्रोनची स्ट्राईक रेंज ३० किलोमीटर आहे. नागास्त्रचे वजन १२ किलो आहे.या ड्रोन दोन किलो दारूगोळा वाहून (पान २ वर)

# पाकिस्तानला धडकी भरवणाऱ्या '४००' क्षेपणास्त्राची कमाल!

नवी दिल्ली, दि. ९ वृत्तसंस्था

**भारताने सीमेपलीकडील दहशतवादी तळांवर केलेल्या जोरदार हवाई हल्ल्यांनंतर भारत-पाकिस्तानदरम्यान तणाव शिगेला पोहोचला आहे. ७- ८ मे २०२५ च्या रात्री पाकिस्तानने ड्रोन आणि मिसाइल्सद्वारे अवंतीपुरा, श्रीनगर, जम्मू, पठाणकोट, अमृतसर, कपूरथला, जालंधर, लुधियाना, आदमपुर, बठिंडा, चंदीगड, नल, फलौदी, उत्तरलाई आणि भुज या उत्तर आणि पश्चिम भारतातील सैन्य तळांवर हल्ल्याचा प्रयत्न केला. मात्र, भारताच्या S-400 (S-400 Missile) या क्षेपणास्त्राने सगळे हल्ले परतवून लावले.**



जगभरात S-400 या क्षेपणास्त्राचा मोठा बोलबाला आहे. कारण हवाई संरक्षणातील ते अतिशय शक्तीशाली क्षेपणास्त्र म्हणून ओळखलं जातं. शत्रूचा कुठल्याही प्रकारचा हवाई हल्ला नेस्तनाबूत करण्याची क्षमता यात आहे. यातील ४०० हा आकडा अंतर दर्शवितो. म्हणजेच ४०० किलोमीटर क्षेत्रावरील अंतरही ते भेदू शकते. युद्धस्थितीत हे क्षेपणास्त्र म्हणजे त्या देशासाठी हवाई कवचच आहे. शत्रूकडून कुठल्याही प्रकारचा म्हणजे विमान, क्षेपणास्त्र किंवा अन्य शस्त्र वापरण्यात आले तर ते निकामी करण्याची क्षमता S-400 मध्ये आहे. जमिनीवरुन हवेत मारा करणाऱ्या लांब पल्ल्याच्या S-400 ही जगातील सर्वात धोकादायक आणि प्रभावी क्षेपणास्त्र प्रणाली आहे. S-400 या क्षेपणास्त्रात अनेकविध उपकरणांचा, आयुधांचा समावेश आहे. ज्यात बहुउद्देशीय रडार, विमान विरोधी क्षेपणास्त्र, स्वयंचलित शोध यंत्रणा, लाँचर्स आणि महत्त्वाचे म्हणजे कमांड कंट्रोल सेंटरची उपलब्धता अशी सुसज्ज प्रणाली S-400 मध्ये आहे. युद्ध प्रसंगी अवघ्या पाच मिनिटांच्या आत ही सर्व प्रणाली तैनात करता येते आणि तिचा वापर करता येतो, हे तिचे वैशिष्ट्य आहे. एकाचवेळी तीन वेगवगळ्या प्रकारची मिसाइल डागण्याची क्षमता हे सुद्धा S-400 मध्ये (S-400 Missile) शक्य आहे. ४०० किलोमीटरवरील लक्ष्य निश्चित केले असले तरी त्या क्षेत्रातील सर्व प्रकारचे लक्ष्य भेदण्याची क्षमता यात आहे. एवढेच नाही तर लढाऊ विमाने, बॅलेस्टिक क्षेपणास्त्र किंवा क्रूझ क्षेपणास्त्र सुद्धा ते निकामी करु शकते. एकाचवेळी १०० लक्ष्यांचा माग काढणे आणि आकाशातील सर्व प्रकारच्या अस्त्रांना शोधणे S-400 ला जमते. सध्याच्या घडीला S-400 हे क्षेपणास्त्र भारत, रशिया, चीन, तुर्की या देशांकडे आहे. अमेरिकेचा दबाव झुगारून भारताने -४०० हे रशियाकडून खरेदी केले आहे. भारताकडेही हे क्षेपणास्त्र असल्याने चीनवरही त्याचा दबाव राहणार आहे.

अमेरिकेने देखील S-400 या क्षेपणास्त्राचा धसका घेतला आहे. याच क्षेपणास्त्राच्या तोडीची प्रणाली टर्मिनल हाय ॲल्टिट्यूड एरिया डिफेन्स सिस्टिम ही अमेरिकेने विकसित केली आहे. मात्र, त्यापेक्षा S-400 (S-400 Missile) ची परिणामकारकता अधिक आहे.

### कशी आहे -४०० ची संरचना?

» जमिनीवरुन हवेत मारा करणारे बलशाली क्षेपणास्त्र आणि एकाचवेळी ३६ वेळा मारा करण्याची क्षमता ही -४०० ची वैशिष्ट्ये आहेत. या क्षेपणास्त्रात १२ लाँचर आहेत. त्यामुळे एका लाँचरमधून एकावेळी तीन क्षेपणास्त्र डागता येतात. भगवान श्रीकृष्णाच्या शक्तिशाली सुदर्शन चक्राच्या धर्तीवर भारतीय हवाई दलाने याला 'सुदर्शन' असे नाव दिले आहे.




# पाकिस्तान नकाशावरपण राहणार नाही- एकनाथ शिंदे

मुंबई, दि. ९ वृत्तसंस्था

ऑपरेशन सिंदूर यशस्वी करत भारतीय लष्कराने पाकपुरस्कृत दहशतवादाचे कंबरडे मोडले. यानंतर खवळलेल्या पाकिस्तानने गुरूवारी रात्री जम्मू-काश्मीर, पंजाब आणि राजस्थानच्या सीमावर्ती भागात ड्रोन हल्ले करण्याचा प्रयत्न केला. मात्र भारतीय लष्कराने त्यालाही चोख प्रत्युत्तर देत पाकिस्तानी ड्रोन, क्षेपणास्त्र हाणून पाडले. या घडामोडीवर महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. नागपूर येथे माध्यमांशी बोलत असताना शिंदे यांनी पाकिस्तानची लायकी काढली. तसेच भारतावर हल्ला करण्याची त्यांची औकात नाही, असे म्हटले.



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, पाकिस्तानची भारतावर हल्ला करण्याची औकात नाही. ते प्रयत्न करत असले तरी ते अन्नाचे मोहताज आहेत. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून त्यांना धडा शिकवलाच आहे. पण तरीही ते भारताविरोधात काही करत असतील तर भारतीय लष्कर पाकिस्तानचे नाव मिटवून टाकतील. नकाशावरही पाकिस्तान दिसणार नाही. त्यांनी त्यांच्या लायकीत राहिले पाहिजे.

पाकिस्तानच्या तीन फायटर जेटना पाडण्यात आल्याची माहिती पत्रकाराने शिंदे यांना दिल्यानंतर ते म्हणाले की, हा तर फक्त ट्रेलर आहे. पाकिस्तानने जास्त हुशारी केल्यास त्यांना जशास तसे उत्तर मिळेल. आमच्या सैनिकांनी एकाही सामान्य नागरिकावर हल्ला केला नव्हता. आपल्या सैन्याने फक्त दहशतवादी तळ उध्वस्त केले. पण तरीही पाकिस्तान भारताविरोधात काही कारवाई करत असेल तर त्यांना हे महागात पडेल. पाकिस्तानला याची किंमत मोजावी लागेल, असेही एकनाथ शिंदे म्हणाले.

बुधवारी (७ मे) भारतीय लष्कराने ऑपरेशन सिंदूर राबविल्यानंतर पाकिस्तानकडून जम्मूच्या सीमेवरील गावांमध्ये बेछूट गोळीबार आणि तोफगोळ्यांचा मारा करण्यात आला. या हल्ल्यात १६ नागरिकांना प्राण गमवावे लागले. यानंतर गुरुवारी सायंकाळी पुन्हा एकदा पाकिस्तानकडून जम्मू, पंजाबच्या सीमाभागात ड्रोन हल्ले करण्यात आले.

तत्पूर्वी गुरुवारी (८ मे) सकाळी पाकिस्तानने श्रीनगर पासून ते गुजरातच्या भूजपर्यंत पसरलेल्या सीमेवरील भारतीय लष्कराच्या तळावर ड्रोन हल्ले करण्याचा प्रयत्न केला. भारताने या हल्ल्याला चोख प्रत्युत्तर देत सर्व ड्रोन निकामी केले. याशिवाय थेट लाहोर येथे असलेली डिफ `न्स रडार सिस्टिम उध्वस्त केली.

## पान 1 वरून...

### पाकिस्तानकडून तुर्कीच्या...

यंत्रणेची चाचणी घेणे आणि गुप्त माहिती गोळा करणे होता. भारतीय सैन्याने अनेक ड्रोन पाडले. तपासातून हे ड्रोन तुर्कीचे असिसगार्ड सोंगार असल्याचे समोर आले, जे हल्ले आणि पाळत ठेवण्यासाठी बनवलेले आहेत. पाकिस्तानने ड्रोनबरोबरच नियंत्रण रेषेवर (एलओसी) भारी शस्त्रास्त्रांनी गोळीबार केला. हा हल्ला भारताच्या सैन्य पायाभूत सुविधांना उद्ध्वस्त करण्याची सुनियोजित कट होता, असे कुरैशी म्हणाल्या. तरीही, भारताच्या एस-४०० क्षेपणास्त्र यंत्रणेसह एकीकृत हवाई संरक्षण यंत्रणेने हे हल्ले यशस्वीपणे परतवले.

धार्मिक स्थळांवर हल्ले आणि सांप्रदायिक डाव

विदेश सचिव विक्रम मिस्री यांनी पाकिस्तानच्या आणखी एका नापाक योजनेचा खुलासा केला. पाकिस्तानने ननकाना साहिब गुरुद्वारावर ड्रोन हल्ल्याचा खोटा दावा पसरवला, जेणेकरून भारतात सांप्रदायिक तणाव भडकवता येईल. पाकिस्तानने असा बिनबुडाचा आरोप केला की, भारतीय सैन्य आपल्याच शहरांना, जसे की अमृतसर, लक्ष्य करत आहे आणि त्याचे खापर पाकिस्तानवर फोडत आहे. ही त्यांची जुनी चाल आहे, असे मिस्री म्हणाले. पाकिस्तानने पूंछमधील एका गुरुद्वारावर हल्ला केला, ज्यात शीख समुदायातील तीन जणांचा मृत्यू झाला आणि अनेक जखमी झाले. या हल्ल्याला सांप्रदायिक रंग देण्याचा पाकिस्तानचा प्रयत्न होता. पाकिस्तानचा हा डाव भारतात सांप्रदायिक वैमनस्य पसरवण्याचा आहे, आणि तो अत्यंत निंदनीय आहे, असे मिस्री यांनी ठासून सांगितले.

करतारपूर साहिब कॉरिडॉर बंद

सध्याच्या असुरक्षित परिस्थितीमुळे करतारपूर साहिब कॉरिडॉरच्या सेवा तात्पुरत्या स्थगित करण्यात आल्या आहेत. शीख यात्रेकरूंच्या सुरक्षिततेसाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. पुढील आदेशापर्यंत सेवा बंद राहतील, असे विदेश सचिव मिस्री यांनी सांगितले.

भारताचे संयमित प्रत्युत्तर

भारतीय सैन्याने पाकिस्तानचे हल्ले हाणून पाडण्याबरोबरच संयमित प्रत्युत्तर दिले. भारताने इस्रायली हार्पी कामिकाझी ड्रोनचा वापर करून लाहौरमधील पाकिस्तानच्या हवाई संरक्षण यंत्रणेला निष्प्रभावी केले. तरीही, भारताने सैन्य ठिकाणांऐवजी फक्त दहशतवादी पायाभूत सुविधांना लक्ष्य केले, जेणेकरून तणाव आणखी वाढणार नाही. पाकिस्तानने पसरवलेल्या खोट्या बातम्या, जसे की भारताने पाच राफेल जेट्स गमावले, यांना भारताने तात्काळ खोडून काढले. प्रेस इन्फॉर्मेशन ब्युरो (पीआयबी) ने लोकांना केवळ सरकारी माहितीवर विश्वास ठेवण्याचे आणि खोट्या बातम्या पसरवण्यापासून दूर राहण्याचे आवाहन केले. या घटनेने पाकिस्तानच्या कायराना आणि बेजबाबदार वर्तनाचा आणखी एकदा खुलासा झाला आहे, तर भारताने संयम आणि शक्तीचे प्रदर्शन करत आपली सुरक्षा आणि एकता अबाधित ठेवली आहे.

### पाकिस्तानचा गेम; ...

नेण्यास सक्षम आहे. या ड्रोनची ४५०० मीटर इतक्या उंचावर उड्डाण करण्याची क्षमता आहे. या क्षमतेमुळे शत्रूच्या रडार यंत्रणांना ते शोधेणे कठीण जाते. या नव्या अस्त्रामुळे लष्कराची मारक क्षमता वाढली आहे. हे ड्रोन सोलार इंडस्ट्रीज नागपूरच्या इकॉनॉमिक्स एक्स्प्लोझिव्ह लिमिटेड युनिटने बनवले आहे. नागास्त्रचे वर्णन 'सायलेंट किलर' म्हणून केले जाते. या ड्रोनला आत्मघाती ड्रोन म्हणण्याचे कारण म्हणजे शत्रूचे कोणतेही वाहन आपल्या क्षेत्रात चाल करून आल्यास हे ड्रोन त्याच्यावर आदळते आणि स्वत:सह त्याचाही नाश करते.

### पाकिस्तानचे ड्रोन भारताने ..

सूचना देण्यात आल्या आहेत. सांबा येथे स्फोटांचे आवाज ऐकू आले कारण भारताच्या हवाई संरक्षण दलाने ब्लॅकआउट दरम्यान पाकिस्तानी ड्रोन रोखले. दरम्यान, जम्मूमध्ये पूर्ण ब्लॅकआउट लागू करण्यात आला. पाकिस्तानचा छांब सेक्टर जम्मूच्या अखनूर सेक्टरच्या विरुद्ध आहे आणि नियंत्रण रेषेवर आहे. त्याच वेळी, पाकिस्तानचा सियालकोट सेक्टर देखील अखनूर सेक्टरला लागून आहे आणि तो आंतरराष्ट्रीय सीमेवर येतो. गुरुवारी रात्री उशिरा पेशावरमध्ये एक शक्तिशाली स्फोट झाल्याची नोंद झाली, तर सीमेपलीकडून ड्रोन आणि क्षेपणास्त्र हल्ल्याच्या प्रयत्नांनंतर भारताने पाकिस्तानवर मोठा प्रत्युत्तरात्मक हल्ला केला. भारतीय क्षेपणास्त्रांनी लाहोर, सियालकोट आणि कराचीसह पाकिस्तानमधील महत्त्वाच्या ठिकाणांनाही लक्ष्य केले. बहावलनगर कॅन्टजवळही एक स्फोट झाला. बलुचिस्तान लिबरेशन आर्मी (बीएलए) ने बलुचिस्तानचा एक तृतीयांश भाग ताब्यात घेतल्याचा दावा केला आहे. वृत्तानुसार, अफगाणिस्तान आणि इराणच्या हद्दीला लागून असलेल्या पाकिस्तानी चौक्या सोडून सैन्य पळून गेले. याआधी, बलुचिस्तानची राजधानी क्वेट्टा येथील पाकिस्तानी लष्करी तळांवर अनेक हल्ले झाले होते. पाकिस्तानी लष्कराच्या फ्रंटियर कॉर्प्स मुख्यालयाला बंदूकधाऱ्यांनी लक्ष्य केले. गोळीबार झाला आणि त्यानंतर अनेक स्फोट झाले.

### मुख्यमंत्र्यांनी घेतला राज्यातील ...

प्रधान सचिव राधिका रस्तोगी, गुप्तवार्ता विभागाचे अतिरिक्त पोलिस महानिरीक्षक शिरीष जैन, मुंबई आणि मुंबई उपनगर जिल्हाधिकारी यावेळी उपस्थित होते.

राज्यातील महत्वाच्या पदांवर विशेषतः आरोग्य, आपत्ती व्यवस्थापन इत्यादी विभागांतील सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सुट्ट्या रद्द. प्रत्येक जिल्ह्यात मॉकड्रिल करा आणि जिल्हा स्तरावर वॉर रूम स्थापित करा. ब्लॅकआऊटवेळी हॉस्पिटलसोबत समन्वय यंत्रणा उभी करा. टार्गेट होऊ नये म्हणून लाईट बंद केले जातात, त्यामुळे पर्यायी विद्युत व्यवस्थेद्वारे यंत्रणा सुरू ठेवून, गडद रंगाचे पडदे अथवा गडद रंगाच्या काचा वापरून त्याचवेळी बाहेरून लाईट दिसणार नाही, अशी व्यवस्था करा. ब्लॅकआऊट म्हणजे काय आणि अशावेळी काय करावे, यांचे व्हिडिओ विद्यार्थी, नागरिकांपर्यंत पोहोचवा. व्यापक जनजागरण करा. केंद्र सरकारच्या 'युनियन वॉर बुक' चे सखोल अध्ययन करीत सर्वांना त्याची माहिती द्या. प्रत्येक जिल्ह्यात पोलिसांच्या सायबर सेलने समाजमाध्यमांवर देखरेख ठेवत पाकिस्तानला मदत करणारे हॅण्डल ओळखून त्यावर कारवाई करा. शत्रूला मदत करणारी अथवा चुकीची माहिती कुणी प्रसारित करीत असेल तर त्यावर कारवाई करा. प्रत्येक जिल्हाधिकारी यांना आपत्कालीन फंड आजच देणार, ज्यातून काही तातडीच्या साहित्याची खरेदी करायची असतील तर ती तत्काळ करता येईल. याव्यतिरिक्त कोणताही महत्वाचा प्रस्ताव यासंदर्भात आला तर तो १ तासात मंजूर करा. एमएमआर क्षेत्रातील सर्व महापालिकांची बैठक घ्या, त्यांनाही 'ब्लॅकआऊट' बाबत जागरूकता निर्माण करण्यास सांगा. यामध्ये सहकारी गृहनिर्माण संस्थांना सहभागी करून घ्या. पोलिस विभागाने नेहमीपेक्षा जास्त जागरूकता ठेवावी. देशद्रोही व्यक्तींच्या कारवाया वाढण्याची शक्यता पाहता अधिक कोंबिग ऑपरेशन करा आणि गस्त अधिक चोख करा. सैन्याच्या तयारी संबधित गतिविधीचे चित्रिकरण करणे आणि ते समाजमाध्यमांवर प्रसारित करणे हा गुन्हा आहे, त्यावर तत्काळ गुन्हे दाखल करा.

### स्वदेशी तंत्रज्ञान : भारताच्या...

'आकाश' क्षेपणास्त्र प्रणाली १८,००० मीटर उंचीवर ४५ किलोमीटर अंतरापर्यंत विमानांना लक्ष्य करू शकते. त्यात लढाऊ विमाने, क्रूझ क्षेपणास्त्रे आणि हवेतून जमिनीवर मारा करणारी क्षेपणास्त्रे तसेच बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे यांसारख्या हवाई लक्ष्यांना निष्प्रभ करण्याची क्षमता आहे. 'आकाश'ची सर्वात मोठी खासियत म्हणजे ती कुठेही वाहून नेता येते. ते ट्रक किंवा टँकसारख्या वाहनांद्वारे नियंत्रण रेषा किंवा इतर सीमा ओलांडून वाहून नेले जाऊ शकते. त्याची प्रगत आवृत्ती आकाश-एनजी ७० ते ८० किमी पर्यंत मारू शकते. त्याचा वेग अंदाजे २,५०० किमी/तास आहे. ते १५० किमी अंतरापर्यंत ६४ लक्ष्ये शोधू शकते. ते एकाच वेळी १२ क्षेपणास्त्रे डागू शकते. या क्षेपणास्त्रात एक स्मार्ट मार्गदर्शन प्रणाली आहे, जी शेवटच्या क्षणीही लक्ष्य निश्चित करण्यास मदत करते.

# जिल्हाधिकारी अजित कुंभार यांच्या हस्ते सुरेश पारवदे सन्मानित




दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. ९ :** राष्ट्रीय अंधत्व नियंत्रण सोसायटी, अकोला च्या वतीने १ मे २०२५ महाराष्ट्र दिनी जिल्हाधिकारी कार्यालय अकोला येथे जिल्हाधिकारी अजित कुंभार यांचे हस्ते शास्त्री नगर, अकोला येथील रहिवासी सुरेश केशवराव पारवदे ह्यांना सन्मानित करण्यात आले. त्यांना जिल्हाधिकारी यांच्या हस्ते सन्मान चिन्ह व सन्मान पत्र देण्यात आले.

सुरेश पारवदे यांच्या पत्नी सौ. माया पारवदे ह्या जिल्हा शासकीय रुग्णालयात गत ४० वर्ष नर्स म्हणून अविरत रुग्णसेवा करत असताना स्वतःच्या आरोग्याकडे त्यांचे दुर्लक्ष झाले. परिणामी त्यांच्या दोन्ही किडनी निकामी झाल्या. मरणाच्या गडद छायेत असताना त्यांचे पती सुरेश पारवदे ह्यांनी आपल्या जीवाची पर्वा न करता सौ माया पारवदे यांना आपली एक किडनी दान दिली. गेल्या १५ वर्षा पासून ते स्वतःची व एकमेकांची काळजी घेऊन निरोगी जीवन जगात आहेत. ह्या कार्य साठी त्यांना अकोला जिल्हाधिकारी ह्यांनी सन्मानित केले.

# छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई ते नागपूर एकेरी विशेष गाडी

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. ९ :** प्रवाश्यांची ग्रीष्मकालीन गर्दीची मागणी लक्षात घेऊन रेल्वे प्रशासनाने छ. शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई ते नागपूर दरम्यान एकेरी विशेष गाडी चालवण्याचा निर्णय घेतला आहे.



गाडी क्रमांक ०१०१७ विशेष दिनांक ०९.०५.२०२५ रोजी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथून ००.२० वाजता सुटेल आणि त्याच दिवशी नागपूर येथे १५.३० वाजता सुटेल. या गाडीला दादर, ठाणे, कल्याण, नासिक रोड, मनमाड, जळगांव, भुसावळ, मलकापूर, शेगांव, अकोला, मूर्तिजापूर, बडनेरा, धामणगांव आणि वर्धा असे थांबे असतील.या गाडीला एक वातानुकूलित प्रथम, एक वातानुकूलित प्रथम तथा द्वितीय, एक वातानुकूलित द्वितीय, ०५ वातानुकूलित तृतीय, १० शयनयान, ४ सामान्य द्वितीय आणि २ सामान्य द्वितीय श्रेणीसह गाड्र्स ब्रेक व्हॅन अशी रचना असेल.

# भाऊसाहेब पोटे विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची उंच भरारी

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोट, दि. ९ :** थानिक भाऊसाहेब पोटे विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उंच भरारी घेत निकालाची परंपरा कायम ठेवत महाविद्यालयाचा निकाल ९८.८७ लागला असून विज्ञान शाखेतून कु. सार्थकी देवानंद बुधवंत ८५.३३% या विद्यार्थिनी नें प्रथम क्र. पटकावला, दिप प्रवीण रहाटे ८४.३३% द्वितीय तर कु. कोमल चंद्रकांत कोल्हे ८०% गुण घेऊन तृतीय आली.कला या शाखेचां निकाल ९६.८७% लागला असून यामध्ये प्रथम कु. हर्षा सुरेश व्यवहारे ८७.८३% द्वितीय कु. प्रतीक्षा सुनिल वानखडे ८७.३३% तर तृतीय कु. ऋतुजा गोपाल नहाटे ८० टक्के गुण घेतले आहेत. राज्यस्तरीय भूगोल प्रज्ञाशोध परीक्षेमध्ये राज्यातून प्रथम श्रेयस संगमेश्वर महल्ले वर्ग ७ वा अ याने १०० पैकी १०० गुण घेऊन प्रथम आला द्वितीय येणारा विद्यार्थी सोहम गोपाल इंगळे तर कनिष्ठ महाविद्यालय विभागातून प्रथम येणारी विद्यार्थिनी कु. समीक्षा पांडुरंग कळसकार हिने हा सन्मान मिळविला.या सर्व विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा संस्थेच्या वतीने व शालेय प्रशासनाच्या वतीने स्मृतीचिन्ह व सन्मानपत्र देऊन संस्थेच्या सचिव डॉ. मेघनाताई पोटे यांच्या हस्ते यथोचित सत्कार करण्यात आला. सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या विद्यार्थिनींना संस्थेचे कोषाध्यक्ष प्रवीण पोटे यांच्याकडून रोख रक्कम देऊन गौरविण्यात आले. शैक्षणिक सत्र २०२४ -२५ चा इयत्ता पाचवी ते अकरावी चा निकाल घोषित करण्यात आला वर्ग पाच ते सात चा निकाल कु. किरण इंगळे यांनी जाहीर केला वर्ग ८ वी. व नववीचा निकाल माननीय सुनीता गावंडे यांनी जाहीर केला तर इयत्ता अकरावी व एसएससीव्ही सि विभागाचा निकाल प्रा. विवेक पोटे व प्रा. प्रशांत सावळे यांनी जाहीर केला. कार्यक्रमाला प्राचार्य पि. बी. रावणकर , प्रा.एन.एम.भावे , प्रा. संदीप बोबडे , पर्यवेक्षक पी.एम. गावंडे,प्रा. विवेक पोटे व कार्यक्रमाच्या अध्यक्षा डॉ. मेघनाताई पोटे होत्या.कार्यक्रम यशस्वी होण्याकरता सर्व शिक्षक शिक्षिका प्राध्यापक प्राध्यापिका शिक्षकेतर कर्मचारी विभाग प्रमुख यांनी प्राचार्य पि.. बी. रावणकर यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वी झाला.कार्यक्रमाचे संचलन डॉ.किर्ती काळबांडे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. प्रशांत सावळे यांनी केले.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेज ऑफ जर्नालिझम भत्ता देणारे राज्यातील एकमेव महाविद्यालय

## प्रा. मुकूंद भारसाकळे यांची पत्रपरिषदेत माहिती

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. ९ :** प्रबोधन नगर, खडकी (अकोला) येथील ऐतिहासिक प्रतिष्ठान डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेज ऑफ जर्नालिझम अँड सोशल वर्क येथे समाजकार्य (बिएसड्ब्लू) व पत्रकारिता (बीजे) या अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. १२ वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी ही एक सुवर्णसंधी आहे. तसेच एमएजेएमसी (पत्रकारिता व जनसंवाद पदव्युतर पदवी) व नर्सिंग (आरएएनएम) या शिक्षणक्रमाचे सुद्धा प्रवेश सुरु आहेत. राज्यातील आमचे असे एकमेव महाविद्यालय आहे, जेथे विद्यार्थ्यांना प्रति माह ५०० रुपये उपस्थिती भत्ता दिला जातो. शिवाय शिष्यवृत्तीची सुविधा उपलब्ध आहे.

पत्रकारिता व समाजकार्य क्षेत्रात आपले करिअर घडवणाऱ्या होतकरू विद्यार्थ्यांनी प्रवेश घेण्याचे आवाहन डॉ. बाबासाहेब आंबेडकर बहुउद्देशीय उत्कर्ष प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष प्रा. मुकुंद भारसाकळे यांनी केले. महाविद्यालयाच्या पीपीटी सभागृहात गुरुवारी (ता.८) आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी प्रतिष्ठानच्या विविध उपक्रमांविषयी तसेच महाविद्यालयातील शिक्षणक्रमाविषयी माहिती दिली. याप्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकर बहुउद्देशीय उत्कर्ष प्रतिष्ठानचे सचिव अशोक इंगळे, कोषाध्यक्ष रमेश तायडे, सभासद पी.टी.इंगळे तसेच प्राचार्य डॉ. एच.बी.नानवाला यांची प्रमुख उपस्थिती होती.



पदवी प्राप्तीनंतर नोकरीची हमी देणारे शिक्षण, अनुभवी प्राध्यापक वर्ग व आधुनिक अध्यापन पद्धती, सुसज्ज व भव्य इमारत, विद्यार्थ्यांसाठी पोषक शिक्षणपर्यावरण, सामाजिक कार्य व पत्रकारिता अभ्यासक्रमासाठी प्रात्यक्षिकात्मक प्रशिक्षणाची उत्कृष्ट व्यवस्था, राष्ट्रभूषण ग्रंथालयात स्पर्धा परीक्षा (बँकिंग) अभ्यासासाठी उत्तम साहित्य, विद्यार्थ्यांच्या बौद्धिक, सामाजिक व सांस्कृतिक विकासासाठी तज्ज्ञांचे मार्गदर्शन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, छत्रपती शिवाजी महाराज, शाहू महाराज, गाडगेबाबा आदी महान व्यक्तींच्या विचारांचे प्रबोधन येथे केले जाते. या महाविद्यालयात प्रवेश घेणे म्हणजे केवळ पदवी मिळविणे नव्हे, तर सामाजिक परिवर्तनाचा भाग होणे आहे,'' त्यामुळे विद्यार्थ्यांनी व पालकांनी महाविद्यालयास भेट देऊन प्रवेश प्रक्रिया पूर्ण करावी. ही एक सुवर्णसंधी असून भविष्यासाठी महत्त्वपूर्ण टप्पा ठरू शकतो असे मत प्रा.मुकूंद भारसाकळे यांनी व्यक्त केले.

**विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास घडवणं आमचे ध्येयः प्राचार्य डॉ. एच.बी.नानवाला**

**आमच्या कॉलेजचं मुख्य उद्दिष्ट म्हणजे** विद्यार्थ्यांना चांगलं शिक्षण देऊन त्यांचा सर्वांगीण विकास घडवणं. म्हणजे फक्त अभ्यासात नव्हे, तर समाजात आणि जीवनमूल्यांमध्येही ते पुढं राहावेत, असा आमचा प्रयत्न आहे. आमचे अध्यक्ष प्रा. मुकुंद भासरकळे सर हे दूरदृष्टी असलेले शिक्षणप्रेमी आहेत.

रोज क्लासला येणं आणि वाचन करणं खूप गरजेचं आहे. त्यामुळे, ७५% हून अधिक उपस्थिती असलेल्या विद्यार्थ्यांना दर महिन्याला रु. ५०० प्रोत्साहन आम्ही देतो. ही मदत म्हणजे त्यांना शिकण्यात सातत्य यावं, यासाठीचा आमचा एक छोटासा प्रयत्न आहे. सर्व इच्छुक आणि आशावादी विद्यार्थ्यांना मी सांगू इच्छितो, की, तुमचं स्वप्न समाज बदलण्याचं असेल, मोठ्या पदांवर पोहोचून बाबासाहेबांचं स्वप्न पूर्ण करायचं असेल, तर आमचं कॉलेज तुमच्यासाठी आहे. इथे शिक्षण म्हणजे फक्त पदवी नाही, तर स्वाभिमान, प्रगती आणि उद्दिष्ट! होय. असेही प्राचार्य डॉ. नानवाला यांनी सांगितले.

# रविवारी पारस येथे मेंदूजन्य रोग तपासणी शिबिर

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोला , दि.९ :** स्थानिय सेवाभावी स्व.मोहनलाल लालचंद विरवाणी फाउंडेशनच्या वतीने ''मेंदूची वारी आली आपल्या दारी'' या मेंदू रुग्णांच्या तपासणी शिबिराचे आयोजन रविवार दि ११ मे रोजी सकाळी १० वाजता,पारस येथील ग्रामपंचायत कार्यालय परिसरात आयोजित करण्यात आले आहे.या शिबिरात महानगरातील जेष्ठ मेंदू विकार तज्ञ डॉ नितीन विरवानी हे रुग्ण तपासणी करणार आहेत.या शिबिरात सततची डोकेदुखी, अर्धशिशी, मिरगी, अपस्मार,फिट,स्मृतीभ्रंश,अधार्गवायूचा आजार, चक्कर येणे, तोल जाणे, मेंदूज्वर, कंपवात, डोळ्यांना दोन दोन दिसणे, डोळ्यात रक्तस्त्राव,चेहऱ्यावर शॉक लागण्या सारखे होणे,झोप न येणे आदी मेंदूंचे आजार तथा स्पाइन प्रकारात पाठीच्या मणक्यावरील शस्त्रक्रिया,मानदुखी,पाठदुखी, कंबरदुखी, सायटिका, गादी सरकणे,गादी सरकून नस दबणे,हाता पायाला मुंग्या येणे,टाच दुखणे, मणक्याला लागलेला मार, फॅक्चर, मणक्याची गाठ,चालताना पाय दुखणे,सर्वाइकल स्पाँडिलायसिस आदींची तपासणी करण्यात येणार असून फिट,मिरगीच्या रुग्णांसाठी समुपदेशन,लकव्याच्या रुग्णांसाठी व्यायाम व मोफत औषधी वितरित करण्यात येणार आहे. गरजू रुग्णांसाठी अल्प दरात शस्त्रक्रिया व औषधांची व्यवस्था ही फाउंडेशनच्या वतीने करण्यात आली आहे.या शिबिराचा मेंदू रोग व मणक्याच्या रुग्णांनी मोठ्या संख्येने लाभ घेण्याचे आवाहन स्व. मोहनलाल लालचंद विरवानी फाउंडेशनच्या वतीने करण्यात आले आहे.

# पाकिस्तानने केलेल्या आगळीकीमुळे युद्धजन्य परिस्थिती ओढविली-शरद पवार

सातारा, दि. ९ वृत्तसंस्था

भारताने कधीही अतिरेकी चळवळीला प्रोत्साहन दिलेले नाही. पाकिस्तानने केलेल्या आगळीकीमुळे युद्धजन्य परिस्थिती ओढवली आहे. अतिरेक्यांच्या अंत्ययात्रेत पाकिस्तानी सरकारचे प्रतिनिधी उपस्थित होतात त्यामुळेच आपल्याला काय घडले आहे ? हे कळू शकते म्हणून आज आपण सरकारच्या पाठीशी शांततेचा पुरस्कार करणारे लोक ठामपणे उभे आहोत, असे प्रतिपादन रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांनी केले. डॉक्टर कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या ६६ व्या पुण्यतिथी निमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी बोलताना शरद पवार म्हणाले की, पाकिस्तानने आरंभलेल्या उचापतींमुळे युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे. पाकिस्तानी सैन्य व अधिकारी अतिरेक्यांच्या अंत्ययात्रेत सहभागी होतात, हे संपूर्ण जगाने पाहिले आहे.



भारताने कधीही अतिरेकी चळवळीला प्रोत्साहन दिले नाही. आपल्यावर जर हल्ले झाले तर आपण आपल्या रक्षणाची खबरदारी घ्यायला पाहिजे. आपण शांततेचा पुरस्कार करणारे लोक आहोत म्हणूनच केंद्रातील समन्वय समितीच्या बैठकीत विरोधी पक्ष म्हणून इंडिया आघाडी देशाच्या हितासाठी ठामपणे सत्ताधाऱ्यांबरोबर उभी राहिली आहे. संरक्षण मंत्री म्हणून काम करत असताना संरक्षण खात्यामध्ये नऊ टक्के महिलांची भरती व्हावी असा निर्णय आम्ही घेतला होता. त्याचाच परिणाम म्हणून आज महिला ब्रिगेड लष्करात अत्यंत मानाने उभ्या आहेत आणि तडफदारपणे लष्करी कारवायांमध्ये भाग घेत आहे ही अभिमानाची गोष्ट आहे. यावेळी बेळगावच्या सून आणि सिंदूर ऑपरेशनच्या मुख्य कर्नल सोफिया कुरेशी यांच्या धाडसाचा सुद्धा पवार यांनी उल्लेख केला

रयतचा शिक्षक हा रयतेचा केंद्रबिंदू आहे. गुणवत्ता आणि कौशल्य वाढवण्यासाठी प्रत्येक शाखेत विविध उपक्रम राबवले जातात. आज गुणवत्ता वाढवणे हे आपल्या समोरील आव्हान आहे. विज्ञान युगाला सामोरे जाण्याची ताकत आजच्या विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करूया असे आवाहन पवार यांनी बोलताना केले. जात लिंग धर्म यांचा विचार न करता कर्मवीरांनी सर्व तळागाळातल्या वंचितांना शिक्षण दिले. आज भारत वेगळ्या परिस्थितीतून जात आहे. एकसंघ उभ्या राहणाऱ्या भारतासाठी धर्मनिरपेक्ष विचार करणाऱ्या पिढीची गरज आहे, असेही ते म्हणाले. चेअरमन चंद्रकांत दळवी यांनी भविष्यातील ध्येय-धोरणांचा आढावा घेतला. रयत मासिकांचे प्रकाशन इंजिनिअरिंग कॉलेजला सेंटर ऑफ एक्सलन्स ची स्थापना रिसर्च अँड डेव्हलपमेंट स्वतंत्र विभाग सक्षम शाखेकडून दुर्बल शाखांना १५ टक्के निधीची मदत इत्यादी निर्णयाची त्यांनी माहिती दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे सचिव विकास देशमुख यांनी केले. यावेळी थोर देणगीदार कर्मवीर पारितोषिक विजेते शाखा यशवंतराव चव्हाण आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षक, शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त खेळाडू, जागतिक मराठी अकादमीचे गौरव फुटाणे, रयत मासिकाचे कार्यकारी संपादक डॉक्टर सुधीर भोंगळे यांचा यावेळी सन्मान करण्यात आला. पुरस्कार व वितरणाचे निवेदन उच्च शिक्षण विभागाचे सहसचिव प्राचार्य डॉक्टर शिवलिंग मेनकुदळे यांनी केले.

## थोडक्यात

### भारत-पाक युद्धाच्या पार्श्वभूमीवर आयपीएल स्पर्धा स्थगित




**नवी दिल्ली :** भारत आणि पाकिस्तानमधील वाढता तणाव पाहता बीसीसीआयने एक मोठा निर्णय घेतला आहे. रिपोर्ट्सनुसार, सध्या सुरु असलेले आयपीएलचे उर्वरित सामने स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. बीसीसीआयने याबाबत अधिकृत घोषणा केली आहे.आयपीएलचे एकूण १६ सामने शिल्लक होते. हे १६ सामने आता नंतर खेळवण्यात येणार आहेत. मात्र हे सामने नक्की कधी खेळवण्यात येतील, याबाबत बीसीसीआयकडून माहिती देण्यात आलेली नाही.दरम्यान, पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा बदला घेण्यासाठी भारताने पाकिस्तानवर 'ऑपरेशन सिंदूर' अंतर्गत जोरदार एअरस्ट्राईक केला. यात पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवाद्यांचे ९ तळ उद्ध्वस्त करण्यात आले. यात १०० हून अधिक दहशतवादी मारले गेले. यानंतर बिथरलेल्या पाकिस्तानने भारताच्या १५ शहरांवर हवाई हल्ल्याचा प्रयत्न केला.भारतीय सुरक्षा दलांनी भारताच्या अनेक सीमावर्ती भागात पाकिस्तानने केलेले ड्रोन आणि क्षेपणास्त्र हल्ले वेळीच उधळून लावले आहेत. मात्र, या हल्ल्याचा परिणाम आयपीएलवर दिसून आला. धर्मशाळा येथे पंजाब किंग्ज आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यात सीझनमधील ५८ वी मॅच सुरू होती, ती मध्येच थांबवण्यात आली आहे.

### सौदी अरेबियाचे परराष्ट्र मंत्री इस्लामाबादला जाणार

**नवी दिल्ली :** २२ एप्रिल २०२५ रोजी जम्मू-कश्मीरच्या पहलगाम येथे झालेल्या भीषण अतिरेकी हल्ल्यानंतर भारताने ऑपरेशन सिंदूर अंतर्गत पाकिस्तानातील अतिरेकी तळांवर जोरदार हल्ले सुरू केले आहेत. भारतीय हवाई दलाच्या अचूक कारवाईत अनेक दहशतवादी केंद्रे उद्ध्वस्त झाली आहेत. या घडामोडींवर संपूर्ण जगाचे लक्ष लागले आहे.सौदी अरेबियाचे परराष्ट्र मंत्री पाकिस्तानमध्ये याच पार्श्वभूमीवर सौदी अरेबियाचे उप परराष्ट्र मंत्री आदिल अल-जुबैर यांनी काल अचानक दिल्लीत येऊन भारतीय परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांची भेट घेतली. त्यांनी भारताच्या कारवाईनंतर निर्माण झालेल्या परिस्थितीवर चर्चा केली. जयशंकर यांनीही या भेटीबद्दल सांगताना, ''आतंकवादाविरोधातील भारताच्या ठाम भूमिकेची मांडणी केली,'' असे स्पष्ट केले.दरम्यान, आता आदिल अल-जुबैर पाकिस्तानच्या इस्लामाबादमध्ये जात असून, तिथे ते पाकिस्तानशी या विषयावर चर्चा करतील, अशी माहिती मिळाली आहे. भारताने जागतिक पातळीवरही आपली भूमिका स्पष्ट केली आहे. परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांच्याशी दूरध्वनीवर संवाद साधत सांगितले की, ''भारत आपल्या नागरिकांवर होणाऱ्या दहशतवादी हल्ल्यांना प्रत्युत्तर देईल, परंतु कोणत्याही प्रकारचा युद्धजन्य उन्माद खपवून घेतला जाणार नाही.



### हाच पाकिस्तानचा खरा चेहरा- असदुद्दीन ओवेसी

**नवी दिल्ली :** पहलगाम दहशतवादी हल्ला २२ एप्रिलला झाला. या हल्ल्यानंतर भारताने 'ऑपरेशन सिंदूर' राबवून पाकिस्तानातील दहशतवाद्यांची ९ ठिकाणं उद्ध्वस्त केली. मात्र पाकिस्तानच्या कुरापती सुरुच आहेत. त्याला भारतानेही चोख प्रत्युत्तर दिले आहे. पाकिस्तानने काल रात्री नियंत्रण रेषा आणि आंतरराष्ट्रीय सीमेसह अनेक ठिकाणी स्वार्म ड्रोन म्हणजे झुंडीने ड्रोन्स पाठवले. उधमपूर, सांबा, जम्मू, अखनूर, नगरोटा आणि पठानकोटमध्ये भारतीय सैन्याच्या एअर डिफेंस यूनिट्सने काऊंटर-ड्रोन ऑपरेशनमध्ये ५० पेक्षा अधिक ड्रोन्स पाडले.ऑपरेशन सिंदूरनंतर पाकिस्तान जगभरात दहशतवाद्यांना पोसत असल्याचे स्पष्ट झाले.''आपल्या सर्वांना वाटत आहे की, पाकिस्तान गुडघ्यावर आला आहे. पण असे नाही. कोणत्याही भ्रमात राहू नका. अमेरिकेने हाफिज सईद याच्या मुलाला दहशतवादी घोषित केले आहे. पाकिस्तानमध्ये जे दहशतवादी मारल्या गेले. त्यांच्या अंत्यविधी यात्रेत- नमाजे जनाजा मध्ये सईदचा मुलगा आला. त्याच्यासोबत पाकिस्तानी लष्कराचे अधिकारी आणि इतर अनेक दहशतवादी आल्याचे दिसून आले आहे.



# नौसेनेच्या सागरी हल्ल्यात कराची बंदर संपूर्ण उद्ध्वस्त!

**नवी दिल्ली, दि.९ वृत्तसंस्था**

भारत आणि पाकिस्तान यांच्यात वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर भारतीय नौसेनेने ऐतिहासिक पाऊल उचलत कराची बंदरावर जोरदार सागरी हल्ला केला आहे. १९७१ च्या युद्धानंतर पहिल्यांदाच अशा प्रकारचा मोठा हल्ला करण्यात आला आहे. या हल्ल्यात कराची बंदर पूर्णतः उद्ध्वस्त झाल्याची प्राथमिक माहिती आहे.





भारतीय नौसेनेचा ' ' हा एअरक्राफ्ट कॅरियर आधीच अरबी समुद्रात तैनात करण्यात आला होता. या स्ट्राइक ग्रुपमध्ये एक विमानवाहू जहाज, विध्वंसक, फ्रिगेट, पनडुब्बी रोधी युद्धपोत आणि अनेक सहायक जहाजांचा समावेश होता. याच सामर्थ्याच्या जोरावर नौसेनेने कराची बंदरावर मिसाइलचा पाऊस पाडत पाकिस्तानला धक्का दिला.पाकिस्तानने पहलगाममधील अतिरेकी हल्ल्यानंतर जणू युद्ध छेडण्याचा प्रयत्न केला. मात्र भारताच्या तिन्ही संरक्षण दलांनी संयुक्त कारवाई करत पाकिस्तानच्या अंतर्गत अतिरेकी तळांवर आधीच हल्ला केला होता. कराची बंदरावरील हा हल्ला त्याच उत्तराचा भाग असल्याचे सूत्रांनी स्पष्ट केलं आहे.भारतीय हवाई संरक्षण यंत्रणांनी देखील जागरूकतेचं दर्शन घडवलं आहे. सरकारी सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पाकिस्तानने जम्मू आणि पंजाबच्या विविध भागांवर हल्ला करण्याचा प्रयत्न केला.

### पाकिस्तानकडून भारतातील ठिकाणांवर हल्ल्याचा प्रयत्न

भारत-पाकिस्तान तणावाच्या दरम्यान पाकिस्तानने मध्यरात्री भारतातील विविध ठिकाणांवर मिसाईल व ड्रोन हल्ल्यांचा प्रयत्न केला. जम्मू सिव्हिल एअरपोर्टवर पाकिस्तानकडून आलेला ड्रोन कोसळला, यामुळे भारताच्या फाइटर जेट्सनी तात्काळ प्रत्युत्तर देत पाकिस्तानच्या हल्ल्यांचा प्रभाव निष्फळ ठरवला.भारतीय नौसेनेचा कराचीवर झालेला हा सागरी हल्ला केवळ पाकिस्तानसाठीच नव्हे, तर संपूर्ण जगासाठी एक संदेश आहे. भारत आपल्या सुरक्षेबाबत पूर्णपणे सजग आहे आणि कोणत्याही हल्ल्याला प्रत्युत्तर देण्यास समर्थ आहे. सध्या देशातील नागरिकांनी संयम बाळगावा आणि संरक्षण दलांवर पूर्ण विश्वास ठेवावा, असं आवाहन सरकारने केलं आहे.

## ऐन युद्धावेळी पाकिस्तानच्या लष्करप्रमुखांना अटक; शमशाद मिर्झा होणार पाकचे नवे लष्करप्रमुख

**कराची, दि.९ वृत्तसंस्था**

भारत आणि पाकिस्तानमध्ये युद्ध सुरु झाले आहे. भारताच्या नौदल, लष्कर आणि हवाई दलाने पाकिस्तानवर हल्ला केला आहे. भारताच्या तिन्ही दलाने पाकिस्तानची कोंडी केली आहे. भारताने पाकिस्तानमधील दहशतवादी विरोधात ऑपरेशन सिंदूर केले. मात्र यानंतर, पाकिस्तानने गुरुवारी रात्री उशिरा भारतातील अनेक भागात हल्ला करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर भारतीय लष्कर, नौदल आणि हवाई दलाने पाकिस्तानच्या विविध प्रमुख शहरांवर संयुक्त हल्ले सुरू केले. यामध्ये पाकिस्तानची बोळवण झाली आहे. बिथरलेल्या पाकिस्तानच्या लष्कर प्रमुखाची उचलबांगडी होणार आहे.



पाकिस्तानचे लष्करप्रमुख जनरल असीम मुनीर यांची पदावरुन काढण्यात येणार आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पाकिस्तानचे लष्करप्रमुख जनरल असीम मुनीरला ताब्यात घेण्यात आले आहे.

## आम्ही भारत-पाकिस्तान मुद्द्यात हस्तक्षेप करणार नाही -जेडी व्हान्स

**नवी दिल्ली, दि.९ वृत्तसंस्था**

ऑपरेशन सिंदूरनंतर भारत-पाकिस्तान यांच्यात तणाव वाढला आहे. पाकिस्तानने गुरुवारी भारतातील काही शहरांवर हवाई हल्ले केले. या हल्ल्यांना भारतानेही चोख प्रत्युत्तर दिलं आहे. अशातच दोन्ही देशातील संभाव्य युद्धाच्या पार्श्वभूमीवर आता अमेरिकेनेही त्यांची भूमिका स्पष्ट केली आहे. भारत पाकिस्तान युद्ध झाल्यास या युद्धात अमेरिका सहभागी होणार नसल्याचं अमेरिकेने म्हटलं आहे. अमेरिकेचे उपराष्ट्रपती जे. डी. व्हॅन्स यांनी गुरुवारी यासंदर्भातील प्रतिक्रिया दिली आहे.

## ऑपरेशन सिंदूर राबवून सरकारने योग्य पावले उचलली : संघ

**नवी दिल्ली, दि.९ वृत्तसंस्था**

पहलगामच्या दहशतवादी हल्ल्यात चार दहशतवाद्यांनी २६ पर्यटकांची हत्या केली. या हल्ल्याचा निषेध जगाने नोंदवला. त्यानंतर काही कालावधीतच या हल्ल्यामागे पाकिस्तान असल्याचं कळलं होतं. ज्यानंतर भारताने ६ आणि ७ मेच्या रात्री ऑपरेशन सिंदूर राबवत पाकिस्तानला चोख प्रत्युत्तर दिलं. पाकव्याप्त काश्मीर आणि पाकिस्तानमधले दहशतवादी अड्डे उद्ध्वस्त केले. यानंतर आता या कारवाईचं सरसंघचालक मोहन भागवत यांनी कौतुक केलं आहे.

''ऑपरेशन सिंदूर भारत सरकारच्या नेतृत्वात आणि सैन्य दलांनी उचलेलं महत्त्वाचं पाऊल आहे. जे क्रूर हत्याकांड दहशतवाद्यांनी घडवून आणलं आणि




भ्याड हल्ला केला तेव्हापासूनच देशवासियांच्या मनात पीडित कुटुंबांना, माता भगिनींना न्याय मिळावा ही देशभावना होती. ज्यानंतर ही कारवाई करण्यात आली. आम्ही सरकारचं आणि सैन्य दलांचं अभिनंदन करतो.'' सरकारने आणि सैन्य दलांनी ऑपरेशन सिंदूर राबवल्याने संपूर्ण देशाची हिंमत वाढली आहे आणि त्यांची छाती अभिमानाने फुलली आहे. पाकिस्तानने जे केलं त्यानंतर भारतीय सैन्य दलांनी दिलेलं उत्तर ही महत्त्वाची आणि अपरिहार्य कारवाई होती. भारत आणि पाकिस्तान यांच्यात संघर्ष सुरु आहे. अशा संकट काळात आम्ही तन-मन-धनासह देशाच्या सरकारच्या आणि सैन्य दलांच्या पाठिशी आहोत. पाकिस्तानी सैन्याकडून सामान्य नागरिकांचा विचार न करता हल्ले केले जात आहेत. सीमा भाग आणि धार्मिक स्थळं यांना लक्ष्य केलं जातं आहे. या घटनांमध्ये ज्यांना प्राण गमावावा लागला त्यांच्या प्रति आमच्या सहवेदना आहेत. आम्ही त्या कुटुंबांच्या दुःखात सहभागी आहोत. असंही मोहन भागवत यांनी म्हटलं आहे.

सध्या आपण युद्धजन्य स्थितीत आहोत. या आव्हानात्मक परिस्थितीत संघ म्हणून आम्ही देशवासीयांना आवाहन करत आहोत की सरकारने दिलेल्या सूचना आणि निर्देशांचं तंतोतंत पालन करा.

# बीएसएफच्या कारवाईत ७ दहशतवाद्यांचा खात्मा

**जम्मू, दि.९ वृत्तसंस्था**

### सांबा सेक्टरमध्ये घुसखोरीचा प्रयत्न उधळला

जम्मूमधील सांबा सेक्टरमधून काल रात्री भारतात घुसखोरी करण्याचा प्रयत्न करणारे जैश-ए-मोहम्मद या दहशतवादी संघटनेचे सात दहशतवादी सीमा सुरक्षा दलाच्या (बीएसएफ) कारवाईत ठार झाले आहेत. याबाबत बीएसएफने एका निवेदनाद्वारे माहिती दिली आहे. या कारवाईदरम्यान, बीएसएफने पाकिस्तानी रेंजर्सच्या सीमा चौकीचे मोठे नुकसान केले, जिथून या दहशतवाद्यांना घुसखोरी करता यावी यासाठी जोरदार गोळीबार करण्यात येत होता.

''जम्मू फ्रंटियर बीएसएफच्या सांबा सेक्टरमध्ये, ८ आणि ९ मे २०२५ च्या मध्यरात्री, दहशतवाद्यांच्या एका गटाने घुसखोरीचा प्रयत्न केला होता. या दहशतवाद्यांना घुसखोरी करता यावी यासाठी पाकिस्तानी रेंजर्सच्या चौकीतून गोळीबार करण्यात आला. परंतु बीएसएफच्या सतर्क जवानांनी घुसखोरीचा हा प्रयत्न निष्फळ ठरवत किमान ७ दहशतवाद्यांचा खात्मा केला आणि पाकिस्तानी रेंजर्स पोस्टचे मोठे नुकसान केले,'' असे बीएसएफच्या प्रवक्त्याने सांगितले. तत्पूर्वी काल




रात्री, पाकिस्तानने नियंत्रण रेषा आणि आंतरराष्ट्रीय सीमेवर विविध ठिकाणी ड्रोन हल्ले करण्याचे अयशस्वी प्रयत्न केले. या हल्ल्यांना उधमपूर, सांबा, जम्मू, अखनूर, नागरोटा आणि पठाणकोट भागात भारतीय लष्कराच्या हवाई संरक्षण यंत्रणेने सडेतोड उत्तर दिले. या कारवाईत एल-७० तोफा, झेयू-२३एमएम, शिल्का प्रणाली आणि इतर प्रगत काउंटर-यूएएस उपकरणांचा मोठ्या प्रमाणत वापर करण्यात आला. याबाबत एएनआय या वृत्तसंस्थेने सूत्रांच्या हवाल्याने वृत्त दिले आहे.

पाकिस्तानी ड्रोन आणि क्षेपणास्त्र विमानांनी जम्मू काश्मीरपासून पंजाब, राजस्थान आणि गुजरातपर्यंतच्या शहरांमधील भारतीय लष्करी तळांना लक्ष्य करण्याचे धाडस केले परंतु त्यापैकी कोणत्याही ठिकाणी त्यांना यश मिळाले नाही. भारतीय हवाई संरक्षण यंत्रणेने त्या सर्वांना हाणून पाडले आहे. पाकिस्तानने संपूर्ण जम्मू-काश्मीरमध्ये नियंत्रण रेषेवर गोळीबार केला आहे, ज्याला भारतीय सैन्य योग्य उत्तर देत आहे. ऑपरेशन सिंदूरचा एक भाग म्हणून, भारतीय सशस्त्र दलांनी पाकिस्तानमधील जैश-ए-मोहम्मदसह दहशतवाद्यांच्या ९ प्रशिक्षण केंद्रांवर आणि तळांवर नुकतेच हल्ले केले होते. जम्मू-काश्मीरच्या पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून दहशतवादी छावण्यांवर भारताने हे हल्ले केले होते.

## पाकिस्तानने आता पीडित असल्याचा कांगावा करु नये-निकी हॅले

**नवी दिल्ली, दि.९ वृत्तसंस्था**

दहशतवाद्यांनी हल्ला करुन निष्पाप नागरिकांचा बळी घेतला. त्यानंतर प्रत्युत्तर देण्याचा भारताला पूर्ण अधिकार आहे. पाकिस्तानने आता हल्ला पीडित २२ एप्रिलला पाकिस्तानमधल्या दहशतवाद्यांनी भारतातल्या काश्मीरमधल्या पहलगाम या ठिकाणी आलेल्या २६ पर्यटकांची गोळ्या झाडून हत्या केली. या घटनेचा जगभरातून निषेध करण्यात आला. त्यानंतर भारताने ऑपरेशन सिंदूर राबवत पाकिस्तानच्या भ्याड हल्ल्याला चोख प्रत्युत्तर दिलं.



मात्र पाकिस्तानने त्यानंतरही आगळीक करणं सोडलेलं नाही. त्यामुळे पाकिस्तानला भारताने जशास तसं उत्तर दिलं आहे. दरम्यान अमेरिकेच्या नेत्या निकी हॅले यांनी पाकिस्तानला खडे बोल सुनावले आहेत. पाकिस्तानने हल्ला पीडित असल्याचं कार्ड खेळू नये असं आता निकी हॅले यांनी म्हटलं आहे.

## पाकिस्तानच्या गोळीबारात भारतीय सैन्यदलाचे लान्स नायक दिनेश कुमार शर्मा शहीद

**नवी दिल्ली, दि.९ वृत्तसंस्था**

पाकिस्तानने केलेल्या गोळीबारात लान्स नायक दिनेश कुमार शर्मा शहीद झाले. लष्कराने दिलेल्या माहितीनुसार हरियाणातील पलवल येथील मोहम्मदपूर या नियंत्रण रेषेजवळ () दिनेश कुमार यांचं पोस्टिंग होतं. पाकिस्तानने सीमा रेषेजवळ असलेल्या गावांवर गोळीबार केला आणि तोफ गोळे डागले. या गोळीबारात लान्स नायक शहीद झाले. हरियाणाचे मुख्यमंत्री नायब सैनी यांनी एक्सवर पोस्ट करत दिनेश कुमार शर्मा यांच्या मृत्यूबाबत शोक व्यक्त केला आहे. ऑपरेशन सिंदूरनंतर पूंछमध्ये पाकिस्तानने गोळीबार केला. पाकिस्तानच्या या हल्ल्याला उत्तर देत असताना लान्स नायक दिनेश कुमार शहीद झाले. त्यांचा त्याग भारत कधीही विसरणार नाही. दिनेश कुमार यांच्या कामगिरीवर प्रत्येक भारतीय नागरिकाला गर्व आहे. त्यांच्या शौर्याला माझं वंदन असं म्हणत नायब सैनी यांनी त्यांच्या भावना व्यक्त केल्या आहेत. २२ एप्रिलला पाकिस्तानातील दहशतवाद्यांनी पहलगाम या ठिकाणी पर्यटकांवर गोळीबार केला आणि २६ पर्यटकांना ठार केलं. या घटनेचा सगळ्या जगाने निषेध केला. त्यानंतर ६ आणि ७ मेच्या रात्री ऑपरेशन सिंदूर राबवत पाकिस्तानला उत्तर देण्यात आलं. त्यानंतर दोन्ही देशांमधला तणाव वाढला आहे.



# राजधानी इस्लामाबादवर मिसाईल अटॅक

## भारतीय लष्कराची मोठी कारवाई

**नवी दिल्ली , दि.९वृत्तसंस्था**

भारताने पाकिस्तानवर काउंटर अटॅक केला आहे. भारताने पाकिस्तानची राजधानी इस्लामाबाद, सियालकोट, भावलपूर, लाहोर अशा महत्वाच्या ठिकाणी हल्ला केला आहे. पाकिस्तानने केलेल्या हल्ल्याला भारताने चोख प्रत्युत्तर दिले आहे. भारताने ऑल आउट वॉरची घोषणा केली आहे. भारताने पाकिस्तानची राजधानी इस्लामाबादवर हल्ला केला आहे.

भारताने पाकिस्तानच्या हल्ल्यांना प्रत्युत्तर देण्यास सुरुवात केली आहे. भारताकडून पाकिस्तानमध्ये क्षेपणास्त्र आणि ड्रोन हल्ले केले जात आहेत. भारताने लाहोरवर ड्रोनने मोठा हल्ला केला आहे. याआधी पाकिस्तानने जम्मू, राजस्थान, पंजाब, गुजरात इत्यादी ठिकाणी क्षेपणास्त्रांनी हल्ला केला होता. तथापि, भारताच्या हवाई संरक्षण यंत्रणेने हे क्षेपणास्त्र हवेतच पाडले.



भारत आणि पाकिस्तानमध्ये तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली आहे. पाकिस्तानने त्यांचे नापाक हल्ले सुरु केले आहेत. भारताच्या जम्मू, जैसलमेर आणि अमृतसरमध्ये पाकिस्तानकडून ड्रोन हल्ला करण्यात आला. या हल्ल्याचे प्रयत्न भारताने हाणून पाडले आहेत. भारताने पाकिस्तानच्या सर्व हल्ल्यांना जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. यानंतर भारताकडून देखील आक्रमक भूमिका घेण्यात आली आहे. भारताने लाहोरमध्ये हल्ला केला आहे. भारताने लाहोरवर ड्रोन हल्ला केला आहे. यानंतर दिल्लीमध्ये हालचालींना वेग आला आहे.

गुरुवारी रात्री पाकिस्तानने केलेल्या अयशस्वी हल्ल्याच्या प्रयत्नानंतर, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी संरक्षण प्रमुख जनरल अनिल चौहान यांच्याशी चर्चा केली आहे. सिंह यांनी तिन्ही लष्कर प्रमुखांकडूनही अपडेट्स घेतले. तिकडे नवी दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी, आणि महत्वाच्या नेत्यांमध्ये महत्वाची बैठक सुरू आहे. आज रात्री भारत पाकिस्तानवर मोठी कारवाई करण्याची शक्यता आहे. या बैठकीत काय निर्णय होतो हे पहावे लागणार आहे.

# दिल्लीतील इंडिया गेट केले रिकामे; ताजमहालच्या सुरक्षेमध्येही वाढ

**नवी दिल्ली, दि.९ वृत्तसंस्था**

भारत आणि पाकिस्तानमध्ये युद्ध सुरु झाले आहे. पाकिस्तानने भारतावर मिसाईन आणि ड्रोन अटॅक सुरु केला आणि त्याला भारतीय सैन्याने चोख प्रत्युत्यर दिले आहे. भारताच्या अनेक ठिकाणी पाकिस्तानने गोळीबार करण्यास सुरुवात केली मात्र भारताने प्रतित्युत्यर दिल्यानंतर आता भारताने लाहोरमध्ये कारवाई केली आहे. भारताने चार विमान नेस्तनाबूत केली आहे अशी माहिती समोर आली आहे. आता आणखी एक मोठी अपडेट समोर आली आहे आणि यामध्ये असे सांगण्यात आले आहे की पाकिस्तानची राजधानी इस्लामाबाद स्फोटामुळे हादरल्याची माहिती समोर आली आहे.

भारत आणि पाकिस्तानमध्ये युद्ध सुरु होताच भारतामध्ये सुरक्षेच्या कारणास्तव अनेक निर्णय घेतले जात आहेत. राजधानी दिल्लीच्या सुरक्षेमध्ये वाढ करण्यात आली आहे. दिल्लीमधील इंडिया गेट रिकामे करण्यात आले आहे. दिल्ली पोलिसांकडून कडेकोट बंदोबस्त करण्यात आला आहे.





तसेच इंडिया गेटचा सर्व परिसर रिकामा करण्यात आला आहे. पोलिसांनी नागरिकांना इंडिया गेटपासून लांब जाण्याच्या सूचना दिल्या आहेत. तसेच इंडिया गेटच्या बाहेर बॅरिकेट्स लावण्यात आले आहेत.

भारत पाकिस्तान युद्धाच्या पार्श्वभूमीवर जगातील आठ आश्चर्यापैकी एक असलेले आणि भारताच्या पर्यटनातील महत्त्वपूर्ण वास्तू असलेले ताजमहाल देखील सुरक्षेमध्ये वाढ करण्यात आली आहे. ताजमहालच्या सुरक्षा वाढवण्यात आली आहे. यापूर्वी झालेल्या १९७१ च्या युद्धावेळी देखील ताजमहाल झाकून ठेवण्यात आला होता. यावेळी देखील ताजमहालची सुरक्षा वाढवली आहे.

पाकिस्तानने भारतावर हल्ला केल्यानंतर भारतीय तिन्ही दलाकडून जोरदार प्रत्युत्तर देण्यात आले आहे. भारताच्या तिन्ही दलाकडून पाकिस्तानची कोंडी करण्यात आली आहे. वर देखील गोळीबार सुरु झाला असून सीमा भागामध्ये ब्लॅकआऊट करण्यात आले आहे. परिसरामधील लाईट, मोबाईल नेटवर्क आणि इंटरनेट सेवा बंद करण्यात आली आहे. भारताने इस्लामाबाद, कराचीवर हल्ला करण्यात आला. कराची बंदरावर देखील भारताच्या आयएनएस विक्रांत कडून हल्ला करण्यात आला आहे. त्याचबरोबर महत्त्वाच्या शहरांमध्ये भारताच्या वायू दलाने हल्ला केला आहे.

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि **मुख्य संपादक तिक्ष्णगत सुगत वाघमारे** यांनी भास्कर प्रिंटिंग प्रेस एन.एच.६ बोरगाव मंजू येथे मुद्रित करून दै.अजिंक्य भारत, सुगत भवन,बारा ज्योतिर्लिंग मंदिराजवळ, रणपिसेनगर, अकोला येथे प्रकाशित केले.* **कार्यकारी संपादक-रूबेन डी.वाळके (*पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची)** आरएनआय-MAHMAR/2009/35271

आपले पत्र या मेलवर पाठवावे, आम्ही त्याला प्रसिद्धी देऊ
ajinkyabharat23@gmail.com

## संपादकीय...

# पाकिस्तानची खुमखुमी

भारताने 'ऑपरेशन सिंदूर' करून पाकिस्तानला चोख उत्तर दिले. जरी पाकसमर्थित दहशतवाद्यांनी निष्पाप आणि निर्दोष भारतीयांना लक्ष्य करून पहलगाममध्ये मारले तरी भारताने कमालीचा संयम पाळला. दोन आठवड्यांचा वेळ घेत अत्यंत संतुलित आणि जबाबदार कारवाई केली. त्यात दहशतवाद्यांना आणि त्यांना प्रशिक्षण देणायांना आणि त्यांच्या ठिकाणांनाच लक्ष्य केले गेले. हे करताना भारताने गेल्या तीन दशकांतील सगळे उट्टे काढले. संसदेवर हल्ला प्रकरणापासून ते कंदहार विमान अपहरण प्रकरणात सहभागी असणायांच्या आकांना आणि त्यांच्या बदनाम अड्ड्यांना उद्ध्वस्त केले. भारताला कारवाईचा अधिकार होताच आणि त्याचे जागतिक स्तरावर समर्थनही केले. तथापि, पाकिस्तानची खुमखुमी अजूनही कायम आहे. पाकने भारताच्या परिसरात ड्रोन हल्ले गेल्या दोन दिवसांपासून सुरुच ठेवले आहेत. भारतानेही त्याला जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. पाकने भारताच्या कारवाईच्या दुस-या आणि तिस-याही दिवशी आपले मनसुबे तडीस नेण्याचा अयशस्वी प्रयत्न करून पाहिला. त्यालाही भारताने पुन्हा त्यांना समजेल अशाच भाषेत उत्तर दिले आहे. भविष्यातही हे घडत राहणार असल्यामुळे भारताला अखंड सावध राहावे लागणार आहे. भारताशी प्रत्येक बाबतीत स्पर्धा करण्याचा पाकचा प्रयत्न असतो. हा कुठेतरी त्यांच्यातील न्यूनगंड आहे. खेळाच्या मैदानापासून ते भारत अन्य देशांशी करत असलेल्या करारमदारापर्यंत सगळ्याच ठिकाणी त्यांनी यासाठी केलेला आटापिटा जगजाहीर आहे. मागे जेव्हा भारत-अमेरिका नागरी अणुऊर्जा सहकार्य करार झाला त्यावेळी पाकिस्तान अमेरिकेच्या खास मर्जीतला होता. तेव्हा आमच्याशीही अमेरिकेने हा करार करावा याकरता पाकने साकडे घातले होते आणि रुसव्याचे नाट्य केले. बरोबरी करताना एका बाबीचे पाकिस्तानला विस्मरण होते की ते एक अपयशी राष्ट्र आहे. भारताच्या एक दिवस अगोदरच आपला स्वातंत्र्य दिन पाळणाया पाकिस्तानला पाऊण शतकानंतर धड स्वत:च्या पायावर उभे राहता आले नाही. विज्ञान-तंत्रज्ञान आणि आर्थिक क्षेत्रात भारताने जी प्रगती केली ती पाकिस्तानला पचनी पडलीच नाही. कारण, त्याबद्दल त्यांना असलेली असूया. भारताला पायात पाय घालून कसे पाडता येईल हाच त्यांचा एककलमी कार्यक्रम असल्यामुळे लोकशाहीलाच खुंटीला टांगून ठेवणाया या देशातील लष्करी शासकांनी सतत भारताचा बागुलबुवा उभा करून आपल्याच संसदेची आणि जनतेची दिशाभूल करण्याचेच काम केले. अर्थात, संसद नावालाच आहे अथवा होती. त्याचे कारण सर्वाधिकार लष्कराकडे अथवा लष्कराने बसवलेल्या बाहुले सरकारकडेच असतात हे जगजाहीर आहे. त्यांच्याकडे जेव्हा जेव्हा गोंधळ माजू लागतो किंवा प्रश्न उपस्थित केले जातात तेव्हा त्यांचे हे लष्कर भारताच्या कुरापती काढण्याची खेळी सुरू करते. पाकिस्तानची जनता बेरोजगारी, महागाईबद्दल बोलू लागली की त्यांचे लष्कर किंवा त्यांचे सरकार जनतेचे लक्ष काश्मीरकडे वळवते. अगदी १९४९ पासून त्यांचा हाच पॅटर्न, तेथील जनताही दरवेळी त्यांच्या या कांगाव्याला भुलते आणि त्याचे मूल्य त्यांनाच चुकवावे लागते. १९५० च्या दशकामध्ये त्यांच्या अयुब खान या लष्करप्रमुखांनी तेच केले. काश्मीरचे भय दाखवून स्वत:लाच राष्ट्रपती घोषित केले. अर्थव्यवस्था गोत्यात आली असताना त्यांनी भारताशी युद्ध घोषित केले. झिया उल हक, परवेज मुशर्रफ आदी लष्करप्रमुख त्याच वाटेने गेले आणि त्यांनी आपले बस्तान बसवत देशच ताब्यात घेतला. प्रत्येक वेळी भारतद्वेष आणि काश्मीरचा मुद्दा हेच यांचे भांडवल. आताही पहलगामवर दहशतवादी हल्ला करण्यापूर्वी पाकचे आताचे लष्करप्रमुख आसिम मुनीर यांनीही काश्मीरचे तुणतुणे वाजवले. आजची पाकिस्तानातील आर्थिक स्थिती अजिबात चांगली नाही हे आंतरराष्ट्रीय नामांकित संस्थांनी सोदाहरण सांगितले असताना कोणताही सूज्ञ देश अथवा तेथील प्रमुख मंडळी कुरापत काढण्याचे काम करणार नाहीत. पण पाकिस्तान तसे करतो आणि वारंवार तसे करतो. यापूर्वीही दोन वेळा त्यांच्यावर कारवाई करून ते गप्प न बसल्यामुळे भारताने आता कराची, रावळपिंडीपर्यंत आपले इरादे स्पष्ट केले आहेत. गेल्या पंधरा दिवसांपासून जे काही सुरू आहे त्यात केवळ भारत आणि पाकिस्तान यांचाच फक्त सहभाग आहे असे नाही, तर इस्लामिक देशांची संघटना, अमेरिका, चीन, रशिया अशी बरीच पात्रेही यात आहेत. यातील चीन आणि पाकिस्तानला नव्याने लाभलेला बांगलादेशसारखा अस्थिर मित्र व इराण आणि तुर्कस्थान यांना पाकसाठी येत असलेले उमाळे आणि शिवाय पाकिस्तानातीलच एखादा संभाव्य माथेफिरू या सगळ्या बाजूंनी सावध राहात भारताला सतर्क राहावे लागणार आहे. भारताने आपली सज्जता दाखवलेलीच आहे. तसेच आत्मसंयमाचे चांगले दर्शन जगाला घडवले आहे. केवळ दहशतवाद्यांच्या तळांना लक्ष्य करून आपली प्रगल्भता दाखवली आणि प्रकरण आणखी चिघळणार नाही याची काळजी घेण्याचा प्रयत्न केला. पाकिस्तानकडून तशी प्रगल्भता दाखवली जाण्याची शक्यता सध्या दिसत नाही. उलट त्याच्या कुरापती सुरुच आहेत परंतु भारतही त्याला चांगलाच पुरुन उरणारा आहे हे आता सर्व जगाने पाहिले आहे. दोन युद्धांमध्ये सपाटून मार खाल्लयावरही पाकला अजून अक्कल कशी येत नाही हाच मूळ प्रश्न आहे.

## युद्धज्वर



भारत पाक युद्धाचा
चढला आहे हा ज्वर
हिंदुस्तान च्या बाजूचा
जोरदार सुरू प्रतिकार



## लक्ष्यभेद

जयदीप सोनखासकर
9890508017

शत्रूचे ड्रोन पाडत आहेत
भारतीय लढावू विमाने
ते घुसून मारतील घरात
कल्पना केली नाही शत्रुने

पाकड्या या कुरापतींना
अजिबात भीक घालू नका
खत्म करा दहशतवाद्यांना
त्यांचे नामोनिशान ठेवू नका

## ।। अभंगवाणी ।।

- प्रवीण हटकर
८०५५२१३२८१

मैत्री होत नाही
जबरदस्तीने ।
वा व्यवहाराने
कधी मित्रा ।।

लाख विनवणी
केल्यावर नसे ।
ती जुळत नसे
मैत्री कधी ।।

ओढून ताणून
मैतरी नसते ।
जुळत नसते
जोडल्याने ।।

विश्वासाने मैत्री
असे जोडलेली ।
नाळ विणलेली
आंतरिक ।।

# मुल म्हणजे आईसाठी सर्वस्व असते!



## प्रासंगिक

प्रविण बागडे
नागपूर 9923620919



मातृदिन हा आईचा सन्मान करण्यासाठी साजरा केला जातो. दरवर्षी संयुक्त राज्य आणि इतर काही देशांमध्ये मे च्या दुसऱ्या रविवारी साजरा केला जातो. १९१२ मध्ये 'मदर्स डे' चे संस्थापक अण्णा जार्विस यांनी 'मे मध्ये दुसरा रविवार' आणि 'मदर्स डे' या म्हणीचा ट्रेडमार्क केला आणि मदर्स डे इंटरनॅशनल असोसिएशनची स्थापना करुन माता आणि मातृत्वाच्या सन्मानार्थ मातृदिन साजरा करण्याची कल्पना सुचविली होती. १९१४ मध्ये तिला राष्ट्रीय मान्यता मिळविण्यात यश आले.

तेव्हापासुन या दिवशी लोक आईचा आदर म्हणुन तिला सप्रेम भेट म्हणून एखादी प्रिय वस्तू आणि शुभेच्छा देवून 'मदर्स डे' साजरा करतात. तसेच हा कुटुंबातील किंवा व्यक्तीच्या आईचा तसेच मातृत्व, मातृबंध आणि समाजातील मातांचा प्रभाव यांचा सन्मान करणारा उत्सव आहे. हा जगातील बराच भागांमध्ये विविध दिवसांमध्ये साजरा केला जातो, सामान्यतः मार्च किंवा मे महिन्यांत हा साजरा केला जातो. काही देशात जसे बल्गेरिया आणि रोमानिया येथे जागतिक महिला दिन हा दिवस 'मदर्स डे' म्हणून साजरा केला जातो.

भारतीय संस्कृतीत आधुनिक 'मदर्स डे' आत्मसात करण्यात आला आहे आणि दरवर्षी मे महिन्याच्या दुसऱ्या रविवारी साजरा केला जातो. भारतीय लोक हा प्रसंग धार्मिक कार्यक्रम म्हणून साजरा करत नाहीत; त्याचा उत्सव मुख्यतः शहरी भागांपुरता मर्यादित आहे जेथे या प्रसंगाचे मोठ्या प्रमाणावर व्यापारीकरण केले गेले आहे. या दिवशी मुले आई आणि आजी यांना भेटवस्तू देतात. हे अशाच प्रकारच्या उत्सवांना पूरक आहे, मुख्यत्वे व्यावसायिक हितसंबंधांमुळे, कुटुंबातील सदस्यांचा सन्मान करणे, जसे की फादर्स डे, सिबलिंग डे आणि आजी-आजोबांचा दिवस. हजारो वर्षांपासून जगभरात अस्तित्वात असलेल्या माता आणि मातृत्वाच्या अनेक पारंपारिक उत्सवांशी त्याचा थेट संबंध नाही, जसे की ग्रीक पंथ ते सायबेले, मातृदेवता रिया, हिलारियाचा रोमन सण किंवा इतर ख्रिश्चन धर्मगुरू मदरिंग रविवारचा उत्सव मदर चर्चच्या प्रतिमेशी संबंधित आहे. तथापि, काही देशांमध्ये 'मातृदिन' अजूनही या जुन्या परंपरांचा समानार्थी आहे.

आई म्हणजे ममता, तसेच आई म्हणजे आत्मा आणि आई म्हणजे ईश्वर या दोघांचा संगम म्हणजे 'आई' होय. मायेची पाखरण करणारी एक स्त्री. एखादी स्त्री जेव्हा आपल्या अपत्यास जन्म देते त्यावेळेस तिला मातृत्व प्राप्त होते आणि तेव्हाच समाजाच्या दृष्टीने ती त्या अपत्याची आई बनते. आईचे खरे प्रेम आणि पालनपोषण या सोबत कशाचीही तुलना केली जाऊ शकत नाही. आमच्या आयुष्यातील ती एकमेव महिला आहे जी कोणत्याही हेतूशिवाय आपल्या मुलांवर भरपूर प्रेम करते. मूल म्हणजे आईसाठी सर्वस्व असते. ती एक चांगली श्रोता आहे आणि आम्ही सांगत असलेल्या आमच्या चांगल्या आणि वाईट गोष्टी ऐकत असते. ती आम्हाला कधीही रोखत नाही आणि कोणत्याही प्रकारे आम्हाला बांधत नाही. ती आम्हाला चांगल्या आणि वाईट मधील फरक शिकवते. आई आम्हाला प्रत्येक आनंदात आणि दुःखात मदत करते, जेव्हा आपण आजारी असतो, तेव्हा ती आपल्यासाठी रात्रभर जागी राहुन आपल्या चांगल्या आरोग्यासाठी देवाची प्रार्थना करते.

शब्द मानवी भावनांशी निगडित असून त्यास माणसाच्या जीवनात अनन्यसाधारण महत्व प्राप्त झालेले आहे. स्त्रीने जन्म दिला नसतानाही ती सवतीच्या मुलाची किंवा दत्तक मुलाची आई बनते. आई ही शांतादुर्गाचे रूप आहे, मराठी भाषेतला 'आई' हा आई मायेचा सागर आहे. मराठीतील प्रसिद्ध कवी यशवंत यांनी आपल्या कवितेत 'स्वामी तिन्ही जगाचा, आईविना भिकारी' ही ओळ लिहून 'आई' या शब्दाची महानताच थोडक्यात सांगीतले. आजच्या दिनी सर्वांना 'मदर्स डे' च्या शुभेच्छा!

**घर सुटतं पण आठवण**
**कधीच सुटत नाही!**
**जीवनात आई नावाचं पान**
**कधीच मिटत नाही !!**

# विचारांचे थवे

## विचारमंथन

सौ.प्रांजल रायपुरे
9028825708



प्रत्येकाच्या आयुष्यात विचारांचा हैदोस असतो.. तो काळ, ती वेळ चुकवता येत नाही'' वेदना काळजातली मिटवावी कशी?... जग म्हणते प्रेमाने वागावे, प्रेमाने जगावे, गारवा मिळते .पण त्यातील उग्र विचारचिंतन पाहिली का कोणी!... विचारांचा हुंदका जेव्हा सुटतो राग प्रेमाचा बनतो ..त्यापेक्षा परत राहावे विचारधन फुटतील, अंकुर उगवतील सोनेरी दिवस, नवीन पालवी फुटतील विचारी धनाला मनाच्या नभात काळोख जेव्हा पसरतो उर भयानक दाटून येते. शांततेतही... विरहात टवटव बागही भकास वाटते. प्रेमाची प्रेमळ वाहलेली आहुती भावना निरर्थक वाटते.. डोळ्यातील स्वप्न विरल्यासारखे वाटते!! जीवनाचा रंगमंचावर सुखाचा पाऊस हवा, पुस्तकाचा संघ फुटलेले अंतरंग वाट जर नाही दिसली.. तर पुस्तक जगण्याची आस बनते. नात्यातील बंध जुळविताना विलंब करू नका... नाहीतर क्रोधाच्या अग्नीत अशांत दरीत डुबून जाऊ.

जन्म जगण्याच्या काळात मृत्यू सोबतीला येतो. जीवन म्हणजे परतण्याची उसनवारी आयुष्याच्या शर्यतीत किती, धावलो किती थांबलो फरक कोणाला पडत नाही खरे !..कौतुक मृत्यूनंतरच बरं!! हार चंदनांनी प्रतिमेला सजावट होते. अश्रू पडतात बारा दिवस रडतात तेरवीला!! मात्र सर्वांच्या जिभेवर जिलेबी चघळत राहते. कारण सुतक मिटून जाते... पक्का निर्णय आजच करा!.. कुणाचं सुख पाहून नशिबाला दोष देऊ नका. कोणाचं दुःख पाहून आपल्या नशिबात नाही याचा आनंद मानने हेच खरे!... यशाची व्याख्या लोक ठरवितात आणि, समाधानाची व्याख्या आपण स्वतः सिद्ध करतो. विचारांचे असेच स्नान करा .मनाचे सौंदर्य नाना रंगाने नटवा.. जोपर्यंत व्यक्ती स्वतः खुश राहत नाही. तोपर्यंत सर्व गोष्टीची किंमत शून्य असते.. संवेदनशील मनाला वेदना फार असतात



कायमस्वरूपी राहून भावनांचा प्रचार करतात आपले जीवन सुंदर वेलींनी फुलवावे गरजेपुरतीचीच नोकरी करावी.. परतुनी घरी येता आनंदाने, कुटुंबाचे स्वागत शांत, आनंद हास्यतेचे अलंकार नटूनी करावे. शहाणपणाचा कळस अंगी बाळगावा समजुतीची प्रीत प्रत्येकाशी जुळावी.*आयुष्यात वेडापिसा परीस लोक जुळतील आनंदाच्या सिंहासनावर बसवतील आयुष्याचे गोकुळ होईल. सुखदुःख येते, जाते मार्ग नवे निघतीलच. एकीचं बळ असेल पाठीशी भीती न कोणाची...

लाडक्या सुनेचे सोनपावल्यांनी दारी उंबऱ्याचं माप ओलांडून आवडीने स्वागत करतात... परक्याचं पोर सर्वांना सांभाळते काहीच नाही तिचं अहोच्या नावाने सर्व ओझं तीच वाहते. तरी उपदेश, अवहेलना, हुंड्यासाठी तिच बळी पडते... काही चुकलं तर समजून घ्या ..नाहीतर आयुष्य उध्वस्त दोन्ही कडील होईल. एकंदरीत!!

विचारांचा तालमेल असणे गरजेचं आहे. तरच जीवनाचा धोका टळेल... सुखात पायाला माती लागत नाही, पण नाती ही पैशाला देव मानून विसरून गेली... प्रेमाची वेल अशी मनात लावावी माया, ममतेचं, खतपाणी द्यावे. वटवृक्ष जेव्हा होईल खरी जमापुंजी व्यक्तींची जतन होईल.. हळव्या मनाला अक्षय प्रेम तेव्हाच मिळेल पाहताक्षणी मनाचे सौंदर्य झळकत राहावे. आपल्याच वाणीत इतके मधुर शब्द असावे फक्त शब्दाला धार कोमलतेची असावी... हळव्या मनाला शब्दच वार करतात बरं... शब्द जर मधुर असेल तर हृदयातून, शब्द असरदार निघतात. अशा विचारानेच वेदनेचं गाव राहत नाही.. आसवांचा पूर वाहत नाही, सुखही स्वतःवर रूसत नाही, स्वतःपासून कोणतीच नाती दुरावत ही नाही. मनाच्या गाभाऱ्यात आकांक्षाची पणती तेवत ठेवावी... कुटुंबाची झेलणारी ढाल बनावी कठीण प्रसंगी मायेची उब देत रहावं.. अंधाराला आशेचे किरण बनावं खदखद हसणाऱ्या नशिबाला लाजवेल अशा व्यक्तिमत्वाची छबी बनवावी.. जी मिटवू शकणार नाही... व्यक्तिमत्व वात्सल्यतेची खाण असावी. तरच घरात डोळ्यात साऱ्या विश्वावर राज्य करू शकू... मनातील अंधःकार दूर होईल विचारांची खळगी संपुष्टात येईल. हाच सफल जीवनाचा मूलमंत्र आहे...

## वांझोटी माय

शिवाजी भा. ठाकरे
७५१७७९६७९९

शेवंता मुरलीधरची बायको. शेवंता तशी सर्वसामान्य परिवारातली मुलगी सहा भावांची लाडकी बहीण म्हटल्यावर, लहानपणापासून तशी ती लाडात वाढलेली. सुशिक्षित व सधन परिवारातल्या मुरलीधर सोबत तिचं लग्न झालं. नवी नवरी पाहायला गावातल्या बाया यायच्या. आणि आता पुढच्या वर्षी नातवाला पाहायलाच येऊ असं म्हणत. मग शेवंता तोंडाला पदर लावून लाजायची. गालातल्या गालात हसायची. नव्याचे नऊ दिवस सरले. लग्नाला दोन-तीन वर्ष झाले. परिवाराच्या लोकांनी सुद्धा आता पाळणा हलला पाहिजे. असं म्हणु लागले. मुरलीधर आणि शेवंताला ही तसंच वाटायचं.

लग्नाला दोन-तीन वर्ष झाले. नवीन लग्न झालेल्या मुलींच्या डोहाळे जेवणाच्या कार्यक्रमात जेव्हा शेवंता जायची. तेव्हा तिचंही मन हरकून जायचं. तिला वाटायचं मला ही बाळ होईल. मला ही अस बंगईत बसवतील पतीसोबत न्हानतील (आंघोळ) घालतील. डोहाळेचे गाणे म्हणतील, संध्याकाळी नवरा-बायकोला बंगईत बसवून झुलवतील.

कुणीतरी येणार... येणार गं.!! झुल्यात बसली आमची शेवंता आज. असं म्हणत बाया सांजीचे गाणे म्हणतील. माझ्या घरात पण असाच एक नवा पाहूणा येईल. नक्की येईल..! कारण माझ्या नंतर लग्न झालेल्या मुलींना सुद्धा बाळ होतंय. पण मी मात्र अजूनही तशीच आहे.. म्हणतात ना. भगवान के घर देर है मगर अंधेर नही. माझी व्यथा तो नक्की ऐकेल. आणि मलाही सुंदर असं बाळ होईल.

माझ्या पोटात बाळ असल्यावर हळूच तो माझे लक्ष वेधून घेईल. त्याच्या हालचाली मला सैरभैर करतील. पोटात जर बाळाने लाथ मारली, तर, मी अहो चा हात हळूच माझा पोटाला लावेल. दाखवेल ''बघा आपलं बाळ कसं मस्ती करतंय.'' खुदकन मनातल्या मनात हसायची. असं बाळाच्या आठवणीत तिचं मन हरकून जायचं... रोज एक बाळ माझ्या स्वप्नात येते.. अलगत झोप माझी उडवून नेते.. असं स्वतःच्या मनाशी गुणगुणायची.. तिला बाळ नसलं तरी तिच्या गल्लीतल्या लहान मुलांना पाहून मात्र ती नेहमी हरकून जायची. कधी कधी त्यांना गोळ्या-बिस्किट द्यायची. कधी त्यांच्यासोबत खेळायची. लहान मुलांमध्ये ती भान हरवून मस्त रमराण व्हायची.

लग्नाला आठ दहा वर्षे होऊन गेली. एकदा गल्लीत एका बाळाला जवळ घेतलं. दुर्दैवाने दुसऱ्या दिवशी ते आजारी पडलं.. तापाने फणफणलं, मग मात्र तिच्याजवळ कोणीही आपल्या मुलाला जाऊ देत नव्हतं. तिचं मन बाळासाठी आसुरलं होतं. एक दिवस तिला वाटलं. बाळाला जवळ घ्यावं. त्याचा लाड करावा असं तिला वाटलं. म्हणून एक दिवस ती शेजारच्या लहान मुलाला जवळ घ्यायला गेली. पण त्या मुलाच्या आईने तिला पाहिलं आणि मनसोक्त चोपलं.. वांझोटे आमच्या मुलांना कशाला झुरते. *''वांझोटी ती वांझोटीच''* असं म्हटलं. तेव्हापासून तिला सगळे वांझोटी म्हणायला लागले.

तिला स्वतःचं वांझ पण डसत होतं.. आता तिला कोणी डोहाळे जेवण, मुलांचं बारसं अशा कार्यक्रमात सुद्धा सहसा आमंत्रित करत नव्हतं... मुरलीधरला हे सर्व पाहवत नव्हतं पण पर्याय नव्हता. कारण डॉक्टरांनी सुद्धा निदान केलं होतं. त्यांना मूलबाळ होणार नाही म्हणून.

शेवटी, जैसी स्थिती आहे, तैशा परी राहे, कौतुक ते पाहे, संचिताचे.. आहे त्या परिस्थितीचा स्वीकार करत. शेवंताच्या समाधानासाठी त्यांनं घरी एक मांजरचं पिल्लू आणलं. तिला नाव दिलं मोनी.

मोनी तिची प्रचंड लाडकी. बाजाराच्या दिवशी मुरली तिच्यासाठी पापडी पेढा आणायचा. शेवंता तिला खूप जीव लावायची. शेवंता मोनी मध्ये पूर्णपणे गुंतून गेली होती. मोनी म्हणजे तिच्या पोटंच बाळ आहे. असं तिला वाटायचं.

# महाराष्ट्र परिषद : दुबईत मराठी भाषिकांचा आवाज बुलंद!

## आढावा

रविंद्र चव्हाण
मुंबई



व्यवसाय आणि नोकरीनिमित्त दुबईत राहणाऱ्या दीड लाख मराठी भाषिकांकरिता नुकतीच महाराष्ट्र परिषदेची स्थापना केली गेली. संयुक्त अरब अमिरातीत राहणाऱ्या भारतीय नागरिकांनी स्थापन केलेल्या इंडियन पीपल्स फोरम या व्यापक संस्थेची अंगीकृत संस्था म्हणून ही परिषद कार्यरत राहणार आहे. भारतीय जनता पार्टीचे महाराष्ट्र प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत दुबईत महाराष्ट्र कौन्सिलची मुहूर्तमेढ रविवार, ४ मे रोजी रोवली गेली.

स्थापना सोहळ्याप्रसंगी बोलताना रविंद्र चव्हाण म्हणाले की महाराष्ट्र काउन्सिलच्या महा हेल्पलाइन आणि युनायटेड महाराष्ट्र प्लॅटफॉर्म या अत्यंत महत्त्वाच्या उपक्रमांमुळे दुबईस्थित मराठी माणसांचा आवाज अधिक बुलंद होईल आणि त्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी अधिक बळ मिळेल. तसेच महाराष्ट्र सरकार आणि आयपीएफ यांच्यातील समन्वय वाढेल. तर काही कारणाने अडचणीत सापडलेल्या युएईस्थित मराठी लोकांना त्यांच्या मातृभाषेतून मदत उपलब्ध व्हावी या उद्देशाने ''०५० ३६५ हेल्प '' ही महा हेल्पलाइन सेवा २४ तास उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्याद्वारे शासकीय आणि कायदेशीर मदतीसाठी तज्ज्ञांचे मार्गदर्शन मिळणार आहे. त्याच बरोबर युनायटेड महाराष्ट्र या प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून युएईच्या सामाजिक क्षेत्रांत कार्यरत असलेल्या ४० संस्था एका छताखाली आल्या आहेत, यामुळे महाराष्ट्राचा एकतेचा संदेश युएईमध्ये सर्वदूर पोहोचेल असे प्रतिपादन रवींद्र चव्हाण यांनी केले. युएईमध्ये राहणाऱ्या भारतीयांची सद्य:स्थिती, त्यांच्या समस्या आणि प्रश्न समजून घेऊन त्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी भाजपाच्या वतीने सर्वतोपरी सहकार्य करण्यात येईल असे आश्वासन रवींद्र चव्हाण यांनी दिले. दुबईत मराठमोळ्या पद्धतीने आणि मोठ्या दिमाखात संपन्न झालेल्या या सोहळ्यात युएईमधील व्यावसायिक आणि सामाजिक क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाने महाराष्ट्राचे नाव उंचावणाऱ्या ग्लोबल महाराष्ट्रिय व्यक्तिमत्त्वांचा सन्मान करण्यात आला. ''इंडियन पीपल्स फोरम (आयपीएफ), याची स्थापना २०१३ मध्ये युएईमध्ये झाली होती. आयपीएफ ही युएईमधील भारतीय प्रवासी समुदायाला पाठिंबा देणारी सर्वात मोठी सामाजिक-सांस्कृतिक संघटनांपैकी एक आहे. आयपीएफ युएई २३ विभागांमध्ये कार्य करते ज्यामध्ये अमीरातीप्रमाणे अध्याय, १२ राज्य परिषदा, एक बिझनेस कौन्सिल आणि खास तरुणांसाठी आयपीएफ युवा व महिलांसाठी आयपीएफ महिला परिषद यांचा समावेश आहे. आयपीएफ युएईचे १०,००० हून अधिक सक्रिय समर्थक आहेत आणि आयपीएफ युएईने मरहबा मोदी २०१५ व अहलान मोदी २०२४



सारख्या युएईतील काही सर्वात मोठ्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात मोलाचा वाटा उचलला आहे. राहुल तुळपुळे यांच्या नेतृत्वाखाली आयोजित परिषदेत कोकण पदवीधर मतदारसंघाचे आमदार निरंजन डावखरे, भारताचे यूएई येथील राजदूत सतीश कुमार शिवन आयपीएफ युएई प्रमुख श्री.जितेंद्र वैद्य आणि शेकडो भारतीय विशेषतः मराठी भाषिक उपस्थित होते. रवींद्र चव्हाण यांची युएई दौऱ्यादरम्यान भारतीय दूतावासामध्ये भारताचे कॉन्सुलेट जनरल आदरणीय सतीश कुमार सिवन यांच्यासमवेत सदिच्छा भेट आणि चर्चा झाली. भारत-युएई व्यापारातील महाराष्ट्राची भूमिका, आदरणीय देवेंद्रजींच्या नेतृत्वात होऊ घातलेली महाराष्ट्राची औद्योगिक प्रगती आणि दुबईतील व्यावसायिकांना महाराष्ट्रात गुंतवणुकीच्या संधी अशा विविध विषयांवर चर्चा झाली. भाजपा कार्यकर्ता अध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी सांगितले की या व्यतिरिक्त दुबईतील दुबई बिजनेस कम्युनिटी आणि दुबई महाराष्ट्र मंडळाच्या सदस्यांसोबत महत्त्वपूर्ण बैठक झाली. त्यात कृतार्थ राजा, सागर देसाई, सबिना खोत, दिलावर दलवाई, प्रिया जाधव, प्रसाद दातार, सचिन जोशी, अमोल वैद्य, के. जी. नारकर, राकेश पाटील, शिरीष पटवर्धन, विजेंद्र सुर्वे, राहुल तुळपुळे, रवी चिटणीस, सुहास रेगे, रोहित आगले, आयपीएफ चे राहुल तुळपुळे आणि भाजपा आमदार निरंजन डावखरे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. महाराष्ट्राच्या औद्योगिक, आर्थिक व सामाजिक विकासाच्या अनुषंगाने अनेक महत्त्वाच्या विषयांवर या बैठकीत चर्चा झाली. तसेच महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरांविषयी अनेक सकारात्मक मुद्द्यांवर विचारांची देवाण-घेवाण झाली असे रविंद्र चव्हाण यांनी नमूद केले. रवींद्र चव्हाण यांनी दौऱ्यादरम्यान बीएपीएस हिंदू मंदिराचे मनोभावे दर्शन घेतले आणि सायंकाळी मंदिरात होणाऱ्या गंगा आरतीमध्ये सहभाग घेतला.यावेळी बीएपीएस हिंदू मंदिर ट्रस्टचे चेअरमन श्री. अशोक कोटेचा यांनी देवस्थानाच्या वतीने स्वागतपर सत्कार केला.याप्रसंगी बीएपीएस हिंदू मंदिर ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांशी हिंदू धर्म संस्कृतीचे जतन आणि संवर्धन करण्याच्या अनुषंगाने विविध विषयांवर रविंद्र चव्हाण यांनी चर्चा केली. भारत आणि यूएई यांच्यातील मैत्री ही दोन देशांच्या सांस्कृतिक आणि आर्थिक बंधनांचा सुंदर संगम असून यात महाराष्ट्राची भूमिका विशेष आहे असे रविंद्र चव्हाण यांनी सांगितले. गल्फ एज्युकेशन अँड फायनान्सचे विशाल साळुंखे, अक्षय पाटील, ज्युपिटर ग्लोबल मार्केटचे सागर पाटील, अधीरा ज्वेलर्सचे प्रकाश पवार आणि नमो रिफायनरीचे विनायक देशमुख, या सांगली जिल्ह्याच्या दुबईस्थित सुपुत्रांनी आपल्या व्यावसायिक कर्तृत्वाने दुबईमध्ये महाराष्ट्राचे नाव उंचावले आहे. तसेच दुबईतील पेशवा रेस्टॉरंट येथे ब्ल्यू-कॉलर कामगार सेवा कार्यक्रम संपन्न झाला. दुबईतील मराठी ब्लू-कॉलर कामगार, घरगुती साहाय्यक, समुदाय स्वयंसेवक कामगार यांचीही मोठी संख्या असून त्यांचे दुबई आणि महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेत मोलाचे सहकार्य आहे. सुरेश कुंभार, अनिता जाधव आणि गणेश माने या मराठी श्रमिकांचे कर्तृत्व युएईमध्येही अधोरेखित झालं आहे.

लोकरंग

# शेअर बाजाराची सावध वाटचाल

साप्ताहिक संवाद

कोणत्याही देशाची प्रगती किंवा अधोगती हि त्या देशाच्या शेअर बाजाराच्या आलेखाच्या स्थितीनुसार तपासता येते. सध्या जगभरात मंदीचे वातावरण आहेच, शिवाय भारत आणि पाकिस्तान या दोन देशामध्ये दहशतवादामुळे अक्षरश युद्धजन्य परिस्थिती निर्माण झालेली आहे. कोणत्याही क्षणी दोन्ही देशांमध्ये युद्धाचा भडका उडेल अशी परिस्थिती आहे. त्यामुळेच देशाचा आर्थिक कणा असलेल्या शेअर बाजारांनी म्हणजे बीएसई आणि एन एस इ ने सावध वाटचाल सुरु केली आहे. याच पार्श्वभूमीवर शेअर बाजाराची सद्यस्थिती या विषयावर अर्थतज्ज्ञ प्रफुल्ल छाजेड यांच्याशी आजचा साप्ताहिक संवाद

## भारत-पाक युद्धाच्या पार्श्वभूमीवर सध्या शेअर बाजाराची वाटचाल कशी सुरु आहे?



देशातील दोन्ही शेअर बाजारांनी सध्या सावध वाटचाल सुरु केली आहे. मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक १०५.७१ अंक वधारून ८०,७४६.७८ वर स्थिरावला आहे. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी ३४. ८० अंक वधारून २४,४१४.४० वर बंद झाला. भारतीय सैन्याने पाकव्याप्त काश्मीरमध्ये क्षेपणास्त्र हल्ले केल्यानंतर मुंबई शेअर बाजाराची हि प्रथम प्रतिक्रिया होती. त्यावेळी निर्देशांक अगदी ७९,९३७.४८ अंशावर इतक्या नीचांकी पातळीवर होता जो नंतर वधारला.टाटा मोटर्स सारख्या वाहन उद्योगातील निवडक कंपन्या आणि बँका यांच्या समभागांची गुंतवणूकदारांनी खरेदी केल्यामुळे सेन्सेक्स ची वाटचाल सकारात्मक होऊ शकली.

## खबरदारीचा उपाय म्हणून मुंबई शेअर बाजाराने कोणत्या उपाययोजना केल्या?

शेअर बाजार अर्थात बीएसई आणि एन एस इ अर्थात राष्ट्रीय शेअर बाजार यांनी खबरदारीचा उपाय म्हणून आंतरराष्ट्रीय वापरकर्त्यांसाठी त्यांच्या वेबसाईट्स ब्लॉक केल्या. बीएसई हे देशातील महत्वाचा भांडवल बाजार असल्याने संभाव्य सायबर धोक्यांसाठी देशांतर्गत आणि आंतर राष्ट्रीय स्तरावर जोखीमनावर सतत लक्ष ठेऊन असतो .पाकिस्तानवर केलेल्या हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर सावधगिरीचा उपाय म्हणून संरक्षणात्मक उपाय म्हणून सायबर प्रणालीचे संरक्षण करण्यासाठी या वेबसाईट्स ब्लॉक केल्या.

## भारत-पाक युद्धाच्या अनुषंगाने जागतिक स्तरावर शेअर बाजाराची स्थिती कशी आहे?

ऑपरेशन सिंदूर मुळे पाकिस्तानचा कराची स्टोक एक्स्चेंज कोसळला. बाजाराचा निर्देशांक के एस इ १०० बाजार उघडला तेंव्हा ६,५६०.८२ अंकांनी खालच्या पातळीवर उघडला होता. पाकिस्तानचा भांडवल बाजार हा नीचांकी पातळीवर पोहचला होता. आशियाई बाजारामध्ये दक्शीन कोरियाचा कॅस्पी , शांघायचा एन एस इ कंपोझिट आणि हाँकाँग चा हॅन्गसेंग हे निर्देशांक वधारले. जपानचा निक्केई २२५ ने घसरला. युरोप यामधील जवळपास सर्वच शेअर बाजार नकारात्मक राहिले.अमेरिकन शेअर बाजार देखील घसरला तर आंतर राष्ट्रीय तेल बाजारात क्रूड ऑईलचे भाव वधारले.

संकलन -संयोजन : सुशीलकुमार मोबाईल -९६१९५८२८३५
ईमेल -susheelkuma80@yahoo.com

# आपणचं तयार करा हे महाशब्दकोडे 36




### हे कोडे कसे सोडवाल

मित्रांनो
संकेतामध्ये काही शब्द दिलेले आहेत. हे शब्दच योग्यप्रकारे या बौकटीत लिहून हे महाशब्दकोडे आपणचं तयार करा.

**संकेत शब्दः—**

**दोन अक्षरी**

- आळ
- कवि
- कृपा
- कृमी
- खार
- जट
- तीव्र
- नर
- पर
- पद्य
- पाड
- मुल
- यान
- रफू
- रज्जू
- राह
- वर
- वर्धा
- वाद
- शंका
- शान
- शाप
- स्त्रव
- हमी
- हर

**तीन अक्षरी**

- ऐनक
- कनक
- किळस
- खडावा
- चरण
- चीत्कार
- टेकाड
- तपन
- पखाल
- पाचक
- पालव
- पावन
- पुनव
- पुराण
- प्रकार
- मशीन
- योग्यता
- रपका
- लचक
- लहर
- लांलच
- वटक
- वराह
- वामन
- सतार
- सपाट
- सहारा
- हजार
- हरिणी

**चार अक्षरी**

- आठवडा
- कानमंत्र
- कानशील
- डावपेच
- पराजय
- पुरवणी
- राजवैद्य
- वाटेकरी
- समीक्षक

**पाच अक्षरी**

- किलोमीटर
- खगोलशास्त्र
- त्रयोदशी
- व्रतवैकल्ये
- संग्रहालय

**सहा अक्षरी**

- अहमहमिका
- डराव डराव
- वन संरक्षक

**सात अक्षरी**

- मुठ सवा लाखाची

(उत्तर पुढील अंकी)

### मागील महाशब्दकोडेचे उत्तर



Uday Munde - 8446302691

# महाशब्दकोडे 415



**आडवे संकेत :—**

1) पश्चिम महाराष्ट्रात प्रसिद्ध व जागृत अशी श्रीगणेशाची आठ देवालये
5) भारतीय क्रिकेट संघाचा एक भूतपूर्व कर्णधार
9) सगळे, भरलेले, शेवटास गेलेले
10) शेवटचा, अन्त्य
11) देण्याघेण्याचा व्यवहार,
12) श्रीकृष्णाची सखी
13) महिन्याकाठी मिळणारे वेतन
14) पुरविणारे, पूर्ण करणारे
16) हिमालयात आढळणारा एक प्राणी
18) विष्णु, पराभव, हार
19) घट्ट बांधलेले, टिकाऊ
20) बुड, तळ
21) झोप, निद्रा
23) अनावर आनंदतिशयाने होणारा वातविकार
24) नपुंसक, भित्रा, नेभळट
25) अधिकार सूत्र
30) श्रीयुतचे संक्षिप्त रुप
32) वयाला 60 वर्षे पूर्ण झाल्यावर करावयाचा समारंभ
34) हत्तीचा चालक
35) आदरपूर्वक पूर्णपणे मान्य
37) शरीरातील त्रिदोषांपैकी एक
38) धान्य मोजण्याचे एक परिमाण हिंदीत सिंह
39) क्रोध, संताप
40) शरीर,
41) ताबा, निर्बंध, नियमन
43) प्रसिद्ध करणे
44) पादत्राण
45) अनुमान, अंदाज
46) बशीचा जोडीदार
48) त्रिकूट, तिघांचा समुदाय
49) खारट, लवण
50) धैर्य, दृढता, सोशीकपणा
52) रिकामे
53) जागा, ठिकाण, जमीन
57) दर अडीच वर्षांनी बारा महिन्यात एक महिना वाढविणे
59) विशेष उल्लेखनीय बातमी
61) रक्त सांडणे
63) स्कंध
64) दुर्योधनाचा मामा
66) दाबून टाकणे
68) सावधान, दक्ष
70) वाक्यात क्षणिक थांबण्याचे चिन्ह
72) चोप, ताडन
73) दूध, साखर, लोणी घालून केलेले पक्वान्न
74) प्रार्थना, स्तुती, स्तोत्र
76) बळकट, मजबूत
77) मोठा हातोडा
78) राखण करणारा, रक्षक (हिं.)
79) दूध देईनाशी झालेली गाय

**उभे संकेत :—**

1) स्त्रियांनी गळ्यात घालण्याचा एक अलंकार
2) ओढून फाडून फेकणे
3) नारी, स्त्री
4) यमलोकी, दुष्टांना होणाऱ्या वेदना
5) वीज, विद्युलता
6) डुक्कर
7) महाभारतात अंध धृतराष्ट्राची पत्नी
8) इंग्रजी कालगणनेत ज्या वर्षी फेब्रुवारीत 29 दिवस येतात ते वर्षे
9) नदीच्या पात्रात पावसाच्या पाण्याने वाढलेला प्रवाह
15) ताठा, गुर्मी
17) एकेक बाब क्रमवार घेऊन
22) मंत्राची पुनः पुनः केलेली उजळणी
23) विरोध दर्शविणे, अडथळा प्रतिकूल वर्तन
26) दूध विरजल्यावरची स्थिती
27) हमाल, ओझी वाहणारा
28) गावाची सीमा
29) आलेल्या पाहुण्यांचे मिष्टान्न देऊन केलेले स्वागत
31) मृत, मेलेला
33) समुद्रावर जहाजाची दिशा दर्शविणारे यंत्र
35) मुजोर, वरचढ, डोईजड
36) शेत जमिनीवरील कर
42) तिसरी व्यक्ती
43) धुणे
47) आजूबाजूचा प्रदेश
51) गरज, आवश्यकता
54) एक श्रीरामपुत्र
55) व्यायामशाळेत पुरलेला वाटोळा खांब
56) जहर, गरळ
57) धारदार टोक असलेले
58) पायापासून डोक्यापर्यंत
60) हृदय फाडणारे,
62) अंधार
65) थोडे, कमी, लहान,
67) वंदन, नमस्कार,
68) शंभर अरब, बाराव्या स्थानाची संख्या
69) रमणारा, पति
71) मलमूत्र, प्राण्यांची घाण,
72) महिना
75) एक वृक्षविशेष ●

(उत्तर पुढील अंकी)

### मागील महाशब्दकोड्याचे उत्तर



Uday Munde - 8446302691

## राशी-भविष्य

**मेष :** उत्पन्नात वाढ होण्याची शक्यता आहे. तुमचा जोडीदार तुम्हाला आनंदी ठेवण्याचा प्रयत्न करेल.कामात काही अडचणी येऊ शकतात.

**वृषभः** आर्थिक लाभ होण्याची शक्यता आहे. तुमच्या वरिष्ठांच्या अपेक्षा पूर्ण करण्याचा प्रयत्न करा. तुमच्या आरोग्याबाबत सावधगिरी बाळगा.

**मिथून :** आर्थिक स्थिती सुधारण्याचा प्रयत्न कराल. आरोग्य सुधारेल. एखादा मित्र किंवा नातेवाईक तुम्हाला भेटायला येऊ शकतो.

**कर्क :** परदेशात झालेल्या भागीदारी-तून तुम्हाला फायदा होईल. कुटुंबासोबत वेळ घालवून तुम्हाला बरे वाटेल. काही मालमत्ता तुमच्या नावावर असू शकते.

**सिंह :** एखाद्याला दिलेले कर्ज परत मिळेल. करिअरमध्ये प्रगतीची शक्यता आहे. कुटुंबातील एखाद्या सदस्याकडून तुम्हाला सहकार्य मिळेल.

**कन्या :**उत्पन्नाचे नवीन स्रोत उघडतील. निरोगी राहण्यासाठी निरोगी जीवनशैलीचा अवलंब करा. करिअरसाठी दिवस यशाने भरलेला असेल.

**तुळ :** आर्थिक परिस्थिती स्थिर राहील. नोकरीच्या शोधात असलेल्या लोकांना यश मिळू शकते. तुमच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करू नका.

**वृश्चिक :** ऑफिसमध्ये प्रेमसंबंधांपासून दूर राहा. मित्रांसोबत बाहेर जाण्याचा प्लॅन करू शकता. तुम्ही चांगल्या किमतीत मालमत्ता खरेदी करू शकता.

**धनु :** शहाणपणाने विचार करूनच गोष्टींवर खर्च करा. तुम्ही तुमच्या आरोग्याबाबत जागरूक असाल. करिअरसाठी दिवस चांगला राहील.

**मकर :** उत्पन्नाचे नवीन स्रोत उघडतील. कामाच्या ठिकाणी एक नवीन सहकारी तुम्हाला मदत करेल. आरोग्य सुधारेल. जोडीदारासोबत काही समस्या असू शकतात.

**कुंभ :** अतिरिक्त खर्च टाळा. कामाच्या ठिकाणी तुम्हाला सहकाऱ्यांकडून सहकार्य मिळणार नाही. आरोग्य सुधारेल. कुटुंबात शांती आणि आनंदाचे वातावरण राहील.

**मीन :** तुम्ही एखाद्यावर पैसे खर्च करू शकता. तुमच्या आरोग्यासाठी नियमित व्यायाम करत राहा. कामावर तुमच्या सहकाऱ्यांवर लक्ष ठेवा.

आचार्य पं. श्रीकांत पटैरिया: मो. ७८७९३७२९१३

# बोगस जन्म प्रमाणपत्र देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई केव्हा?

## डॉ. किरीट सोमय्या यांचा सवाल : ६ हजार बोगस प्रमाणपत्र रद्द

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**




**अकोला, दि. ०९ :** बांग्लादेशी घुसखोरी आणि बोगस जन्म प्रमाणपत्र घोटाळ्यात अकोला जिल्ह्यात ६ हजार बोगस प्रमाणपत्र रद्द करण्यात येत असल्याचा गोप्यस्पोट भाजपचे माजी खासदार डॉ. किरीट सोमैया यांनी केला आहे. धक्कादायक म्हणजे या ६ हजारांपैकी अनेक लोक सध्या गायब असून ते कुठे गेले, याचा तपास लागलेला नाही. बोगस जन्म प्रमाणपत्राच्या या घोळात जन्म प्रमाणपत्र देणाऱ्या तहसिलदार, नायब तहसीलदारासह कर्मचाऱ्यांवर कारवाई का? करण्यात आली नाही, असा सवाल डॉ. किरीट सोमैया यांनी उपस्थित केला आहे. बांग्लादेशी घुसखोरी आणि बोगस जन्म प्रमाणपत्राचे प्रकरण सध्या गाजत आहे. राज्यातील अनेक जिल्ह्यात बोगस जन्म प्रमाणपत्र दिल्याचा गोप्यस्पोट डॉ. सोमैया यांनी करीत या प्रकरणाचा घोटाळा उघडकीस आणला आहे. अकोला जिल्ह्यातही सुमारे १५ हजारांवर बोगस जन्म प्रमाणपत्र दिल्याचे प्रकरण त्यांनी लावून धरले आहे. यासंदर्भात शुक्रवारी (ता.९) डॉ. किरीट सोमैया यांनी अकोल्यात येत जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी भेट घेऊन दोषी अधिकाऱ्यावर कारवाई करण्याची मागणी केली. यावेळी प्रसिद्धी माध्यमांशी बोलताना डॉ. सोमैया म्हणाले, की अकोला जिल्ह्यात सुमारे १५ हजार बोगस जन्म प्रमाणपत्र अर्ज सादर झाले होते. या अर्जापैकी ६ हजार प्रमाणपत्र रद्द करण्यात आली आहेत. मात्र, धक्कादायक बाब म्हणजे या ६ हजार अर्जदारांपैकी अनेक लोक सध्या गायब असून ते गेले कुठे? याचा तपास लागलेला नाही. ६ हजार प्रमाणपत्र रद्द करण्यात आली असुन उर्वरीत ९ हजार प्रमाणपत्रांचे पुर्नतपासणी करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. या घोटाळ्यात जन्म प्रमाणपत्र देणाऱ्या तहसिलदार, नायब तहसिलदारांवर कारवाई का? करण्यात आली नाही, असा त्यांनी उपस्थित केला. यावेळी भाजपचे आमदार वसंत खंडेलवाल,किशोर मांगटे पाटील, विजय अग्रवाल, जयंत मसने, गिरीष जोशी यांच्यासह भाजपचे पदाधिकारी त्यांच्यासोबत उपस्थित होते.

# अकोला रेल्वे स्थानकावर पोलिसांचा थरारक ‘मॉक ड्रिल’

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**



**अकोला, दि. ९ :** अकोला रेल्वे स्थानकावर आज दहशतवाद्यांनी ट्रेन आणि प्रवाशांवर ताबा मिळवला आणि काही वेळातच पोलिसांनी कमांडो स्टाईलमध्ये धडक कारवाई करून प्रवाशांची सुटका केली! हे सगळं खरं नव्हे, तर पोलिस विभागाने आयोजित केलेल्या मॉक ड्रिलचा एक भाग होता, जो प्रत्यक्ष हल्ल्याच्या परिस्थितीत पोलिसांची तत्परता तपासण्यासाठी आयोजित करण्यात आला होता. दहशतवाद्यांच्या हल्ल्याच्या धोक्याच्या पार्श्वभूमीवर अशा प्रकारची पूर्वतयारी महत्त्वाची मानली जाते. या मॉक ड्रिलमध्ये दाखवण्यात आले की, काही दहशतवाद्यांनी अकोला रेल्वे स्थानकावरील प्लॅटफॉर्म क्रमांक ६ वर तैनात असलेल्या एका प्रवासी ट्रेनवर ताबा मिळवला. प्रवाशांना बंधक बनवून त्यांनी धमक्या दिल्या, मात्र काही मिनिटांतच अकोला पोलिस, दहशतवादविरोधी पथक, क्यूआरटी (क्विक रिॲक्शन टीम), सीआरपी आणि स्थानिक पोलिस स्टेशनच्या पथकांनी संयुक्तपणे कारवाई करत सर्व बंधक प्रवाशांची सुटका केली आणि दहशतवाद्यांना काबूत आणले.

# अवघ्या सहा तासात पोलिसांनी चोरीचा लावला छडा



**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**स्थानिक गुन्हे शाखेची धडाकेबाज कारवाई**

**अकोला, दि. ९ :** शहरातील मध्यवर्ती भागात असलेल्या प्रतिष्ठित सोन्याच्या दुकानात चोरीची एक मोठी घटना घडली असून, या प्रकरणात स्थानिक गुन्हे शाखा, अकोला यांनी अवघ्या ६ तासांत गुन्हा उघडकीस आणून ३.१८ लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे. कमी श्रमात जास्त पैसा मिळवण्याच्या हवासापोटी सदर महिलेने हा मार्ग अवलंबल्याचे पोलीस तपास समोर आले आहेत.

८ मे २०२५ रोजी दुपारी १२.४५ च्या सुमारास एक अनोळखी महिला ग्राहक बनून एका प्रतिष्ठित सोन्याच्या दुकानात आली होती. चेहऱ्यावर स्कार्फ घालून तिने आपली ओळख लपवत दुकानातील सेल्समन प्रविण बालाजी वडजे यांच्याकडे चैन पाहण्याचा बहाणा केला. सेल्समनने चैनचा ट्रे समोर ठेवला असता, तिने चतुराईने नजर चुकवत ४ ग्रॅम व २० ग्रॅम वजनाच्या दोन सोन्याच्या चैन चोरून नेल्या. या दागिन्यांची किंमत अनुक्रमे ४२ हजार रुपये व २ लक्ष ६ हजार ६२२ रुपये इतकी असून, एकूण मुद्देमाल २ लक्ष ४८ हजार ६२२ रुपये मूल्याचा आहे. घटनेचे गांभीर्य लक्षात घेता पोलीस अधीक्षक बच्चन सिंह यांच्या आदेशानुसार, पोलीस निरीक्षक शंकर शेळके (स्थानीय गुन्हे शाखा, अकोला) व पो.नि. जयंत सातव (सिव्हील लाईन पोलीस स्टेशन) यांनी घटनास्थळाची पाहणी केली. त्यानंतर स्थागुशा पथकाला तपासाची जबाबदारी देण्यात आली. तांत्रिक विश्लेषण, सीसीटीव्ही फुटेज आणि गुप्त बातमीदारांच्या सहाय्याने गुन्हे शाखेच्या पथकाने अवघ्या काही तासांत आरोपीचा शोध लावला. आरोपी महिला ईशा सत्यप्रकाश पांडे (२२) रा. कैलास टेकडी, अकोला हिच्याकडून चोरी केलेले दोन्ही सोन्याचे दागिने आणि गुन्ह्यात वापरलेले टीव्हीएस ज्युपीटर दुचाकी (किंमत ७० हजार रुपये) असा एकूण ३ लक्ष १८ हजार ६२२ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**कारवाईत सहभागी अधिकारी व कर्मचारी:**

या संपूर्ण कारवाईत पो.उपनि. माजीद पठाण, एएसआय गणेश पांडे, पोहेकॉ रवि खंडारे, महेंद्र मलिये, वसीमोद्दीन शेख, एजाज, अब्दुल माजीद, फिरोज खान, भास्कर धोत्रे, अशोक सोनोने, अमोल दिपके, सतिष पवार, राहुल गायकवाड, मपोहेकॉ तुळसा दुबे, पो.हवा प्रशांत कमलाकर आदींनी महत्त्वपूर्ण योगदान दिले.

# कन्हानदीच्या पाण्यात पोहण्याचा मोहाने एकाचा बुडून मृत्यू

**खापरखेडा :** खापरखेडा पोलीस स्टेशन हद्दीतील बीड बिना परिसरात कन्हान नदीत सेल्फी काढण्याचा नाद व नदीच्या पाण्यात पोहण्याचा मोह इयत्ता १० वी ची परीक्षा झालेल्या मुलांना आवरला नाही निकालाची वाट पाहता दिवस घालण्या साठी चारही मित्र दुपारी ३ वाजता आपल्या राहते घरी इंदोरा नागपूर वरून बिना संगम परिसरातील बीड बिना येथील कन्हान नदीच्या पात्रात आले स्थळीच १५ वर्षीय युवकाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना गुरुवारी सायंकाळी घडली. नैतिक अंकुश बागडे वय १५, रा. समता नगर, नागपूर असे मृत मुलाचे नाव असून, तो आणि त्याचे मित्र यूट्यूबसाठी व्हिडीओ शूट करण्यासाठी येथे आले होते. सदर घटना गुरुवार ८ मे रोजी सायंकाळी सुमारे ४ वाजताच्या सुमारास घडली. नैतिकसह यश मडावी १६, अमन बागडे १५ आणि प्रणय बोरकर १४ हे चौघे घटना स्थळीच पाण्यात पोहण्या करिता थेट खोल पाण्यात पडला. त्याला वाचवण्यासाठी यश मडावीने पाण्यात उडी घेतली, मात्र खोल पाण्याचा अंदाज न आल्याने तोही बुडू लागला. सुदैवाने एका दगडाला धरून त्याने स्वत:चा जीव वाचवला. या घटनेमुळे इतर मित्रांनाही मोठा धक्का बसला आहे घटनेची माहिती मिळताच नैतिकच्या कुटुंबीयांनी खापरखेडा पोलिस ठाण्यात धाव घेतली असता खापरखेडा पोलिसांकडून घटना स्थळी पोहोचण्या ऐवजी उडवा उडवीचे प्रश्न उत्तरे केले घटना खापरखेडा हद्दीतील नसून कन्हान हद्दीत आहे असे परिवाराला चौकशी नकरता उत्तरे देण्यात आली कन्हान पोलीस स्टेशनला माहिती कळवा कारणास्तव घटना स्थळी पोहचण्या करीत दिवसाची रात्र केली असल्याचा आरोप मृतकाच्या परिवार यांनी केले.

# १२ किलो गांजा आणि चारचाकी वाहनासह १४ लक्ष ४० लाखांचा मुद्देमाल जप्त

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**




**अकोला, दि. ९ :** शहरातील अंमली पदार्थ विक्रीच्या साखळीवर मोठा आघात करत स्थानिक गुन्हे शाखा, अकोला यांच्या पथकाने मुसा कॉलनी, मोहता मिल रोड परिसरात धडक कारवाई केली. या कारवाईत १२ किलो ८० ग्रॅम गांजा आणि एक टाटा ऐरिआ चारचाकी वाहन असा एकूण १४ लक्ष ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

९ मे रोजी स्थानिक गुन्हे शाखेला गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, रामदासपेठ पोलीस स्टेशनच्या हद्दीतील मुसा कॉलनी, अकोला येथे एक इसम गांजाची विक्री करतो आहे. त्याने गांजाचा साठा आपल्या घरालगत असलेल्या खुल्या प्लॉटमध्ये ठेवलेल्या पांढऱ्या रंगाच्या टाटा कंपनीच्या चारचाकी वाहनात लपवून ठेवला आहे, अशी माहिती मिळताच पोलिसांनी तत्काळ त्या ठिकाणी धाड टाकली.

छाप्यामध्ये आरोपी राजीक खान लतीफ खान (२६ ), रा. मुसा कॉलनी, अकोला याच्या ताब्यातून टाटा एरिआ वाहन ( ३० ३१३२) च्या डिक्कीत लपवून ठेवलेला १२ किलो ८० ग्रॅम गांजा किंमत अंदाजे २ लक्ष ४० हजार रुपये) आणि चारचाकी वाहन (किंमत अंदाजे १२ लक्ष रुपये) असा एकूण १४ लक्ष ४० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीविरोधात एन.डी.पी.एस. ॲक्ट अंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला असून, त्यास पुढील कारवाईसाठी पोलीस स्टेशन रामदासपेठ, अकोला यांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

ही यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक बच्चन सिंह, अपर पोलीस अधीक्षक अभय डोंगरे, आणि पोलीस निरीक्षक शंकर शेळके (स्थागुशा) यांच्या मार्गदर्शनात पार पडली. कारवाईत स.पो.नि. विजय चव्हाण, पो. उप.नि. माजीद पठाण, सहा. पो. नि. राजपालसिंह ठाकुर, तसेच पोलीस अंमलदार रविंद्र खंडारे, अब्दुल माजीद, महेंद्र मलिये, वसिमोद्दीन, मोहम्मद ऐजाज, अशोक सोनवणे, भिमराव दिपके आणि चालक अक्षय बोबडे यांचा सहभाग होता.

मणपुरम | होम फायनान्स लि.

**मनप्पुरम होम फायनान्स लिमिटेड पूर्वी मणप्पुरम होम फायनान्स प्रायव्हेट लिमिटेड**

CIN : U65923KL2010PLC039179

Regd कार्यालय: IV/470A (OLD) W/638A (नवीन) मणप्पुरम हाऊस वलापद त्रिशूर, केरळ 680567
कॉर्प ऑफिस: मणप्पुरम होम फायनान्स लिमिटेड, तिसरा मजला, युनिट क्रमांक 301 ते 315, ए विंग, 'कनकिया वॉल स्ट्रीट', अंधेरी-कुर्ला रोड, अंधेरी पूर्व, मुंबई-400093, महाराष्ट्र. फोन नंबर: 022-66211000, वेबसाइट: www.manappuramhomefin.com

**मागणी सूचना**

तर मणप्पुरम होम फायनान्स लि.चे अधिकृत अधिकारी, आमचे नोंदणीकृत कार्यालय IV/470A (जुने) w/638A (नवीन), मणप्पुरम हाऊस, वलपाड, त्रिशूर, केरळ-680567 आणि भारतातील विविध ठिकाणी शाखा असलेले (यापुढे "MAHOFIN" म्हणून संबोधले जाते) ही कंपनी अधिनियम 56 अंतर्गत नोंदणीकृत कंपनी आहे. सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्टच्या कलम 2 च्या उप-कलम (1) च्या खंड (एम) च्या उप-खंड (iv) च्या अर्थातील संस्था. 2002 (यापुढे कायदा म्हणून संदर्भित) अधिसूचना क्रमांक S.O सह वाचले. 3466 (E) दिनांक 18 डिसेंबर 2015 रोजी शासनाने जारी केले. भारताचा, वित्तीय सेवा विभाग, वित्त मंत्रालय, नवी दिल्ली, इतर गोष्टींबरोबरच बांधकाम आणि/किंवा निवासस्थानांच्या खरेदीसाठी कर्ज देण्याचे व्यवसाय करत आहे आणि खाली नमूद केलेल्या चार्टच्या स्तंभ क्रमांक 2 मध्ये नमूद केल्यानुसार कर्जदार/सह-कर्जदारांनी MAHOFIN कडून कर्ज मिळवले आहे आणि MAHOFN हे SARESFA च्या कायद्यांतर्गत सुरक्षित अधिकार आणि कर्जदाराच्या कायद्यांतर्गत कर्ज घेतलेले आहे. सुरक्षा व्याज (अंमलबजावणी) नियम 2002 च्या नियम 2 सह वाचलेल्या उक्त कायद्याच्या 13(2) मध्ये खाली नमूद केल्याप्रमाणे कर्जदार/सह-कर्जदारांना नोटीसमध्ये नमूद केलेली रक्कम पुढील व्याजासह परत करण्याचे आवाहन करणारी मागणी नोटीस जारी केली आहे. त्यावर नोटीस दिल्यानंतर 60 दिवसांच्या आत, परंतु त्यातील काहींना विविध कारणांमुळे नोटिसा बजावल्या जाऊ शकल्या नाहीत. त्याव्यतिरिक्त खाली दिलेल्या कर्जदारांच्या माहितीच्या उद्देशाने, या सार्वजनिक नोटीसद्वारे या कर्जदारांना सूचित केले जात आहे.

| क्र. क्र. | कर्जदार/सह-कर्जदार/लॅन/शाखेचे नाव | सुरक्षित मालमत्तेचे वर्णन कोणत्या व्याजाच्या संदर्भात तयार केले गेले आहे | NPA तारीख | नोटीस पाठविण्याची तारीख आणि थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | वसंता प्रकाश शिंदे मंजू वसंता शिंदे गजूसिंह बागसिंह मांडलोई / NLAP0050006050/अकोला | घर मालमत्ता क्र. ७७, एकूण प्रशासन ८२.९९ चौरस मीटर, धनगरपूर ग्रामपंचायत, मौजे-चांडोल, ता. व जिल्हा बुलढाणा, बुलडाणा, पो. म्हसळा बीके, बुलढाणा, महाराष्ट्र, पिन: ४४३१०६. पूर्व-श्री. मनोहर कांदजे, पश्चिम-श्री. गजानन संतोष काळे, दक्षिण-रोड, उत्तर-श्री. लक्ष्मण संतोष काळे | 13-04-2025 | १७-०४-२०२५ आणि रु.७२०९८१/- |

म्हणून, वर नमूद केल्याप्रमाणे, कर्जदार/सह-कर्जदारांना नोटीस देण्यात आली आहे, ही नोटीस प्रकाशित झाल्यापासून 60 दिवसांच्या आत, संबंधित कर्जदार/सह-कर्जदाराविरुद्ध, वर दर्शविल्याप्रमाणे एकूण थकबाकीची रक्कम भरण्याचे आवाहन केले आहे. संबंधित कर्जदार/सह-कर्जदाराने पुढील व्याजासह एकूण थकबाकीची रक्कम भरण्यात अयशस्वी झाल्यास, MAHOFIN वर वर्णन केल्याप्रमाणे मालमत्तेवरील सुरक्षिततेच्या व्याजाच्या अंमलबजावणीसाठी कलम 13(4) घेण्यास बंधनकारक असेल, कायदा आणि येथे केलेल्या नियमांनुसार विहित केलेल्या इतर रीतीने नोटीस देण्यासाठी पावले उचलली जात आहेत. SARFAESI कायद्याच्या कलम 13(8) मध्ये तपशिल दिल्याप्रमाणे, सार्वजनिक लिलावासाठी किंवा खाजगी करारासाठी नोटीस प्रकाशित होण्याच्या तारखेपूर्वी कोणत्याही वेळी MAHOFIN द्वारे केलेल्या खर्च, शुल्क आणि खर्चासह संपूर्ण देय रक्कम भरल्यावर सदर तारणाची पूर्तता केली जाऊ शकते. लक्षात घ्या की SARFAESI कायद्याच्या S-13 (13) नुसार, तुम्हाला याद्वारे सुरक्षित मालमत्तांचे हस्तांतरण आणि/किंवा विक्री, भाडेपट्ट्याने किंवा इतर कोणत्याही प्रकारे व्यवहार करण्यापासून प्रतिबंधित केले आहे.

तारीख: 10 मे 2025 | ठिकाण: महाराष्ट्र | Sd/- अधिकृत अधिकारी मणप्पुरम होम फायनान्स लि

महाराष्ट्र शासन

# उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी यांचे कार्यालय, बाळापूर जि. अकोला

दूरध्वनी क्र ०७२५७-२३२१३३ | ई-मेल आयडी sdo.balapur@rediffmail.com

क्र /उविअ/शिरस्तेदार/कावि-६७८/२०२५ | दिनांक २९/०४/२०२५

## अधिसूचना
## (कलम-१९)

**न्याय नुकसान भरपाई मिळण्याचा आणि भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत यामध्ये पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम- २०१३ अंतर्गत.**

**कलम-१९ ची अधिसूचना**

**भूसंपादन प्रकरण क्र. एलएक्यु-४७/लोहारा/०१/२०२१-२०२२ मौजे-लोहारा ता. बाळापूर जि. अकोला**

ज्याअर्थी समुचित शासन असलेल्या अकोला जिल्हयाचे जिल्हाधिकारी यांनी त्यांचे आदेश क्र. जिका/अका/भूसंपादन आ.क्र.९२५/कावि-६१९/२०२०-२०२१ दिनांक १० ऑगष्ट, २०२१ नुसार भूसंपादन प्रकरणात संपूर्ण कार्यवाही करणेबाबत आदेशित केले आहे. त्यानुसार भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (ज्याचा उल्लेख पुढे उक्त अधिनियम असा करण्यात आला आहे) च्या कलम ११ च्या पोट कलम (१) व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन अधिसूचना दिनांक ०९ जुलै, २०२४ अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढली आहे. आणि त्याव्दारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेल्या जमीनीची, अनुसूची दोन मध्ये अधिक तपशिलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थ, भूसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी बाळापूर यांनी कलम १५ च्या पोट कलम (२) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीनसंपादीत करण्याची आवश्यकता आहे. याबाबत त्यांची खात्री वाला पूर पटली आहे. म्हणुन, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट कलम (१) च्या तरतुदींन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीनीची आवश्यकता आहे असे याव्दारे घोषीत करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, अनुसूची तीन मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटूंबियाच्या पुनर्वसनव पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी पुनर्वसाहत क्षेत्र महणुन निर्धारीत केले असल्याचे याव्दारे घोषीत केले जात असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेच्या सारांश अनूसूची चार मध्ये विनिर्दिष्ट केला आहे.

आणि ज्याअर्थी, खालील अनुसूची ३ मध्ये पुनर्वसाहत क्षेत्राचे व अनुसूची ४ मध्ये पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश निरंक आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये समुचीत शासन हे जिल्हाधिकारी आहेत.

**अनुसूची - एक**
**संपादीत करावयाच्या जमिनीचे वर्णन**
**अनुसूची - एक**
**संपादीत करावयाच्या जमिनीचे वर्णन**

**गांवः- लोहारा** | **तालुकाः- बाळापूर** | **जिल्हाः- अकोला**

| अ.क्र | गट क्रमांक | संयुक्त मोजणीनुसार भूसंपादीत होणारे क्षेत्र (हे. आर मध्ये) |
|---|---|---|
| १ | ५४ | ०.०१ |
| २ | ६० | ०.०१ |
| ३ | ६९ | ०.०१ |
| ४ | ७२ | ०.१० |
| ५ | ७२ | ०.१९ |
| ६ | ७२ | ०.२० |
| ७ | ९० | ०.०३ |
| ८ | ९४ | ०.२३ |
| ९ | १५९ | ०.५० |
| १० | १५९ | ०.०६ |
| ११ | १५९ | ०.२४ |
| १२ | १५९ | ०.२२ |
| १३ | १५९ | ०.०१ |
| १४ | १७१ | ०.०६ |
| १५ | १८३ | ०.०१ |
| १६ | १८४ | ०.१९ |
| १७ | ५२७ | ०.०६ |
| १८ | ५४९ | ०.३९ |
| १९ | ५७८ | ०.२८ |
| २० | ७७६ | ०.०८ |
| २१ | ७७७ | ०.०१ |
| २२ | ८११ | ०.०१ |
| २३ | ८१३ | ०.०१ |
| एकुण संपादीत क्षेत्र | | २.९१ |

**अनुसूची- दोन**
सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण

**प्रकल्पाचे नांव :-** कवठा बॅरेज (संग्राहक) प्रकल्प ता. बाळापूर जि. अकोला अंतर्गत मौजे लोहारा शिवारातील जीन बुडीत क्षेत्राकरीता भूसंपादन करणेकरीता.

**प्रकल्पाच्या कार्याचे वर्णन:-** कवठा बेरेज (संग्राहक) प्रकल्प ता. बाळापूर जि. अकोला अंतर्गत मौजे लोहारा शिवारातील जीनबुडीत क्षेत्राकरीता भूसंपादन करणेकरीता.

**अनुसूची- तीन**
बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे. :- या प्रकल्पामुळे कोणतेही गाव बाधित होत नाही.

**अनुसूची- चार**
महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र.३८ दिनांक १३ मार्च २०१५ अन्वये सिंचन प्रकल्पांना सामाजिक प्रभाव निर्धारणापासून सूट दिली असल्यामुळे सामाजिक प्रभाव निर्धारण करण्यात आलेले नाही त्यामुळे त्याचा सारांश प्रकाशित करण्याचा प्रश्न उदभवत नाही.

**अनुसूची- पाच**
विस्थापन होत नसल्यामुळे व प्रशासकाची नेमणुक झालेली नसल्यामुळे माहिती निरंक.

दिनांक:-२९/०४/२०२५
ठिकाण:- बाळापूर

**(अनिरुध्द बक्षी)**
**उपविभागीय अधिकारी तथा**
**भूसंपादन अधिकारी बाळापूर**

## आयपीएल गुणतालिका

| Teams | M | W | L | T | NR | PTS | NRR |
|---|---|---|---|---|---|---|---|
| गुजरात | 11 | 8 | 3 | 0 | 0 | 16 | +0.793 |
| बेंगलुरु | 11 | 8 | 3 | 0 | 0 | 16 | +0.482 |
| पंजाब | 11 | 7 | 3 | 0 | 1 | 15 | +0.376 |
| मुंबई | 12 | 7 | 5 | 0 | 0 | 14 | +1.156 |
| दिल्ली | 11 | 6 | 4 | 0 | 1 | 13 | +0.362 |
| कोलकाता | 12 | 5 | 6 | 0 | 1 | 11 | +0.193 |
| लखनौ | 11 | 5 | 6 | 0 | 0 | 10 | -0.469 |
| हैदराबाद | 11 | 3 | 7 | 0 | 1 | 7 | -1.192 |
| राजस्थान | 12 | 3 | 9 | 0 | 0 | 6 | -0.718 |
| चेन्नई | 12 | 3 | 9 | 0 | 0 | 6 | -0.992 |

# भारत पाकिस्तानमधल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर आयपीएल स्थगित

नवी दिल्ली : दि. ९ प्रतिनिधी




भारत पाकिस्तान सीमांवरच्या वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर आयपीएल स्पर्धा स्थगित होण्याची चिन्हं होती. जी चिन्हं आता प्रत्यक्षात उतरली आहेत. या स्पर्धेला स्थगिती देण्यात आली आहे. भारत सरकारशी सल्लामसलत केल्यानंतर बीसीसीआयने याबाबत अधिकृत दुजोरा दिला असून, ही स्पर्धा पुढे ढकलण्याची योग्य वेळ नाही आणि खेळाडूंच्या सुरक्षेशी तडजोड होणार नाही हे पाहणं महत्त्वाचं असल्याचं म्हटलं होतं. त्यानंतर आता आयपीएलची स्पर्धा स्थगित करण्यात आली आहे.धरमशाला येथे झालेल्या ब्लॅक आऊटमुळे पंजाब किंग्जचा दिल्ली कॅपिटल्सविरुद्धचा सामना पहिल्या डावातच रद्द करण्यात आल्यापासून आयपीएलच्या उर्वरित स्पर्धेवर प्रश्नचिन्ह निर्माण झालं. याआधी मिळालेल्या माहितीनुसार यापूर्वी मिळालेल्या वृत्तानुसार, बीसीसीआयच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी शुक्रवारी सकाळी सरकारशी चर्चा केली. आणि सध्या तरी त्यांनी आयपीएल स्थगित करण्याचा निर्णय घेतल्याचे समजते. ''आम्हाला भविष्याबद्दल खात्री नाही. बरीच संदिग्धता असल्याने पुढे काय होईल हे सांगता येत नाही. तूर्तास वाट पहावी लागेल,' असे बोर्डातील सूत्रांनी इंडियन एक्स्प्रेसला सांगितलं आहे. त्यामुळे ही स्पर्धा स्थगित होण्याची चिन्हं जास्त होती. ज्यानुसार ही स्पर्धा म्हणजेच उर्वरित १६ सामने हे स्थगित करण्यात आले आहेत.भारत पाकिस्तान संघर्षाच्या पार्श्वभूमीवर धरमशाला इथे ११ तारखेला होणारा मुंबई-पंजाब सामना अहमदाबाद इथे खेळवण्यात येईल असं स्पष्ट करण्यात आलं होतं. धरमशालाचा विमानतळ बंद करण्यात आल्याने मुंबईच्या संघाला तिथे पोहोचणं शक्य नव्हतं. मात्र दिल्ली-पंजाब दोन्ही संघ धरमशाला इथे असल्याने गुरुवारची लढत आयोजित करण्यात आली. यंदाच्या हंगामातला हा ५८वा सामना होता.तूर्तास या हंगामातील १६ लढती बाकी आहेत. उर्वरित सामने कुठे होणार यासंदर्भातील निर्णय जाहीर करण्यात आलेला नव्हता. करोना काळात आयपीएल संयुक्त अरब अमिराती इथे खेळवण्यात आली होती. मात्र सध्याच्या परिस्थितीत स्पर्धेला स्थगिती देण्यात आली आहे. दरम्यान भारत-पाकिस्तान संघर्षाची परिस्थिती लक्षात घेऊन पाकिस्तानात सुरू असलेली पाकिस्तान सुपर लीगचे उर्वरित सामने संयुक्त अरब अमिराती इथे होण्याची शक्यताही वर्तवली जात होती. मात्र भारत पाकिस्तानचा संघर्ष लक्षात घेता या स्पर्धेला स्थगिती देण्यात आली आहे.

# रवींद्र जडेजाने चेन्नई सुपर किंग्जसाठी रचला इतिहास



नवी दिल्ली : दि. ९ प्रतिनिधी

चेन्नई सुपर किंग्जचा स्टार ऑलराऊंडर खेळाडू रवींद्र जडेजाने आयपीएल २०२५ मध्ये मोठा इतिहास रचला आहे. रवींद्र जडेजा आयपीएलच्या इतिहासात चेन्नई सुपर किंग्जकडून सर्वाधिक विकेट चटकाणारा गोलंदाज बनला आहे. त्याने ड्वेन ब्राव्होचा विक्रम मोडीत काढत ही कामगिरी केली आहे. आयपीएल २०२५ च्या ५७ व्या सामन्यात, रवींद्र जडेजाने कोलकाता नाईट रायडर्स विरुद्ध १ विकेट घेतली होती. यासह, त्याने चेन्नई सुपर किंग्जसाठी १४१ विकेट्स मिळवली. जडेजाने १८४ सामन्यांमध्ये १४१ बळी मिळवले आहे. तर ब्राव्होने १४० विकेट्स घेतल्या आहेत. ब्राव्होने ११६ सामन्यांमध्ये ही कामगिरी केली. पण आता रवींद्र जडेजाने विकेट्सच्या बाबतीत मात्र पुढचा नबर पटकवला आहे.या यादीत रविचंद्रन अश्विन हा तिसऱ्या क्रमांकावर आहे. ज्याने चेन्नई सुपर किंग्जसाठी १०५ सामन्यांमध्ये ९५ विकेट्स घेण्यात यश मिळवलं आहे. त्यानंतर अल्बी मॉर्केल ७६ विकेट्ससह चौथ्या स्थानावर विराजमान आहे. दीपक चहर ७६ विकेट्ससह पाचव्या क्रमांकावर आहे.

या यादीत शार्दुल ठाकूरचा देखील समावेश आहे. त्याने चेन्नईसाठी ५७ सामन्यात ६० विकेट्स मिळवल्या आहेत.

आयपीएलच्या २०२५ च्या १८ व्या हंगामात, रविंद्र जडेजाने या हंगामात चेन्नई सुपर किंग्जकडून सर्व १२ सामने खेळून काढले आहेत. आहेत फलंदाजीने २७९ धावा केल्या आहेत आणि आठ फलंदाजांना बाद मंगहरी देखील पाठवले आहे. तो आयपीएल २०२५ मध्ये सीएसकेसाठी दुसऱ्या क्रमांकाचा सर्वाधिक धावा करणारा आणि चौथ्या क्रमांकाचा सर्वाधिक विकेट घेणारा गोलंदाज ठरला आहे.इंडियन प्रीमियर लीग २०२५ मध्ये ५७ वा सामना कोलकाता नाईट रायडर्स आणि चेन्नई सुपर किंग्ज यांच्यात बुधवारी (७ मे) खेळला गेला. सामन्यापूर्वी केकेआरचा कर्णधार अजिंक्य रहाणेने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. त्यानंतर केकेआरने १८० धावा उभारल्या. चेन्नईच्या संघाने दोन चेंडू शिल्लक ठेवत ही धावसंख्या गाठली. या पराभवामुळे कोलकाताचा आयपीएल २०२५ मध्ये प्लेऑफचा मार्गही कठीण होऊन बसलाया आहे. चेन्नईच्या या विजयाचा हीरो डेवाल्ड ब्रेव्हिस ठरला आहे. त्याने जलद गतीने अर्धशतक साकारत चेन्नईला लक्षपर्यंत पोहचवले आणि अखेर कर्णधार महेंद्रसिंग धोनीने आपल्या स्टाइलने १७ धावांची नाबाद खेळी करत संघाचा विजय निश्चित केला.

# भारतीय सैनिकांसाठी विराट-अनुष्काची भावूक करणारी पोस्ट



नवी दिल्ली : दि. ९ प्रतिनिधी

भारत आणि पाकिस्तान या दोन्ही देशांमध्ये तवाणाची स्थिती निर्माण झाली आहे. पाकिस्तानातील दहशतवाद्यांनी पहलगामवर हल्ला करून निष्पाप भारतीयांचा जीव घेतला होता. त्यामुळे आता भारताने देखील ऑपरेशन सिंदूर राबवून पाकिस्तानला चांगलच प्रत्युत्तर दिलं आहे. भारतीय सैन्य युद्धभूमीवर पाकिस्तानचे डाव हाणून पाडत आहे. दरम्यान भारताचा स्टार क्रिकेटपटू विराट कोहलीने भारतीय सैन्याचं कौतुक करणारी पोस्ट शेअर केली आहे.

गुरूवारी पाकिस्तानी सैन्याने भारतातील काही राज्यांवर ड्रोन हल्ले केले. मात्र, भारतीय सैन्याने पाकिस्तानचे सर्व ड्रोन खाली पाडले. आता विराट कोहलीने आपल्या इंस्टाग्राम अकाऊंटवर एक पोस्ट शेअर केली आहे. या पोस्टमध्ये त्याने लिहिले की, '' या कठीण काळात जे जिद्दीने देशाचे संरक्षण करत आहेत, अशा सशस्त्र दलांना आम्ही सलाम करतो आणि त्यांच्याबरोबर आम्ही एकजूटीने उभे आहोत. त्यांच्या अटल शौर्यासाठी आम्ही नेहमीच त्यांचे ऋणी राहू. त्यांनी व त्यांच्या कुटुंबीयांनी आपल्या महान देशासाठी दिलेल्या बलिदानाबद्दल त्यांचे मनापासून आभार मानतो.'' या पोस्टवर त्याने जय हिंद असं लिहिलं आहे.यासह विराट कोहलीची पत्नी अनुष्का शर्माने देखील पोस्ट शेअर करून भारतीय सैन्याचे आभार मानले आहेत. अनुष्काने पोस्ट शेअर करत लिहिले, ''आम्ही भारतीय सशस्त्र दलाचे आभारी आहोत. या कठीण काळात त्यांनी आमचं नायकासारखं संरक्षण केलं आहे. त्यांनी व त्यांच्या कुटुंबीयांनी दिलेल्या बलिदानाबद्दल आम्ही आभारी आहोत.''ऑपरेशन सिंदूरचा परिणाम आयपीएल २०२५ स्पर्धेवर देखील झाल्याचे पाहायला मिळाले आहे.



# दक्षिण आफ्रिकेवर भारतीय संघाचा दणदणीत विजय!

नवी दिल्ली : दि. ९ प्रतिनिधी

श्रीलंकेत त्रिकोणी मालिका खेळली जात आहे. भारतीय महिला संघाने दक्षिण आफ्रिकेचा पराभव करून अंतिम फेरीत धडक मारली आहे. भारतीय महिला संघाने दक्षिण आफ्रिकेला २३ धावांनी पराभूत केले आहे. ११ मे रोजी भारतीय महिला संघ आणि श्रीलंकेच्या महिला संघासोबत अंतिम सामन्यात भिडणार आहे.दक्षिण आफ्रिकेच्या संघाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. प्रथम फलंदाजी करताना भारतीय संघाने ५० षटकांत ९ गडी गमावून ३३७ धावांचा डोंगर उभा केला होता. तथापि, भारतीय महिला संघाची सुरुवात खराब झाली. भारताने फक्त ५० धावांवर तीन विकेट गमावल्या होत्या. तिथून, स्मृती मानधना आणि जेमिमा रॉड्रिग्ज यांनी मिळून डाव सावरला आणि तो पुढे नेला.प्रतिका रावल जास्त वेळ टिकू शकली नाही नाही. ती १ धाव काढत बाद झाली. त्यानंतर हरलीन देओल ४ धावा करून माघारी परतली. दरम्यान, हरमनप्रीत देखील फार काही करू शकली नाही. ती २८ धावांची खेळी खेळून पॅव्हेलियनमध्ये परतली. येथून स्मृती मानधना आणि जेमिमा रॉड्रिग्ज यांनी मिळून ९९ चेंडूत ८८ धावांची भागीदारी रचली. मंधाना ५१ धावांवर असताना बाद झाली. त्यानंतर जेमिमाने दीप्ती शर्मासोबत पाचव्या विकेटसाठी शतकी भागीदारी करत भारताला सावरले. त्यांनी ११५ चेंडूत १२२ धावांची शानदार भागीदारी रचली.

यादरम्यान जेमिमाने आपले शतक पूर्ण केले. जेमिमाने ८९ चेंडूचा सामना करत शतक पूर्ण केले. तिने १०१ चेंडूंत १२३ धावांची खेळी केली. यामध्ये तिने १५ चौकार आणि १ षटकार मारला. दीप्ती शर्माने देखील शानदार खेळ करत १० चौकार आणि २ षटकारांच्या मदतीने ९३ धावांची खेळी केली. त्याशिवाय रिचा घोषने २० धावा केल्या. दक्षिण आफ्रिकेकडून मसाबाटा क्लासने २, नादिन डी क्लार्कने २ आणि नोनकुलुलेको म्लाबाने २ विकेट मिळवल्या.प्रत्युत्तरात, दक्षिण आफ्रिकेने या लक्ष्याचा पाठलाग करताना ७ गडी गमावून फक्त ३१४ धावाछ करता आल्या. दक्षिण आफ्रिकेची सुरुवात चांगली झाली नाही. लारा गुडॉल ४ धावांवर असताना बाद झाली आहे. त्यानंतर तेजमिन ब्रिट्सने २६ आणि मियान स्मितने ३९ धावा केल्या. अँरी डिर्कसेनने ८१, नोंडुमिसो शांगसेने ३६, सिनालो जाफ्ता यांनी २१, क्लीया ट्रायॉनने ६७ तसेच नादिन डी क्लार्कने २२ धावा केल्या. भारतीय संघाकडून अमनजोत कौरने सर्वाधिक ३, दीप्ती शर्माने २ आणि श्री चरणीने १ विकेट घेतली.

## भारत–पाक तणावामुळे रुपया धडाम; एकाच सत्रात ८४ पैशांची घसरण




मुंबई: भारत आणि पाकिस्तानमधील वाढत्या तणावामुळे गुरुवारी रुपया ८४ पैशांनी घसरून प्रति डॉलर ८५.६१ पातळीवर बंद झाला. एका सत्रातील तब्बल १ टक्क्यांच्या घरातील ही अलिकडच्या काळात चलनातील मोठी घसरण आहे. याच अस्वस्थतेतून झालेल्या समभाग विक्रीने गुरुवारी शेअर बाजारात सेन्सेक्स देखील ४१२ अंशांनी घसरला.

एकंदर वित्त बाजारावर चिंतेची छटा वाढली असल्याचे डॉलरच्या तुलनेत ८४ पैसे म्हणजे तब्बल १ टक्क्यांनी गडगडलेल्या रुपयाच्या मूल्यानेही हे दाखवून दिले. पाकिस्तानी सैन्याच्या उत्तर आणि पश्चिम भारतातील अनेक लष्करी ठिकाणांवर बुधवारी रात्री केलेला हल्ला भारतीय सैन्याने निष्प्रभ केला. तरी गुंतवणूकदारांनी जोखीम टाळण्याचा प्रयत्न म्हणून सावध पवित्रा घेतल्याचे परकीय चलन व्यापाऱ्यांनी सांगितले. वाढलेले भू-राजकीय धोके, सकारात्मक अमेरिकन डॉलर निर्देशांक आणि खनिज तेलाच्या किमतीत वाढ याचाही रुपयाच्या मूल्यावर नकारात्मक परिणाम दिसून आला. आंतरबँक परकीय चलन बाजारात, भारतीय चलन डॉलरच्या तुलनेत १०० पैशांच्या नुकसानीसह ८५.७७ च्या नीचांकी पातळीवर ढासळले होते. तेथून ते सावरले तरी मागील बंद पातळीपेक्षा ८४ पैशांची घसरणीसह ते बंद झाले. बुधवारी देखील पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवादी छावण्यांवर भारताच्या लष्करी हल्ल्यांनंतर, रुपया डॉलरच्या तुलनेत ४२ पैशांनी घसरून ८४.७७ वर बंद झाला होता. पहलगाम हल्ल्याला दिलेल्या जोरदार प्रत्युत्तरानंतर बुधवारी त्याची सकारात्मक प्रतिक्रिया शेअर बाजारात उमटली होती आणि सेन्सेक्स १०५.७१ अंशांनी आणि निफ्टी ३४.८० अंशांनी वाढला होता.

# परकीयांपेक्षा देशी संस्थात्मक गुंतवणूकदार प्रबळ

नवी दिल्ली : दि.९ प्रतिनिधी



मुंबई: देशातील भांडवली बाजारात गेल्या दशकभरात मोठे स्थित्यंतर घडले असून, देशांतर्गत गुंतवणूकदार हे आधीपेक्षा महत्त्वाची आणि परदेशी गुंतवणूकदारांपेक्षा प्रबळ भूमिका बजावू लागले असून, या काळात त्यांनी परकीयांच्या तुलनेत ३.७ पटीने अधिक गुंतवणूक केल्याचे गुरुवारी प्रसिद्ध झालेल्या अहवालाने स्पष्ट केले.

मोतीलाल ओसवाल फायनान्शियल सर्व्हिसेसच्या ताज्या अहवालानुसार, भारतीय भांडवली बाजारात आर्थिक वर्ष २०१४-१५ ते २०२४-२५ या दशकभरात देशांतर्गत संस्थात्मक गुंतवणूकदारांनी (डीआयआय) १९५ अब्ज डॉलरची गुंतवणूक केली आहे. याच कालावधीत परदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांकडून (एफआयआय) झालेली गुंतवणूक ही ५३ अब्ज डॉलर आहे. म्हणजेच त्या तुलनेत देशांतर्गत गुंतवणूकदारांची गुंतवणूक ३.७ पटीने अधिक आहे.डीआयआयच्या वरचष्म्याचे हे प्रमाण आर्थिक वर्ष २०२०-२१ पासून मोठ्या प्रमाणात वाढत गेले. गेल्या दशकभराच्या कालावधीत करोना साथीचे संकट, जागतिक पातळीवरील चढे व्याज दर आणि देशातील समभागांचे वाढलेले मूल्यांकन या प्रतिकूल गोष्टी असतानाही भारतीय गुंतवणूकदार बाजारात अढळपणे पैसे गुंतवत राहिले.देशांतर्गत गुंतवणूकदारांचा बाजारात सहभाग जास्त वाढल्याने काही गोष्टींमध्ये बदलही घडून आले आहेत. विशेषत: क्षेत्रनिहाय गुंतवणुकीमध्ये हे बदल दिसून येत आहे. निफ्टी ५०० निर्देशांकात परदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांची खासगी बँकांमध्ये सर्वाधिक अशी ४७.५ टक्के हिस्सेदारी झाली आहे. त्यानंतर दूरसंचार २२.५ टक्के, गृहनिर्माण २१ टक्के, बँकेतर वित्तीय कंपन्या २०.५ टक्के, तंत्रज्ञान १९.५ टक्के आणि आरोग्यसुविधा १८.७ टक्के आणि ग्राहक उपभोग क्षेत्र १८.६ टक्के असा त्यांचा वाटा आहे. याचवेळी देशांतर्गत संस्थात्मक गुंतवणूकदारांच्या गुंतवणुकीतील सर्वाधिक वाटा खासगी बँकांमध्ये ३३.१ टक्के असून, त्याखालोखाल ग्राहक उपभोग क्षेत्र २३.९ टक्के, तेल व नैसर्गिक वायू २१.३ टक्के, ग्राहकोपयोगी वस्तू २०.९ टक्के आणि धातू २०.७ टक्के आहे, असे अहवालात स्पष्ट करण्यात आले आहे.देशांतर्गत संस्थात्मक गुंतवणूकदार भांडवली बाजारात गुंतवणूक करताना ग्राहक, तेल व नैसर्गिक वायू आणि धातू या क्षेत्रांना प्राधान्य देत आहेत. याचवेळी परदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांच्या तुलनेत त्यांची खासगी बँका, बँकेतर वित्तीय कंपन्या आणि गृहनिर्माण क्षेत्रातील गुंतवणूक कमी आहे.

गेल्या दशकभरात देशातील भांडवली बाजाराला आकार देण्याचे काम देशांतर्गत गुंतवणूकदारांनी केले आहे, असे मोतीलाल ओसवालच्या अहवालाने नमूद केले आहे.

# जागतिक 'एआय' केंद्र बनण्याची भारतात धमक, 'डेलॉईट'च्या अहवालाचा दावा

नवी दिल्ली : दि.९ प्रतिनिधी




देशात विदा साठवण केंद्रे अर्थात डेटा सेंटरसाठी २०३० पर्यंत आणखी साडे चार ते पाच कोटी चौरस फूट जागा अणि ४० ते ४५ टेरावॅट तास अतिरिक्त विजेची आवश्यकता भासेल. प्रामुख्याने कृत्रिम प्रज्ञा (एआय) क्षेत्राशी निगडित केंद्रांच्या मागणीत होणारी वाढ याला कारणीभूत ठरेल, असा अंदाज डेलॉईटच्या ताज्या अहवालाने गुरुवारी वर्तविला.

देशात कृत्रिम प्रज्ञा क्षेत्रात विदा केंद्रासारखी पायाभूत सुविधेच्या उभारणीसाठी गुंतवणूक आकर्षित करण्यासंबंधीचा अहवाल डेलॉईटने गुरुवारी जाहीर केला. अहवालानुसार, तुलनेने केंद्र उभारणीचा कमी खर्च, अपारंपरिक ऊर्जेवर भर आणि जगाच्या दृष्टीने भारताचे महत्त्वाचे असलेले स्थान या बाबी देशात ही गुंतवणूक आकर्षित करण्याच्या दृष्टीने उजव्या ठरतील. पायाभूत सुविधा क्षेत्रातील दरी कमी करणे, गुणवत्ता आणि धोरणात्मक त्रुटी दूर करण्यावर भर दिल्यास भारत जागतिक कृत्रिम प्रज्ञा केंद्र बनू शकते. देशात विदा केंद्रांसाठी २०३० पर्यंत आणखी ४.५ ते ५ कोटी चौरस फूट जागेची आवश्यकता आहे. याचबरोबर यासाठी ४० ते ४५ टेरावॅट तास अतिरिक्त वीज लागेल, असे अहवालाने नमूद केले आहे.जागतिक दर्जाची कृत्रिम प्रज्ञा परिसंस्था उभारण्यासाठी सहा गोष्टी आवश्यक आहेत. त्यात बांधकाम, ऊर्जा, दळणवळण, संगणकीय पायाभूत सुविधा, गुणवत्ता आणि धोरणात्मक चौकट यांचा समावेश आहे. राष्ट्रीय पातळीवर विदा केंद्रांच्या उभारणीसाठी वेगळे धोरण आखण्याची आवश्यकता आहे.

# बिल गेट्स १०७ अब्ज डॉलर्सची मालमत्ता करणार दान

नवी दिल्ली : दि.९ प्रतिनिधी

जगातील सर्वात श्रीमंत व्यक्तींपैकी एक असलेले बिल गेट्स यांनी गुरुवारी एक मोठी घोषणा केली आणि म्हटले की ते त्यांच्या उर्वरित तंत्रज्ञान संपत्तीपैकी ९९ टक्के रक्कम गेट्स फाउंडेशनला देतील, ज्याची किंमत सुमारे १०७ अब्ज डॉलर्स असल्याचा अंदाज आहे. हे दान आतापर्यंतच्या सर्वात मोठ्या धर्मादाय कृत्यांपैकी एक असेल.महागाईनुसार समायोजित केल्यावर, या देणग्या प्रसिद्ध उद्योगपती जॉन डी.

रॉकफेलर आणि अँड्र्यू कार्नेगी यांच्या ऐतिहासिक योगदानापेक्षा जास्त आहेत. देणगी दिलेल्या रकमेच्या बाबतीत फक्त बर्कशायर हॅथवेचे दिग्गज गुंतवणूकदार वॉरेन बफेटच गेट्सना मागे टाकू शकतात.

बफेट यांनी दान करण्याचे वचन दिलेल्या संपत्तीचे सध्याचे अंदाजे मूल्य फोर्ब्सने १६० अब्ज असल्याचा अंदाज वर्तवला आहे. तथापि, जर शेअर बाजारात चढ-उतार झाले तर बिल गेट्सची मालमत्ता १०७ अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त असू शकते. आघाडीची तंत्रज्ञान कंपनी मायक्रोसॉफ्टचे संस्थापक गेट्स यांनी दिलेली ही देणगी कालांतराने गेट्स फाउंडेशनला दिली जाईल. यामुळे फाउंडेशनला पुढील २० वर्षांत अतिरिक्त २०० अब्ज डॉलर्स खर्च करता येतील.

## थोडक्यात

### सरपंचासह चौघांवर फसवणुकीचा गुन्हा

**नागपूर :** पदाचा दुरुपयोग करून बनावट व बेकायदेशीर कागदपत्रेद्वारे अनधिकृत ले-आउटला परवानगी दिल्याप्रकरणी पिपळा डाकबंगलाचे सरपंच व इतर तिघांविरुद्ध खापरखेडा पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे. सरपंच विष्णू मुकुंद कोकड्डे, तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी धर्मेंद्र चरणदास बन्सोड, ले-आउटधारक राजेंद्र नारायण नारनवरे व संतोष जागेश्वर महतो अशी आरोपींची नावे आहेत. गटविकास अधिकारी मनोजकुमार हिरुडकर यांनी फिर्याद दिली. जिल्हा परिषद चौकशी समितीत ही बाब उघड झाली. सरपंच कोकड्डे व अधिकारी बन्सोड यांनी संगनमताने नारनवरे व महतो यांच्या ले-आउटला जुलै २०२४ मध्ये बनावट कागदपत्रांद्वारे मंजुरी दिली. ग्रामपंचायत सदस्य अतुल पाटील यांनी याबाबत तक्रार केली होती. अधिकारात नसताना गावठाण प्रमाणपत्र दिल्याचेही उघड झाले.

### लष्कराविषयी गरळ ओकणारा तरुण अटकेत

**नागपूर :** भारतीय लष्कराच्या 'ऑपरेशन सिंदूर' मोहिमेनंतर लष्कराविषयी सातत्याने गरळ ओकणाऱ्या एका तरुणाला लकडगंज पोलिसांनी नागपुरातील एका हॉटेलमधून अटक केली. तो स्वतंत्र पत्रकार म्हणून काम करत असल्याची माहिती आहे. आरोपी रेझाम माडेपट्टी शिबा सिद्दीकी (२६), मूळचा केरळचा असून, तो नक्षल समर्थक असल्याचा संशय आहे. भारताने पहलगाम हल्ल्यानंतर पाकिस्तानात राबवलेल्या 'ऑपरेशन सिंदूर'नंतर त्याने सोशल मीडियावर भारतीय लष्करावर गंभीर आरोप केले होते. दोन बंदुकांसह स्वतःचे छायाचित्र प्रसारित करून त्याने लष्कर निष्पाप लोकांना मारत असल्याचे म्हटले होते. दिल्लीतील एका वादग्रस्त परिषदेत सहभागी होऊन त्याने नक्षल समर्थकांची भेट घेतल्याचीही माहिती आहे. पोलिस त्याची कसून चौकशी करत आहेत.

### संशयातून प्रेयसीचा खून

**नागपूर :** अनैतिक संबंधाच्या संशयातून प्रियकरानेच प्रेयसीचा लोखंडी रॉडने वार करून खून केल्याची धक्कादायक घटना गुरुवारी (दि. ८) मे २०२५ रोजी सायंकाळी गिट्टीखदान पोलिस ठाणे हद्दीतील दाभा येथे घडली. पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

## आंतरराष्ट्रीय सेवा प्रदात्यांसाठी आकर्षणाचे केंद्र, मुख्यमंत्र्यांची मान्यता, रोजगारांची मोठी संधी

# हुर्रे... आता वसणार 'नवीन नागपूर'

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



### वेगवान वाढ

- मागील काही वर्षांत नागपूर शहराने वेगवान वाढीचा ध्यास घेतला आहे. ट्रीपल आयआयआयटीसोबतच आयआयएम, महाराष्ट्र नशनल लॉं युनिव्हर्सिटी, संस्कृत विद्यापीठ, एम्स आदी संस्थांच्या अस्तित्वामुळे नागपूरच्या शैक्षणिक वैभवात वाढ झाली आहे सोबतच मिहान आणि पंचतारांकित बुटीबोरी एमआयडीसीमध्ये अनेक नवे उद्योग सुरू झालेत तसेच, अनेक येण्याच्या मार्गात आहेत 'नवीन नागपूर' प्रकल्पामुळे आयटी, वित्त व सेवाक्षेत्रात मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी निर्माण होणार असून, एकात्मिक पायाभूत सुविधा, गुंतवणूक सुलभता व मजबूत प्रशासन मॉडेल यांच्या जोरावर नागपूरच्या आर्थिक महत्त्वाला नव्याने दिशादर्शक ठरेल, यात शंका नाही.

**नागपूर, दि. ९ :** महाराष्ट्र राज्याची उपराजधानी असलेल्या नागपूर शहराची विकासाच्या दिशेने घोडदौड सुरू असून, जोडीला आता नवे शहर उभे राहणार आहे राज्य सरकारने 'नवीन नागपूर' या दूरदृष्टी असलेल्या प्रकल्पास एका महत्त्वपूर्ण बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तत्वतः मान्यता दिली. हा प्रकल्प नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एनएमआरडीए) यांच्याद्वारे संकल्पित करण्यात आला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली नागपूर महानगरपालिका आणि महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाशी संबंधित कामांबाबत सह्याद्री अतिथीगृह येथे गुरुवारी बैठक पार पडली. नागपूरचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह संबंधित विभागांचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव, तसेच संबंधित यंत्रणांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. 'नवीन नागपूर' हे शहर एनएमआरडीएच्या हद्दीत होणार असून, यात स्टार्टअप्स, एमएसएमई, तंत्रज्ञान कंपन्या व आंतरराष्ट्रीय सेवा प्रदात्यांसाठी आकर्षणाचे केंद्र ठरणार आहेत. या भागातील पहिलीच अशी अत्याधुनिक भूमिगत 'युटिलिटी टनेल' प्रणाली ही नव्या शहरातील मुख्य वैशिष्ट्य असेल. प्लग-अँड-प्ले मॉडेलवर आधारित ही प्रणाली डिस्ट्रिक्ट कूलिंग, स्वयंचलित कचरा व्यवस्थापन, वीज, पाणी, वायू व टेलिकॉम यांसारख्या सर्व मूलभूत नागरी सुविधा एकत्रितपणे पुरवेल. खोदकामविरहित व भविष्यातील गरजांना अनुकूल असे शहर साकारले जाईल, अशी माहिती एनएमआरडीएचे आयुक्त संजय मीणा यांनी दिली. राज्य सरकारने नागपूर जिल्ह्यातील श्रीक्षेत्र रामटेक येथे 'नागपूर फिल्मसिटी' निर्माण करण्याचे नियोजन केले आहे सुमारे १२८ एकरांमध्ये हा मोठा प्रकल्प तयार होणार असून, स्थानिक पातळीवर मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होणे शक्य आहे. याशिवाय मागील आठवड्यात मुंबईत पार पडलेल्या 'वेव्हज 2025' परिषदेत नागपुरात जगातील सर्वांत मोठा स्क्रीनचे थिएटर उभारणीचे निश्चित करण्यात आले आहे. ही मोठी विकासात्मक घडामोड मानली जात आहे. बैठकीत नगरविकास विभागाचे अपर मुख्य सचिव असीमकुमार गुप्ता, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा म्हैसकर, मुख्यमंत्र्यांच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे, नगरविकास विभागाचे प्रधान सचिव डॉ. के. गोविंदराज, गृह विभागाच्या प्रधान सचिव राधिका रस्तोगी, मुख्यमंत्र्यांचे सचिव श्रीकर परदेशी, उद्योग विभागाचे सचिव डॉ. पी. अन्बळगन, अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या प्रधान सचिव विनिता वेद सिंगल, महाराष्ट्र उद्योग विकास महामंडळ नागपूरचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. वेलरासू, महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक ब्रिजेश दीक्षित, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणचे महानगर आयुक्त संजय मीणा, नागपूर महानगरपालिका आयुक्त अभिजीत चौधरी, नागपूर जिल्हाधिकारी बिपीन इटनकर आदी वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

### CAPTION नदीची दुर्दशा



**नागपूर :** नदी ही निसर्गाने मानवाला दिलेली मोठी देणगी आहे मानवी संस्कृती रुजली ती नदीकाठी आणि मानव विकास पावला तो नदीतील पाण्यामुळे! मात्र, आता हा विचार होतो का? नदीचे उपकार मानवाने ठेवले का? उत्तर 'नाही' असेच मिळेल छायाचित्र पाहा नागपूर शहरापासून काही अंतर अंतरावर असलेले हिंगणा शहर येथून वेणा नदी वाहते. आजच्या घडीला निळंशार खळखळत्या पाण्याऐवजी तिथं जलपर्णी दिसून येत आहे शासन-प्रशासनच काय, सामान्य नागरिकाचेही त्याकडे दुर्लक्ष आहे.

## आस्थापने अंतर्गत तक्रार समिती बंधनकारक

### नागपूर जिल्ह्यातील सर्व आस्थापनांना केंद्र शासनाचे निर्देश

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**नागपूर, दि. ९ :** केंद्र शासनाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम २०१३ अंतर्गत नागपूर जिल्ह्यातील प्रत्येक कार्यालयामध्ये ज्या आस्थापनेवर दहा किंवा दहा पेक्षा जास्त कर्मचारी कार्यरत आहे, अशा प्रत्येक आस्थापनेत अंतर्गत तक्रार समिती स्थापन करणे बंधनकारक आहे.

अधिनियमातील कलम २६ मध्ये कुणी मालकाने अंतर्गत तक्रार समिती स्थापन केली नाही. अधिनियमातील कलम १३,१४,२२ नुसार कार्यवाही केली नाही. नियमातील विविध तरतुदींचे व जबाबदा०यांचे पालन न केल्यास मालकाला ५० हजार रुपयांपर्यंत दंड होईल. तसेच, हाच प्रकार पुन्हा केल्यास आस्थापनेचा परवाना रद्द, दुप्पट दंड अशी तरतूद आहे. खाजगी आस्थापना, कंपनी, एमआयडीसी कंपनी, मॉल, शैक्षणीक संस्था, कोचिंग क्लासेस, दुकाने, बँक, खाजगी उपक्रम/संस्था, इंटरप्रायजेस, अशासकीय संघटना, सोसायटी, ट्रस्ट, उत्पादक, पुरवठा, वितरण व विक्री यासह वाणिज्य, व्यावसायिक, शैक्षणिक, करमणूक, औद्योगिक, आरोग्य इत्यादी सेवा किंवा वित्तीय कामकाज पार पाडणारे युनिट किंवा सेवा पुरवठादार रुग्णालये, सुश्रूषालये, क्रीडा संस्था, प्रेक्षागृहे, क्रीडा संकुले तसेच इतर खाजगी आस्थापना आदी ठिकाणी अंतर्गत तक्रार समिती स्थापन करणे बंधनकारक आहे. तसेच, त्याबाबतची माहिती केंद्र शासनाच्या महिला व बालविकास मंत्रालयाच्या संकेतस्थळावर अंतर्गत तक्रार समितीची नोंद करण्यासाठी आवश्यक त्या सर्व माहितीचा तपशील भरुन अंतर्गत तक्रार समितीची माहिती नोंदविता येईल. सर्व खाजगी आस्थापनांनी अंतर्गत तक्रार समिती स्थापन करावी तसेच, त्याबाबतची नोंद संकेतस्थळावर करण्याचे आवाहन जिल्हा महिला व बालविकास अधिकारी यांनी केले आहे.

## लसीकरणापासून कुणीही वंचित राहू नये

### अतिरिक्त आयुक्तांचे आरोग्य विभागाला निर्देश, लसीकरणाबाबत टास्क फोर्स समितीची बैठक

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**




**नागपूर, दि. ९ :** अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत यांनी शहरातील विविध हेल्थ अँड वेलनेस सेंटरच्या (एचडब्लूसी) कामकाजाची माहिती जाणून घेतली. अधिक धोकादायक भागांमध्ये लसीकरणासाठी विशेष प्रयत्न करावेत लसीकरणापासून कुणीही वंचित राहू नये, असे निर्देश आरोग्य विभागाला दिले.

शहरातील मनपा रुग्णालय, शासकीय व खासगी दवाखान्यांमध्ये होणा०या नियमित लसीकरणापासून वंचित राहिलेल्या बालकांचे लसीकरण व उपाययोजनांच्या अनुषंगाने शुक्रवारी टास्क फोर्सची बैठक पार पडली. बैठकीत सर्वप्रथम मनपा वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर यांनी विविध झोनस्तरावर स्थापन करण्यात आलेल्या एचडब्लूसीविषयी माहितीचा आढावा घेतला. एचडब्लूसीच्या जागेविषयी काही अडचणींविषयी चर्चा करण्यात आली. वैद्यकीय अधिकारी डॉ. सरला लाड यांनी बैठकीतील मुद्यांची माहिती दिली. त्यानंतर जागतिक आरोग्य संघटनेचे वैद्यकीय अधिकारी डॉ. मोहम्मद साजीद यांनी झोननिहाय नियमित लसीकरण कार्यक्रमाचा आढावा घेतला. त्यांनी संगणकीय सादरीकरणाद्वारे प्रत्येक झोनअंतर्गत असलेली नियमित लसीकरणाची स्थिती मांडली. नवजात बालकांपासून ते गरोदर मातांना विविध प्रकारचे लसीकरण केले जाते. या लसींपासून कुणीही माता आणि बालक वंचित राहू नये यावर भर देण्यात आला.जास्तीत जास्त ठिकाणी जाऊन वंचित बालकांचे लसीकरण करण्याची गती वाढविणे, झोन अंतर्गत खासगी प्रसूतीगृहांमध्ये जन्म झालेल्या बालकांची माहिती घेणे तसेच नियमित त्या प्रसूतीगृहांच्या संपर्कात राहण्याचे निर्देश डॉ. मोहम्मद साजीद यांनी दिले. झोनमधील लसीकरणाच्या विविध अधिक धोकादायक भागामध्ये झोनल वैद्यकीय आरोग्य अधिका०यांनी भेट देत त्याची नोंद 'गूगल फॉर्म' मध्ये करावी असे निर्देश यांनी दिले. तसेच लायन्स क्लबतर्फे देण्यात आलेल्या मोबाईल व्हॅनच्या मदतीने शहरात लसीकरण करावे, असेही ते म्हणाले. युपीएचसीचे विविध भागांमध्ये वर्गीकरणकरावे. नियमित लसीकरणासंदर्भात 'मायक्रो प्लॅनिंग' करणे, झोननिहाय खासगी डॉक्टरांची बैठक घेणे आदी निर्देशही यावेळी देण्यात आले. ज्या भागांमध्ये लसीकरणाचे प्रमाण कमी असेल अशा भागामधील नागरिकांमध्ये लसीकरणाबाबत जनजागृती निर्माण करावी, गरजेनुसार नागरिकांचे समुपदेशन करावे, लसीकरणासाठी आशा अंगणवाडी सेविकांचे सहकार्य घ्यावे, असे निर्देश अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत यांनी दिले.

बैठकीत मनपा वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर, अतिरिक्त वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. नरेंद्र बहिरवार, प्रजानन व बालकल्याण अधिकारी डॉ सरला लाड, जागतिक आरोग्य संघटनेचे वैद्यकीय अधिकारी डॉ. मोहम्मद साजीद, झोनल वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. शीतल वंदिले, डॉ. सुलभा शेंडे, डॉ. जयश्री चन्ने, डॉ. वर्षा देवस्थळे, डॉ. ख्वाजा मोईनुद्दीन, डॉ. सुनील कांबळे, डॉ. विजयकुमार तिवारी, डॉ. दीपांकर भिवगडे, डॉ. गजानन पवाने, डॉ. अतीक खान, सीपीएम डॉ. अश्विनी निकम, पीएचएन अर्चना खाडे, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या (मेडिकल) डॉ. शिल्पा नेर्लिक्कल यांच्यासह लसीकरण क्षेत्र सनियंत्रक व प्रतिनिधी उपस्थित होते.

## फुटाळा तलावात अग्निशमन जवानांचे 'मॉक ड्रिल'

### धोक्याचा सामना करण्यासाठी सराव



**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**नागपूर, दि. ९ :** पावसाळ्यातील संभाव्य आपत्कालिन परिस्थितीमध्ये नागरिकांना बचावकार्य व मदत पोहोचविण्यासाठी महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाच्या जवानांनी आज (शुक्रवारी) आपत्ती व्यवस्थापनातील इतर संस्थांच्या सहकार्याने फुटाळा तलावात सराव केला. यात पुरात अडकलेल्या व्यक्तींना जीवनरक्षा प्रणालीच्या माध्यमातून वाचविणे तसेच नागरिकांना मदत कार्य पोहोचविण्याचे प्रात्यक्षिके करण्यात आली. पावसाळ्यात शहरात पूरसदृश परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या निर्देशानुसार मुख्य अग्निशमन अधिकारी बी. पी. चंदनखेडे यांच्या मार्गदर्शनात सराव करण्यात आला तसेच आपत्ती व्यवस्थापनातील अधिकारी व इतर संस्थांच्या जवानांनी संकटकाळात बचावकार्याची प्रात्यक्षिके केली महानगरातील सर्व अग्निशमन केंद्रातील निवडक जवान 'मॉक ड्रिल'मध्ये सामील झाले होते. बोटी तसेच आऊट बोर्ड मशीनच्या (ओबीएम) सहकार्याने सराव करण्यात आला. सरावामध्ये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नागपूर पोलिस दल, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (एनडीआरएफ), राज्य आपत्ती प्रतिसाद दल (एसडीआरएफ), आरोग्य विभाग, होमगार्डचे जवान तसेच आपदा मित्रही सहभागी झाले होते. या सर्व जवानांनी पावसाळा किंवा पूरसदृश्य स्थितीमध्ये नागरिकांचे बचाव करणे तसेच आपत्कालिन स्थितीमध्ये नागरिकांना मदतकार्य पोहोचविण्याचा सराव करण्यात आला. जीवनरक्षा प्रणालीचा वापर करण्याच्या संदर्भात माहिती जवानांना देण्यात आली.

### प्रत्यक्ष बचाव कार्याची प्रात्यक्षिके

- फुटाळा तलावात झालेल्या या सरावात अग्निशमन दलाच्या जवानांनी प्रत्यक्ष पाण्यात उतरून बचाव कार्याची प्रात्यक्षिके सादर केली. यामध्ये बोटींच्या साहाय्याने पुरात अडकलेल्यांपर्यंत पोहोचणे, त्यांना लाईफ जॅकेटसारखी जीवनरक्षक उपकरणे पुरवणे आणि सुरक्षित स्थळी हलवणे या बाबींचा समावेश होता.

## मनपाच्या बनातवाला शाळेकडे पालक, विद्यार्थ्यांचा कल

### गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा परिणाम, विविध शैक्षणिक सुविधा उपलब्ध

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**नागपूर, दि. ९ :** महानगरपालिकातर्फे टेका भागात इंग्रजी माध्यमाची जी.एम. बनातवाला शाळा संचालित केली जात असून, प्रत्येक वर्षी दहावीच्या परीक्षेत विद्यार्थी गुणवत्ता यादीत झळकत आहे. विद्यार्थ्यांच्या सातत्यपूर्ण यशामुळे उत्तर नागपूरमध्ये सुरू केलेल्या या शाळेत प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थी व पालकांचा ओढा वाढला आहे.

नागपूर शहरात महानरपालिकेच्या इंग्रजी माध्यमाच्या शाळांमधून गरीब, गरजू विद्यार्थ्यांना निःशुल्क दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी मनपाद्वारे प्रयत्न करण्यात येत आहे.

### विनामूल्य प्रवेश

- अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी. आणि शिक्षणाधिकारी साधना सयाम या शाळाच्या विकासाकडे विशेष लक्ष देत आहेत. टेका, नवीवस्ती, यशोधरानगर, पिवळीनदी, कपिलनगर, समतानगर व इतर भागातील विद्यार्थी इंग्रजी माध्यमांचे शिक्षण घेण्याकरीता जी.एम.बनातवाला शाळेला पसंती देत आहेत. नर्सरीपासून ते दहावीपर्यंत विनामूल्य प्रवेश होत असल्याने पालकांवरील आर्थिक ताण कमी झाला आहे. 'रिनोव्हेटिव्ह फाऊंडेशन'च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना एकाग्रता, अभ्यास कसा करावा या पद्धती शिकता येत असते.

### पर्यावरण आणि क्रीडा

- विद्यार्थ्यांना वेगवेगळे प्रयोग शिकवून त्यांना आत्मनिर्भर आणि पर्यावरण स्नेही बनविण्याचाही प्रयत्न शाळेकडून करण्यात येत असते. किचन गार्डनच्या माध्यमातून खत तयार करणे, झाडांची देखरेख आणि कृत्रिम घरटे तयार करणे आदींचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना दिले जाते. शिवाय शाळेतील विद्यार्थी फुटबॉल, धावणे सारख्या क्रीडा प्रकारातही घवघवीत यश मिळवू लागले आहेत. गरीब, गरजू विद्यार्थ्यांना मोफत इंग्रजी माध्यमाचे शिक्षण मनपातर्फे मिळावे याकरीता तत्कालीन नगरसेवक असलम खान यांनी इंग्रजी माध्यमाची शाळेची मागणी केली होती.

भविष्यातील गरज लक्षात घेऊन २००९ मध्ये उत्तर नागपुरातील हबीबनगर येथे पहिली इंग्रजी माध्यमांची जी. एम. बनतवाला शाळा सुरू केली. शहरातील कोणताही विद्यार्थी चांगल्या शिक्षणापासून वंचित राहू नये या उद्देशाने मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या निर्देशानुसार शाळेच्या इमारतीत दोन माळे बांधण्यात येत असून, २२ वर्गखोल्या तयार करण्यात येत आहे. यामुळे विद्यार्थ्यांची पटसंख्या अधिक वाढण्यास मदत झाली आहे. शाळेतील इमारतीत विद्यार्थी, शिक्षक, पालकांकरीता लिफ्ट सुविधा उपलब्ध करवून दिली जाणार आहे. कोणत्याही विद्यार्थ्यांनाही कोणत्याही अडचणीशिवाय प्रवेश दिला जातो. सुरुवातीला हबीबनगर येथील शाळेत नर्सरी ते आठव्या वर्गापर्यंत येथे वर्ग चालत असे. पुढे मनपातर्फे टेका येथे शाळेकरीता प्रशस्त इमारत बांधण्यात आली. २०१८ पासून हबीबनगर येथील शाळा टेका येथील नव्या इमारतीत हलविण्यात आले. नागपूर मनपाच्या वतीने २०१८ पासून नववी आणि दहावीपर्यंत वर्ग सुरु करण्यात आले. दहावीच्या परीक्षेत गुणवत्ता यादीत चमकले आहेत. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये १ हजार ३९८ विद्यार्थी पटावर होते. गुणवत्ता यादीत आलेल्या विद्यार्थ्यांना खासगी कोचिंग क्लासेसमधून जेईई, नीटचे मोफत प्रशिक्षण दिले जाते. शिवाय या शाळेतील हुशार विद्यार्थ्यांची जेईई, नीट परीक्षेचे मार्गदर्शनकरीता 'सुपर 75' या उपक्रमामध्ये सुद्धा निवड होत असल्याने आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील, गरजू, सर्व सामान्य पालकांचा ओढा इंग्रजी माध्यमाच्या या शाळेकडे वाढला आहे.





अजिंक्य भारत

# आपलं अकोला

अकोला, शनिवार, दि. १० मे २०२५





# ॲड.बाळासाहेब आंबेडकर वाढदिवस विशेष

## 'वंचित'च्या कार्यकर्त्यांनी बाळासाहेबांचा वाढदिवस तिरंगा रॅली काढून साजरा करावा - प्रदीप वानखडे



दै. अजिंक्य भारत।
प्रतिनिधी



**अकोट :** अकोट तालुक्यातील वंचित बहुजन आघाडीच्या कार्यकर्त्यांनी १० मे रोजी वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष श्रद्धेय बाळासाहेब आंबेडकर यांचा वाढदिवस आहे. भारत विरुद्ध पाकिस्तानच्या युद्ध असलेल्या पार्श्वभूमीवर भारतीय सैनिकांचे मनोबल वाढविण्यासाठी शक्यतोवर तिरंगा रॅली काढून भारतीय सैनिकाचे मनोबल वाढवावे, असे आवाहन वंचित बहुजन आघाडीच्या कार्यकर्त्यांना, वंचित बहुजन आघाडीचे माजी जिल्हाध्यक्ष तथा माजी जिल्हा परिषद सदस्य प्रदीप वानखडे यांनी केले आहे.

शहरातून मुख्य मार्गाने तिरंगा रॅली काढावी व दुसऱ्या मुख्य चौकापर्यंत न्यावी. रॅलीमध्ये कुठल्याही राजकीय घोषणा देऊ नये. रॅलीत भारताचा राष्ट्रीय ध्वज सोबत घेऊन 'भारत जिंदाबाद'च्या घोषणा द्याव्यात, असे प्रदीप वानखडे यांनी वंचित बहुजन आघाडीच्या कार्यकर्त्यांना आवाहन केले आहे.







## थोडक्यात

### पाणी टंचाई निवारणार्थ तीन गावासाठी टँकर मंजूर

**बुलडाणा :** पाणी टंचाईची तीव्रता लक्षात घेता देऊळगांवराजा तालुक्यातील चिंचोली बुरुकुल, शिवणी अरमाळ व मेंडगाव या तीन गावासाठी पाणी पुरवठ्याकरिता टँकर मंजूर करण्यात आले आहे. आदेशात ठरवून दिल्याप्रमाणे नियमित टँकरव्दारे पाणी पुरवठा केल्या जाणार आहे, अशी माहिती सिंदखेडराजा उपविभागीय अधिकारी संजय खडसे यांनी दिली.

चिंचोली बुरुकुल येथे ४६३ पशुधन व १ हजार लोकसंख्येसाठी एक टँकरद्वारे २९ हजार ५७० लिटर्स पाणी पुरवठा, शिवणी अरमाळ येथे ७०० पशुधन व २ हजार ७०० लोकसंख्येसाठी एक टँकरद्वारे ६८ हजार ९०० लिटर्स पाणी पुरवठा, मेंडगाव येथे १ हजार २१ पशुधन व ३ हजार ५०० लोकसंख्येसाठी एक टँकरद्वारे ९४ हजार ५०० लिटर्स पाणी पुरवठा दररोज करणार आहेत. पाणी टंचाईची तीव्रता लक्षात घेता पाणी पुरवठ्याकरिता टँकर मंजूर करण्यात आले आहे. टँकरने केलेल्या खेपांची ग्रामपंचायतीला नोंद घेण्यात यावी. नोंदवहीची तपासणी नियमितपणे गटविकास अधिकारी यांनी करावी. निवीदाधारकाने टँकर नादुरूस्त झाल्यास त्वरित दुसरे टँकर उपलब्ध करून द्यावे, असे उपविभागीय अधिकारी यांनी प्रसिद्धीपत्रकाव्दारे कळविले आहे.

### लग्नसमारंभातून महिलेचे दागिने लंपास

शेगाव : एका लग्न समारंभात महिलेची पर्स लंपास करित सोने, चांदीचे दागिने चोरून नेल्याची घटना शहरातील एका सभागृहात घडली. दागिनेसह मोबाईल असा एकूण ६३ हजाराचा मुद्देमाल चोरट्यांनी लंपास केला. यावेळी सभागृहातील सीसी कॅमेराची तपासणी केली असता चोरटे कॅमेरात कैद झाले आहे. या प्रकरणी शेगाव शहर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विशेष म्हणजे शिवांश सेलिब्रेशन हॉल मधील गेल्या सहा महिन्यातील ही दुसरी घटना आहे. बुलढाणा येथील उमा मिलिंद तायडे हॉटेल शिवांश सेलीब्रेशन येथे लग्न असल्याने या कुटुंबासह लग्नाला आल्या होत्या. दरम्यान त्यांच्या जवळ असलेल्या पर्स मध्ये सोन्याचे दागिने होते. यामध्ये कानातले सोन्याचे वजन ५ ग्रॅम कि. २५००० रुपये, कानातले सोन्याचे वजन ३.५ ग्रॅम कि १५००० रुपये, एक नाकातील सोन्याची नथ वजन अं. १.५ ग्रॅम कि. अं.३००० नगदी ५००० असे होते. ७ मे रोजी दुपारी लग्न लागल्या नंतर पर्स चोरी झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. यानंतर, उमा मिलिंद तायडे यांनी शेगाव शहर पोलीस स्टेशनला तक्रार दिली.

### रातराणी बस सुरु करण्याची मागणी

**खामगाव :** रातराणी बस फेरी आहे मात्र इतर मोठ्या गावांसाठी रात्रीच्या वेळेस एस टी महामंडळाची रात राणी बस सुविधा नसल्याने प्रवाशांना खाजगी ट्रॅव्हल्स आधार घेऊन अवाच्या सव्वा भाडे देऊन प्रवास करावा लागत आहे. प्रवाशांना होणारा त्रास दूर करण्यासाठी व खाजगी ट्रॅव्हल्स वाल्यांच्या मनमानीला चाप लावण्यासाठी शेगाव आगाराने तात्काळ पावली उचलून इंदौर-उज्जैन-सुरत-मुंबई-नागपूर या गावासाठी रात्री आणि बस सेवा सुरू करावी ही बस सेवा सुरू झाली तर प्रवाशांची सोय होईल. या बाबीकडे लोकप्रतिनिधींनी लक्ष देऊन प्रवाशांची ही मागणी तात्काळ पूर्ण करावी अशी मागणी होत आहे.

# गुणवंत कामगार : मुख्यमंत्री व कामगार मंत्री यांच्यासह सरकारच्या घोषणेकडे राज्यातील कामगारांचे लक्ष

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी
**खामगाव दि.९**

गुणवंत व्यक्तींना राज्य शासनाकडून पुरस्कार दिले जातात. अशा पुरस्कार प्राप्त व्यक्तींचा सन्मान होऊन त्यांना काही सवलती ही दिल्या जातात. मात्र गुणवंत कामगार पुरस्कार प्राप्त लाभार्थींना एसटी प्रवास सारखी सामान्य सवलतही अद्याप देण्यात आलेली नाही. याबाबतची मागणी शासनाकडे वारंवार होत आली आहे. १३ मे रोजी मुंबई येथे गुणवंत कामगार पुरस्कार वितरण सोहळा होत आहे. या सोहळ्यामध्ये मुख्यमंत्री व कामगार मंत्री काय भूमिका घेतात याकडे राज्याचे लक्ष लागले आहे.



राज्य सरकारच्या इतर विभागाच्या पुरस्कार्थींना, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बसमधून प्रवासात सवलत दिली जाते. मात्र महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या पुरस्कार प्राप्त पुरस्कार्थींना आजअखेर कोणताही लाभ दिला जात नाही, हि बाब संबंधित पुरस्कार्थींना दुर्लक्षित करण्यासारखा आहे. त्यामुळे १३ मे रोजी मुंबई येथे होणाऱ्या विश्वकर्मा गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार वितरण सोहळ्यात राज्य सरकारच्यावतीने कामगार मंत्री आकाश फुंडकर व राज्यमंत्री आशिष जयस्वाल तथा राज्य शासनाचे प्रतिनिधी हे कामगार पुरस्कार्थींना एस टी प्रवास सवलतीची घोषणा करतात का ? याकडे कामगार आणि नागरिकांचे लक्ष लागले आहे.

राज्य शासनाने आणि कामगार खात्याच्या दोन्ही मंत्र्यांनी गुणवंत कामगारांना ह्या सवलतीचा लाभ देवून राज्यातील गुणवंत कामगारांना न्याय द्यावा, अशी आग्रही मागणी राज्य गुणवंत कामगार असोसिएशन, महाराष्ट्रचे केंद्रिय कार्यकारिणी सदस्य तथा बुलढाणा जिल्हा अध्यक्ष सुरेश सुरेश साबळे यांनी राज्य सरकारकडे लेखी पत्राद्वारे केली आहे.

राज्य शासनाच्या कामगार विभागामार्फत सामाजिक, शैक्षणिक, साहित्यिक, सांस्कृतिक, कला - क्रीडा, संघटना तसेच समाजातील वंचित व उपेक्षित घटकांसाठी भरीव कामगिरी करणाऱ्या नोंदीत कामगारांना ''विश्वकर्मा गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार'' (जुना गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार) देऊन गौरविण्यात येते. ह्या कार्यक्रम राज्याचे महामहीम राज्यपाल, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, कामगार मंत्री, कामगार राज्यमंत्री म्हणून केंद्रीय मंत्री, आमदार, खासदार, संचालक मंडळ तसेच प्रमुख प्रशासकिय आदी मान्यवरांच्या हस्ते सोहळा होतो.हा भव्य दिव्य शानदार सोहळा म्हणजे, संबंधित कामगारांच्या आयुष्यातील अविस्मरणीय क्षण असतो.

राज्य सरकारच्या इतर विभागाच्या वतीने देण्यात येणाऱ्या सन्माननीय पुरस्कारार्थींना महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बसमधून प्रवासात सवलत दिली जाते. मात्र महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या पुरस्कार प्राप्त गुणवंत पुरस्कार्थींना आजअखेर कोणताही लाभ दिला जात नाही. विश्वकर्मा गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार प्राप्त पुरस्कार्थींना सदरचा लाभ मिळावा यासाठी, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्यावतीने योजना स्वरूपात सदरचा प्रस्ताव कल्याण आयुक्तांच्या माध्यमातून प्रधान सचिव कामगार यांना सादर करण्यात आला होता. त्यानंतर अंतिम मंजुरीसाठी तो प्रस्ताव कामगार मंत्री फुंडकर यांचे कडे पाठवण्यात आला.

ज्यायोगे राज्य सरकारवरती कोणत्याही स्वरूपाचा आर्थिक बोजा पडत नाही. विशेष म्हणजे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील ११ फेब्रुवारीच्या मंत्रालयीन भेटीत याबाबतीत लवकरच सकारात्मक निर्णय घेतला जाईल, असे आश्वासन देखील दिले आहे. त्यामुळे कामगार मंत्री आकाश फुंडकर व राज्यमंत्रीआशिष जयस्वाल यांनी राज्यातील गुणवंत कामगारांना राज्य परिवहन महामंडळाच्या माध्यमातून प्रवास सवलतीचा लाभ देवून कष्टकरी कामगार कार्यकर्त्यास प्रोत्साहन व पाठबळ द्यावे, असे मत कामगार कल्याण गुणवंत पुरस्कारार्थी तथा साहित्यिक सुरेश साबळे यांनी निवेदनात व्यक्त केले आहे.

## व्यायामशाळा विकास अनुदान योजना; प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी
**बुलडाणा दि.९**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा कार्यालय, बुलढाणामार्फत व्यायामशाळा विकास अनुदान योजनेअंतर्गत व्यायाम साहित्य खरेदी, खुले व्यायाम साहित्या खरेदी, व्यायामशाळा दुरुस्ती व नुतणीकरणासाठी ७ लक्ष रुपये तर व्यायामशाळा बांधकामासाठी १४ लक्ष रुपये अनुदान दिल्या जातो. इच्छुक व पात्र संस्थानी अर्ज करावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी बि.एस.महानकर यांनी केले आहे.

अनुदानाकरीता पात्र संस्थांचा प्राथम्यक्रम स्थानिक स्वराज्य संस्था, ग्रामपंचायत, नगर परिषद, जिल्हा परिषद, सामाजिक न्याय विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या सर्व शासकीय प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा, आश्रमशाळा व वसतीगृह इत्यादी तसेच क्रीडा विभागाचे संकुले, पोलीस विभागाअंतर्गत कल्याण निधी समिती, शासकीय स्पोर्टस क्लब, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय तसेच शासनाद्वारे मान्यता दिलेल्या शैक्षणिक शाळा व महाविद्यालयांना शासनामार्फत अनुदान मिळण्यास प्रारंभ होवून ५ वर्ष पुर्ण झालेली आहेत असे शाळा व महाविद्यालये अनुदानासाठी पात्र राहतील.

शासन निर्णय दि. ८ जानेवारी २०१९ नुसार आवश्यक कागदपत्रांची पुर्तता करणाऱ्या संस्थांनी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा संकुल, क्रीडानगरी, जांभरुन रोड, बुलढाणा येथे परिपुर्ण प्रस्ताव सादर करावे, असे प्रसिद्धीपत्रकाव्दारे कळविण्यात आले आहे.

## उसनवारीचे पैसे मागितल्याने प्राणघातक हल्ला

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी
**संग्रामपूर दि.७**

उसनवारीने घेतलेले ३ हजार रूपये परत मागितले असता इसमावर प्राणघातक हल्ला केल्याची घटना ७ मे रोजी दुपारी २.१५ वाजताचे सुमारास घडली. याप्रकरणी एकाच कुटुंबातील तिघांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यासंदर्भात पोलिस सुत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, पातुर्डा बु. येथील प्रमोद भाऊराव वानखडे यांच्याकडून जितेंद्र शंकर वानखडे, जय जितेंद्र वानखडे व सौ. रेखा जितेंद्र वानखडे यांनी ३ हजार रूपये उसने घेतले होते. प्रमोद वानखडे यांनी उसनवारीचे पैसे परत मागितले असता आरोपी जितेंद्र वानखडे याने हातामध्ये कुऱ्हाडी दांडा व आरोपी जय वानखडे याने हातामध्ये कोयताने हल्ला केला तर यावेळी रेखा वानखडे बाजुलाच उभी होती. हल्ल्यात गंभीर जखमी होऊन प्रमोद वानखडे हे जमिनीवर पडलेले होते. घटनेची माहिती मिळाल्यावरून धिरज भाऊराव वानखडे हे घटनास्थळी पोहोचले असता उपरोक्त तिन्ही आरोपी घरात निघुन गेले. यानंतर उपस्थित ग्रामस्थांनी प्रमोद वानखडे यांना अकोला येथे उपचारासाठी नेण्यात आले. उपरोक्त आरोपींतानी उधारीच्या तिन हजाराच्या कारणावरुन प्रमोद वानखडे यांना जिवाने मारण्याच्या उद्देशाने मारहाण करुन गंभीर जखमी केले आहे. अशी फिर्याद धिरज भाउराव वानखडे यांनी तामगाव पोस्टेला दिली.

फिर्यादीवरुन उपरोक्त आरोपींविरूध्द गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोउपनि सोनवणे करीत आहेत. तर जय अणि जितेंद्र वानखडे यांना अटक करण्यात आली असून न्यायालयाने त्यांना ३ दिवसांची पीसीआर दिल्याची माहिती मिळाली आहे तर जखमीवर अकोला येथील रूग्णालयात उपचार सुरू आहेत.

## गोल्ड सिनेमा कोटा येथे फुले चित्रपट विचार उत्सव संपन्न

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी
**साखरखेर्डा दि.९**

हिंदुस्तानातील महिलांचे व सामान्य जनतेचे शिक्षण प्रारंभ करणारे , त्यांचे उद्धारक आणि राष्ट्रपिता महात्मा फुले व पहिल्या महिला शिक्षिका क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्यावर आधारित फुले चित्रपट पाहण्यासाठी राजस्थानमधील कोटा येथील गोल्ड सिनेमा गृह, आकाश मॉल , एरोड्रम सर्कल येथे महाराष्ट्र कोटा पालक मित्र मंडळाच्या पालक मित्रांनी या कार्यक्रमाचे आयोजन विचार उत्सव म्हणून केले.

याप्रसंगी न्यायाधीश रजनी ब्रिजेश न्यायाधीश नरेंद्र आणि महाराष्ट्र मंडळाचे प्रमुख किशोर वाघ यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. नंतर महाराष्ट्र राजस्थान संवाद कार्यक्रमातून राष्ट्रपिता महात्मा फुले विचार प्रचार मित्र मंडळ राजस्थान महाराष्ट्र मंडळाची स्थापना करण्यात आली.



या कार्यक्रमाची विशेष बाब म्हणजे ज्योतिबा आणि सावित्रीबाई यांच्या भूमिकांमध्ये महाराष्ट्र माळी समाज अधिकारी-कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष श्री. नरेंद्र वानखडे सर आणि सौ. रेखाताई वानखडे मॅडम (खामगाव, बुलढाणा) यांच्या वेशभूषेने सर्व राजस्थानी प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले.

या प्रसंगी सत्र न्यायाधीश रजनी ब्रिजेश, न्यायाधीश नरेंद्रसिंह, महाराष्ट्र पालक मित्र मंडळ कोटा प्रमुख किशोर वाघ , गोल्ड सिनेमा येथील भंवरसिंह जादौन , नरेंद्र सैनी आणि महाराष्ट्र मंडळाचे सर्व सदस्य सुरेश झरेकर , महेश राजपूत , श्रीमती सावित्रीबाई धनवे , विलास खंदारे , संतोष घानखेडे , नरेंद्र वानखडे ,रेखा वानखडे, किशोर वाघ, गणेश सुरुशे , नितीन मेरत, दीपक शिंदे , संजय टेकाळे , उमेश चिपडे , वसंत मिरगे , सुलोचना मिरगे , नम्रता साबू , विष्णू लहासे, सुशील ढाकणे , पवन कामड व स्थानिक कोटा रहिवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कोलते महाविद्यालयात महाराणा प्रताप जयंती साजरी

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी
**मलकापूर दि.९**

पद्मश्री डॉ. व्ही. बी. कोलते अभियांत्रिकी महाविद्यालय, मलकापूर येथे महान स्वाभिमानी राजा, राष्ट्राभिमानाचे प्रतीक, मेवाडचे शूरमर्द योध्दा महाराणा प्रताप यांची जयंती अत्यांत प्रेरणादायी वातावरणात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेम, आत्मगौरव आणि इतिहासाची जाण निर्माण होईल, अशा प्रकारचे प्रभावी सादरीकरण करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे सचिव डॉ. अरविंद कोलते, प्राचार्य डॉ. अनिल खर्चे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी महाराणा प्रताप यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्याानंतर प्रा. सदाशिव लवंगे यांनी महाराणा प्रताप यांचे जीवनचरित्र, त्यांचा शौर्यदिग्दर्शक इतिहास, हल्दीघाटीच्या युद्धातील त्यांची कर्तबगारी आणि देशासाठी त्याग यावर आधारित सखोल आणि प्रभावी मार्गदर्शन केले.



या कार्यक्रमास महाविद्यालयातील विविध विभागांतील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वेळी आयक्यूएसी समन्वयक प्रा. रमाकांत चौधरी, पॉलिटेक्निकचे प्रभारी प्रा. संदीप खाचणे, विभागप्रमुख प्रा. योगेश सुशीर, डॉ. अमोघ मालोकर, प्रा. सुदेश फरपट, प्रा. संतोष शेकोकार, प्रा. महेश शास्त्री, प्रा. साकेत पाटील, प्रा. गजानन सुपे, प्रा. पराग चोपडे, प्रा. प्रविण पाटील, प्रा. राजेश सरोदे, प्रा. निलेश बुडुखले, प्रा. अमोल हलदे, प्रा. पांडुरंग भीसे, प्रा. मनीष अचेलिया, प्रा. सचिन बोरले तसेच महिला प्राध्यापिका डॉ. मंजिरी करांडे, प्रा. संगीता खर्चे, प्रा. पुनम पठ्ठे, प्रा. माधुरी राजपूत, प्रा. माधुरी चौधरी, प्रा. फातेमा सरकार, प्रा. अनिता होले, प्रा. नेहा मालोकर, प्रा. रुपाली पाटील, प्रा. स्नेहल पवार, वैश्णवी धोरणे, तनुजा नाफडे यांची उपस्थिती होती. शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांमध्ये बलदेव राजपूत, सचिन शेलार, शरद पाटील, दीपक पालवे यांनीही सक्रिय सहभाग नोंदविला.

# अखेर अनिल चित्तेसह महिलांनी गाठले अमरावती विभागीय आयुक्त कार्यालय!

## नगरपालिकेतील भ्रष्टाचार प्रकरणी विभागीय चौकशी समिती गठीत करा अन्यथा उपोषण

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी
**अंढेरा दि.९**

देऊळगाव राजा नगरपालिकेचे मुख्याधिकारी अरुण मोकळ यांनी गेल्या दोन वर्षांपासून प्रशासक पदी असल्याने आपणच एकटे सर्वे सर्वा असल्याने अनेक कामांत अनियमितता तथा मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार केल्प्रकरणी शिवसेना तालुकाप्रमुख अनिल चित्ते यांनी अनेक तक्रारी तथा निवेदने जिल्हाधिकारी यांच्या कडे सादर केले.जिल्हाधिकारी यांनी दखल एकदा नव्हे तर दोनदा चौकशी समिती गठीत केल्या परंतु एकदाही चौकशी झालीच नसल्याने गोरं गरीब, अतिक्रमणाच्या नावाखाली बेघर करण्यात आलेल्या महिलावर जो नगरपालिकेकडुन अन्याय झाला तसेच नगरपालिकाच्या करोडो रुपयांच्या कामात अरुण मोकळ यांनी भ्रष्टाचार केला असुन जोपर्यंत सखोल आणि पारदर्शक चौकशी होत नाही तोपर्यंत आपण शांत बसणार नसल्याचे अमरावतीच्या विभागीय आयुक्त श्वेता सिंघल यांना दि.५मे रोजी भेटून पुनच्च आपल्या स्तरावरुन विभागीय चौकशी समिती गठीत करण्याची मागणी अनिल चित्ते सह महिलांनी केली आहे.



देऊळगाव राजा नगरपालिका भ्रष्टाचार प्रकरणी बऱ्याच दिवसापासून चर्चेत असलेले मुख्याधिकारी तथा प्रशासक अरुण मोकळ यांनी केलेल्या भ्रष्टाचाराबाबत जिल्हाधिकारी यांच्या आदेशाने चौकशी समिती गठित होऊन सुद्धा चौकशी होत नसल्यामुळे संबंधित मुख्याधिकारी यांना पाठीशी घातल्या जात असल्यामुळे अनिल चित्ते यांनी अतिक्रमणाच्या नावाखाली बेघर केलेल्या अन्यायग्रस्त कुटुंबासह विभागीय आयुक्त यांची दि.५ मे २०२५ रोजी भेट घेतली पुरावे सादर करुन आपल्या स्तरावरुन तात्काळ विभागीय चौकशी समिती गठीत करण्याची मागणी केली असुन देऊळगाव राजा नगरपालिकेचे मुख्याधिकारी अरुण मोकळ यांनी देऊळगाव राजा नगरपालिकेचे मुख्य प्रशासक तथा मुख्याधिकारी म्हणून काम करत असताना त्यांनी शासनाच्या निधीमध्ये अंदाजपत्राकानुसार कामे न करता ठेकेदारांना हाताशी धरून आर्थिक संगमत करून टेंडर मॅनेज करून निकृष्टपणे कामे केली.त्यामध्ये देऊळगाव राजा येथील माना नदी सौंदर्यकरणासाठी करोड रुपये खर्चून सुद्धा दर्जेदार कामे झाले नाहीत. उलट नदीच्या सौदर्यकरण न होता नदी गटारमय झाली आहे. तसेच नगरपालिकेच्या हद्दीतील आरक्षित जमिनीवरील ग्रीन झोन उठवून एन.ए. करून दिले आहे. नगरपालिकेच्या ताब्यात असलेल्या शासकीय जागा संबंधित लोकांना आर्थिक व्यवहार करून व्यवसाय करण्यासाठी उपलब्ध करून दिल्या आहेत.पाणीपुरवठा योजने अंतर्गत मोठा भ्रष्टाचार झाल्याचे म्हटले आहे. यासह अनेक तक्रारी अनिल चित्ते यांच्या निवेदनात त्यांनी दाखल करून विभागीय आयुक्त यांना निवेदनाद्वारे दिल्या आहे तसेच विभागीय स्तरावरून विभागीय चौकशी लावा व संपूर्ण चौकशी करून संबंधितावर फौजदारी गुन्हे दाखल करा अशी मागणी केली आहे.

तसेच सर्व पुरावे सोबत जोडले आहे तसेच जिल्हाधिकारी यांनी जी चौकशी समिती गठित केली होती तिचा अहवाल मागून घेण्यासाठी म्हटले आहे.तसेच आपल्या स्तरावरून विभागीय चौकशी गठीत करण्यात याव.अतिक्रमणाच्या नावाखाली बेघर करण्यात आलेल्या अन्यायग्रस्त कुटुंबातील लाडक्या बहिणी यांच्या सह अनिल चित्ते यांनी दि.१९मे पासून विभागीय कार्यालयासमोर आमरण उपोषणाचा इशारा दिला आह.

**पावसाळ्यापूर्वीच हायमस्ट लाईट जमीनदोस्त.**

देऊळगाव राजा शहरामधील मुख्य रस्त्यावरील लावलेले अनेक हाईमस्ट लाईट साठी करोडो रुपये खर्चून उभे केले.परंतु हे हायमस्ट लाईट सध्या शहरांमध्ये चर्चेचा विषय बनला असुन अनेक ठिकाणचे हायमस्ट लाईट पावसाळ्यापुर्वीच उन्मळून पडत असुन नक्कीच दाल में कुछ काला असल्याचे जिवंत उदाहरण सध्या शहरातील नागरिक अनुभवत आहे. हायमस्ट लाईटच्या प्रकाश सुद्धा आलेल्या भरकच्च निधीप्रमाणे पडत नसुन त्यापेक्षा कंदील बरे असे लोकांचे मत आहे आणि ते निकृष्ट दर्जाचे काम झाल्यामुळे ते हायमस्ट लाईटचे पोल रस्त्यावर उन्मळून पडत आहे त्यामुळे शहरातील नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे.

## थोडक्यात

### फास लागून दगावलेल्या दोन नीलगायी जागेवरच कुजल्या!

**वाशिम:** विविध अपघात, घटनांमध्ये दगावलेल्या वन्यजीवांची विल्हेवाट लावण्यात वनविभागाकडून प्रचंड दिरंगाई होत आहे. गत ४ मे रोजी मंगरुळपीर तालुक्यातील खिर्डा शिवारात फास गळ्यात अडकून दोन नीलगायी दगावल्या होत्या. या नीलगायींची रितसर विल्हेवाट न लावल्याने या नीलगायी जागेवरच कुजल्या आहेत. उन्हाचा कडाका वाढल्याने जंगलात चारा, पाण्याचे दुर्भिक्ष निर्माण झाले आहे. त्यामुळे वन्यप्राणी शेतशिवार, लोकवस्तीकडे धाव घेत आहेत. यातून काही वन्यप्राण्यांचा जीवही गेला आहे. उन्हाळ्यात जंगलातील जलस्रोत आटत असताना कृत्रिम पाणवठ्यांची संख्या वाढवून, त्यात नियमित पाणी टाकणे अपेक्षित आहे. प्रत्यक्षात वनविभागाकडून याची आवश्यक दखल घेतली जात नाहीच. शिवाय, दगावलेल्या वन्यजीवांची विल्हेवाटही लावण्याबाबत प्रचंड उदासीनता दिसते. यामुळेच मंगरुळपीर तालुक्यातील खिर्डा शिवारात फास लागून दगावलेल्या नीलगायी जागेवरच कुजल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.

### सोनल प्रकल्पातून पाणी न सोडल्यास जलसमाधी घेणार!

**शेलूबाजार** : परिसरातील सुमारे ५० गावांमध्ये भीषण पाणीटंचाई निर्माण झाली आहे. ही बाब लक्षात घेत येत्या १० मेपर्यंत सोनल प्रकल्पाचे गेट दुरुस्त करून पाणी सोडावे, अन्यथा आपण सोनल प्रकल्पात जलसमाधी घेऊ, असा इशारा सामाजिक कार्यकर्ते आणि सावता परिषद प्रदेश कार्याध्यक्ष पांडुरंग कोठाळे यांनी कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग यांना निवेदनातून दिला आहे. सोनल प्रकल्पाचे गेट २४ एप्रिल रोजी तांत्रिक बिघाडामुळे बंद पडले आहे. अद्यापही या गेटची दुरुस्ती न झाल्याने शेकडो नागरिक, पशुपक्षी आणि शेती व्यवसाय अडचणीत सापडले आहेत. यामुळे मागील काही दिवसांपूर्वी एक नीलगाय पाण्याअभावी तडफडून मृत्युमुखी पडली असून, सोनल प्रकल्पात पुरेसा पाणीसाठा असतानाही प्रशासनाच्या हलगर्जीमुळे तो जनतेसाठी उपलब्ध होत नसल्याचे पांडुरंग कोठाळे यांनी निवेदनात नमूद केले आहे. तसेच पाणीटंचाईने फळबागा सुकून चालल्या असून, जीवसृष्टी धोक्यात आली असून, 'गेट दुरुस्त करून पाणी न सोडल्यास, प्रशासनाच्या निष्क्रियतेविरोधात जलसमाधी घेण्याशिवाय पर्याय नाही', असा स्पष्ट इशाराही पांडुरंग कोठाळे यांनी दिला आहे.

### मोटारसायकलसमोर कुत्रा आल्याने अपघातात एक ठार

**कारंजा लाड :** कारंजा मानोरा रोडवर मोटारसायकल भरधाव वेगाने व निष्काळजीने चालवून रोडवर मोटारसायकलसमोर कुत्रा आल्याने अपघात होऊन विजय हरिभाऊ वंजारे(३४), रा.खडकी ता.मालेगाव,जिल्हा वाशिम गंभीर जखमी होऊन मरण पावल्याची घटना ८ मे रोजी घडली. आकाश विजय गव्हाणे(३०) रा.वाघोडा तालुका कारंजा यांनी ९ मे रोजी दिलेल्या फिर्यादीवरून मृत विजय वंजारे यांच्यावर कलम १०६(१),२८१ बी. एन. एस. प्रमाणे कारंजा शहर पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार मृत नामे विजय हरिभाऊ वंजारे हा त्याच्या मोटारसायकल क्र. एम. एच. ३७ एजी ३०२२ ने कारंजा ते मानोरा रोडने भरधाव वेगाने व निष्काळजीपणे मोटारसायकल चालवून जात होता. तोच रोडवर कुत्रा आडवा आल्याने त्याचा मोटरसायकलवरील ताबा सुटून अपघात होऊन तो गंभीर जखमी होऊन त्याचे मरणास तो स्वतः कारणीभुत झाला आहे. अश्या फिर्यादीच्या जबानी रिपोर्टवरून सदर गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

### शेतमजूर कुटुंबातील युवकाची कारागृह पोलीस पदासाठी निवड

**मानोरा :** धामणी(मानोरा) येथील गाडगेनगरमधील एका



गरीब शेतमजूर कुटुंबातील युवक किसन वामन बडवे यांची कारागृह पोलीसपदी नुकतीच निवड झाली. एका सामान्य शेतमजुरी करणाऱ्या कुटुंबातील या तरुणाची निवड झाल्याबद्दल गावात त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. किसन याने इयत्ता स्थानिक विद्यालयातून केली आणि एका खासगी कोचिंग क्लासमध्ये तयारी केली. त्याच्या निवडीचा आनंद त्याचे कुटुंबीय आणि मित्र मंडळी मोहन ठाकरे, उमेश होलगरे, विनोद होलगरे, किसन पुरी, दिनेश मस्के आदींनी पेढे वाटून केला. किसनने आपल्या नियुक्तीचे श्रेय आई, वडील यांना दिले.

### पीक कर्जमाफीचे अर्ज तहसील कार्यालयात भरुन द्या

**कारंजा लाड** : सततची नापिकी, उत्पादीत मालाचे पडलेले भाव, वाढता उत्पादन खर्च यामुळे शेतकरी अडचणीत सापडला आहे. त्याचे आर्थिक गणित बिघडलेले आहे . शेतीसाठी घेतलेले पीक कर्ज कसे भरावे हा प्रश्न त्याचे समोर उभा ठाकला आहे. त्यासाठी राजे छत्रपती संभाजी महाराज यांचे जयंतीदिनी येत्या १४ मे रोजी तहसील कार्यालयात कर्जमाफीचे अर्ज सादर करण्याचे आवाहन नितीन उपाध्ये यांनी केले आहे. शेतकऱ्यांच्या कर्ज माफीचा शासनास विसर पडला असल्याचे दिसत असल्याने शेतकरी एल्गार समीतीने कर्ज माफीचा आवाज बुलुंद केला यात शेतकरी नेते प्रकाश पोहरे यांनी शासनास कर्ज माफी देण्यास भाग पाडू. वेळ पडल्यास कोर्टात जनहीत याचीका दाखल करु, असे म्हटले होते.

# पोलिसांचा जुगारावर छापा

## २६ जणांवर कारवाई; तीन लाखांचा मुद्देमाल जप्त



**शिरपूर पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या शिरपूर बसस्थानकासमोरील वरली मटक्याच्या अड्ड्यावर पोलिसांनी छापा टाकला. या छाप्यामध्ये पोलिसांनी २६ इसमांवर कारवाई केली. त्यामध्ये किसन केशव घोडमोडे, सतीश श्रीराम चव्हाण, संतोष लक्ष्मण शिखरे, परसराम राजाराम कव्हर, सुखदेव किसन भगत, उत्तम देवबा सावळे, मुसिंग माणिक पवार, किसन आनंदा राऊत, सरदार खाँ अब्दुल्ला खाँ, ज्ञानेश्वर गंगाराम भोसले, विजय निवृत्ती अंभोरे, रवि वानखेडे, दीपक अंभोरे, कार्तिक ऑन मालेगाव, शेख आबेद शेख दादामिया, विष्णू रामकृष्ण खंदारे, कैलास विश्वनाथ शिंदे, गजानन संतोष वाकोडे, शिवाजी ऊर्फ प्रशांत भास्करराव देशमुख, रिजवान अहमद तौफिक अहमद, हसन ऊर्फ शहिद मोहम्मद रेघीवाले, वजिर शहा कडू शहा, गंगाराम किसन साबळे, शंकर दत्तराव देशमुख, आशु शेठ, प्रवीण बबन गायकवाड या २६ जणांचा समावेश आहे.**

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशिम, दि. ९ :** मालेगाव तालुक्यातील शिरपूर बसस्टॅण्डसमोर सुरू असलेल्या एका जुगार वाशिमची पोलीस उपविभागीय अधिकारी नवदीप अग्रवाल यांचे पथकाने ८ मे रोजी छापा टाकला. या छाप्यामध्ये २६ इसमावर कारवाई करत त्याच्याकडून तीन लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात पोलिसांना यश आले.

शिरपूर जैन येथील बस स्थानकासमोर एका सिमेंट विटाचे पत्र्याचे खोलीमध्ये तसेच बसस्टँडचे जवळील सिमेंट विटाचे, वर पत्रे असलेल्या खोलीमध्ये काही इसम वरली मटक्याचा जुगार खेळत आहेत. अशा प्राप्त माहितीवरुन पोलीस उपविभागीय अधिकारी. नवदीप अग्रवाल यांनी त्यांचे पथकासह बस स्टॅण्डजवळील दोन ठिकाणी छापा टाकला. यावेळी सदर ठिकाणी मिलन, कल्याण, टाईम बाजार नावाचे जुगारावर लोक पैश्याचे हारजितने जुगार खेळताना मिळून आले. आरोपीकडून नगदी ३१,२८० रुपये, वरली २ मोटारसायकल ९५,००० रुपये, १७ मोबाईल एकूण किंमत १,७१,५०० रुपये, असा एकूण २,९७,७९५ रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर अवैध वरली मटक्याचा जुगार चालविणारे व जुगार खेळणारे एकूण २६ आरोपींवर पोस्टे शिरपूर येथे गुन्हा दाखल करुन कारवाई करण्यात आली.

सदर कारवाई पोलीस अधीक्षक अनुज तारे, अपर पोलीस अधीक्षक लता फड यांचे मार्गदर्शनात सहायक पोलीस अधीक्षक, नवदीप अग्रवाल, पोहेकॉं हरिभाऊ कालापाड, पोहेकॉं अरविंद राठोड, पोकॉं स्वप्नील शेळके, पोकॉं सलमान नंदावाले, चंचल वानखेडे यांनी केली.

# शेतकऱ्यांनी केले अडीच लाख क्विंटल घरगुती बियाणे तयार

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**वाशिम, दि. ९ :** जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी कृषी विभागाच्या मार्गदर्शनात तब्बल २ लाख ५८ हजार ४३० क्विंटल गुणवत्तापूर्ण घरगुती सोयाबीन बियाणे तयार केले आहे. या बियाण्यांची उगवण क्षमता ७० टक्क्यांहून अधिक असल्याचे चाचण्यांद्वारे सिद्ध झाले आहे. खरिपात पेरणीसाठी त्याचा उपयोग होणार आहे.

नैसर्गिक आपत्ती किंवा बियाणे टंचाईची स्थिती असल्यास खासगी बियाणे कंपन्यांचे बियाणे शेतकऱ्यांना वेळेत व पुरेसे उपलब्ध होत नाही. त्यामुळे स्थानिक पातळीवर गुणवत्तापूर्ण बियाणे मिळण्यासाठी घरगुती बियाण्यांची निर्मिती प्रभावी उपाय ठरतो. त्यामुळेच कृषी विभागाच्यावतीने गतवर्षीच्या खरीप हंगामात शेतकऱ्यांच्या सहभागाने गुणवत्तापूर्ण घरगुती बियाण्यांची निर्मिती करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते.

शेतकऱ्यांनी तयार केलेल्या घरगुती बियाण्यांवर बीज प्रक्रिया करण्याचे मार्गदर्शन केले जाणार आहे. . नवीन वाणांचा वापर वाढविणे, तसेच बियाणे बदल दरामध्ये वाढ करण्याचा प्रयत्नही या कार्यक्रमातून करण्यात येत आहे. गतवर्षी या अंतर्गत जिल्ह्यात २३ हजार १९० हेक्टरमधून ३ लाख ८६० क्विंटल घरगुती बियाणे निर्मितीचे उद्दिष्ट कृषी विभागाने निश्चित केले होते. यामध्ये १४ हजार ६९५ शेतकऱ्यांनी सहभाग घेत २ लाख ९२ हजार ४७क्विंटल सोयाबीन बियाण्यांचा साठा राखून ठेवला. या बियाण्यांची उगवण क्षमता तपासण्यात आली. २ लाख ५८ हजार ४३० क्विंटल बियाण्यांची उगवण क्षमता ७० टक्क्यांहून अधिक आहे.

# पोहरादेवी येथील ट्रस्टमध्ये महंतांच्या कुटुंबातील सदस्य

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मानोरा, दि. ९ :** बहुजनांची काशी म्हणून ओळखल्याजाणाऱ्या पोहरादेवी येथील श्री देवी सेवादास महाराज संस्थान ट्रस्टमध्ये महंत मंडळींच्या कुटुंबातील सदस्यांचा समावेश करण्यासंदर्भातील वाद अखेर न्यायालयीन निर्णयामुळे निकाली निघाला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर धर्मादाय आयुक्त, वाशिम यांनी ७ मे रोजी विश्वस्त मंडळात काहींच्या नियुक्तीचे आदेश दिले.

पोहरादेवी येथील श्री देवी सेवादास महाराज संस्थानच्या संस्थानच्या विश्वस्त मंडळावर नियुक्तीबाबत गेल्या अनेक वर्षांपासून वाद निर्माण झाला होता. महंतांच्या कुटुंबातील सदस्यांचा विश्वस्त मंडळात समावेश करण्याच्या मागणीचे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात दाखल होते. यावर सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालानुसार वाशिमच्या धर्मदाय आयुक्तांनी ७मे रोजी दिलेल्या आदेशानुसार पोहरादेवी येथील श्री देवी सेवादास महाराज संस्थानच्या विश्वस्थ मंडळात सदस्य म्हणून महंत कबीरदास महाराज, तसेच विलास लालसिंग राठोड, प्रकाश वामन राठोड, कुंडलिक हिरामण राठोड, सद्गुण तुळशीराम राठोड, चंदाबाई अमोल राठोड, प्रदीप रंगराव राठोड, गोपाल श्रीचंद राठोड, संदीप प्रताप राठोड, व्यंकटेश शेषराव राठोड आणि विद्याबाई संजय राठोड या ११ जणांची नियुक्ती करण्यात आली आहे. सर्वोच्च न्यायायालयाच्या निर्णयामुळे संस्थेच्या कार्यप्रणालीत स्थैर्य येण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

# खते- बियाण्याच्या किमतीत वाढ; बळीराजा चिंतेत

## शासनाने किमतीवर नियंत्रण आणण्याची मागणी

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**खत, बियाणे, मजूर वर्ग आणि मशागतीसाठी लागणारे यंत्र यांच्या बाजारभावात स्थिरता नाही. आता कृषी बी बियाणे, खते याच्या महागाईमुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित बिघडणार आहे.**

**मानोरा, दि. ९ :** आगामी खरीप हंगामापूर्वीच रासायनिक खताच्या किंमतीत वाढ झाल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडण्याची स्थिती निर्माण झाली आहे. या वाढीमुळे शेतमालाच्या उत्पादन खर्चात वाढ होणार असून शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे.

खरीप पिकांची पेरणी जून महिन्यात केली जाते. पण अनेक शेतकरी मे महिन्यापासूनच कृषी साहित्य आणि खतांची खरेदी सुरू करतात. याशिवाय काही ठिकाणी पेरणी झाल्यानंतर खतांचा तुटवडा होईल, अशी भिती असल्याने शेतकऱ्यांनी आतापासूनच खरेदी सुरू केली आहे.

या परिस्थितीत रासायनिक खताच्या दरात प्रचंड वाढ झाली आहे. मागील दहा वर्षाच्या तुलनेत खताच्या किंमतीत भरमसाठ वाढ झाली असुन शेतमालाचे भाव जसेच्या तसे असल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडले आहे.

युरियाच्या दर सोबत प्रत्येक रासायनिक खताच्या बॅग २००० हजार रुपयाच्या पुढे गेल्या आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना एक एकर शेतीसाठी ४०,००० हजार रुपये पर्यंत खर्च करावा लागणार आहे. बदलत्या हवामानामुळे शेतीवरील परिणाम आणि खतांचे वाढते दर यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती गंभीर झाली आहे. त्यातच खत उत्पादक कंपन्यांनी मनमानी करत रासायनिक खताच्या किंमतीत वाढ केली आहे. ज्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न आणि खर्च यामध्ये तालमेल साधने कठीण झाले आहे. त्यामुळे शासनाने रासायनिक खतावर नियंत्रण आणण्याची मागणी शेतकऱ्यांमधून होत आहे.

# गुरुदेव सेवाश्रम येथे आज सुसंस्कार शिबिराचा समारोप

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मानोरा, दि. ९ :** तालुक्यातील रुई - गोस्ता येथे श्री गुरुदेव सेवा आश्रम तसेच माणुसकीची भिंत पुसद यांच्या संयुक्त विद्यमाने सुसंस्कार शिबिर आयोजन दि. १ मे पासून सुरु झाले आहे. या शिबिराचा आज १० मे रोजी समारोप होणार आहे.



यावेळी जिल्हा प्रचार सुनील दसमुखे, वाशिम जिल्हा महिला सेवा अधिकारी ज्योतीताई उगले, मंडळाचे सचिव राठोड, विलास राऊत, पंकजपाल महाराज, दिनेश राठोड, केसाळे महाराज, गुंडाळे गुरुजी, विवेक महाराज, बद्री पाटील, विजू पाटील, पांडुरंग राऊत, सुभाष शिकारे, अवधूत भोरकडे यांच्या उपस्थितीत शिबिराला सुरुवात करण्यात आली . सदर शिबिराचा उद्देश असा की लहान बालकावर सुसंस्कार, सूविचार धारा, सामाजिक ज्ञान, असणे अत्यंत गरजेचे आहे तेव्हा रुई येथील श्री गुरुदेव सेवा आश्रममध्ये दरवर्षीप्रमाणेच याही वर्षी बालकांच्या सुसंस्कार शिबिराचे आयोजन श्री गुरुदेव सेवा आश्रम तसेच पंकजपाल महाराजांच्या वतीने करण्यात आले आहे.

सदर शिबिरामध्ये ६० ते ७० मुलांनी सहभाग नोंदवून शिबिराचा लाभ चांगल्या प्रकारे घेत आहे. तर शिबिरातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन म्हणून केसाळे महाराज, ज्ञानेश्वर महाराज, दिनेश धार पवार, महाराज गुंडाळे, गुरुजी, विवेक महाराज, व इतर श्री गुरुदेव सेवाधारी विचारधारेची मंडळी मार्गदर्शन करीत आहे.

# किरकोळ वादातून मारहाण

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मंगरूळपीर, दि. ९ :** शेजारील वादातून झालेल्या मारहाणीच्या प्रकारात चार जणांविरोधात पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. ही घटना ८ मे रोजी सकाळी घडली.अशोक नगर, मंगरूळपीर येथील रहिवासी गौतम कोकरे (वय १८) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांच्या घराशेजारील विश्वास ताटके व अनिकेत ताटके हे दोघे येण्या-जाण्याच्या सार्वजनिक रस्त्यावर अँगल रोवत होते. कोकरे यांची आई व भाऊ यांनी याला विरोध करीत अडथळा होत असल्याचे सांगितले. यावरून वाद निर्माण झाला. वादादरम्यान, विश्वास ताटके यांनी फिर्यादीला धरून ठेवले व अनिकेत ताटके यांनी दगडाने त्यांच्या डोक्यावर मारले. यामुळे डोक्याला इजा होऊन रक्तस्राव झाला. यावेळी भांडण सोडविण्यास आलेल्या फिर्यादीच्या आई व भावालाही दोन महिलांनी मारहाण करीत शिवीगाळ केली आणि जिवे मारण्याची धमकी दिली, असे तक्रारीत नमूद आहे. या प्रकरणी मंगरूळपीर पोलिसांनी संबंधित चार जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

# विवाहितेचा विनयभंग; रिसोड शहरातील घटना

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**रिसोड, दि. ९ :** रिसोड शहरातील एका नगरामध्ये कार्यक्रमासाठी आलेल्या बाहेरील जिल्ह्यातील एका विवाहितेचा मालेगाव तालुक्यातील शिरपूर जैन येथील युवकाने विनयभंग झाला. पीडितेच्या पती व परिवाराला मारहाण केल्याची घटना दिनांक ४ मे रोजी संध्याकाळी साडेसात वाजताच्या दरम्यान घडली.

पिडीत महिलेने रिसोड पोलीस स्टेशनला दिनांक ६ मे रोजी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, दि.४ मे रोजी चे सायंकाळी रिसोड शहरातील एका नगरामध्ये मुलीचा नामकरणाचा कार्यक्रम चालु होता. यावेळी रोहीत विजय कांबळे हा तिथे हजर होता. रोहीत कांबळे हा माझेकडे वाईट उददेशाने पाहत होता. या दरम्यान कार्यक्रमात त्याने सदर पीडितेला वाइट उद्देशाने स्पर्श करून तिचा विनयभंग केला. त्यामुळे तिने घाबरून पतीला सर्व झालेली घटना सांगीतली. नंतर पीडितेच्या पतीने रोहीत कांबळे यास समजावीण्याकरीता घराचे बाहेर नेले व समजावुन सांगीतले. तसेच रोहीत कांबळे यांची आई यांना बोलावीण्यास सांगीतले. पिडीताचे पती हे रोहीत यास समजावीत असतांना रोहीत कांबळे याने पिडीतेच्या पतीला शिवीगाळ केली व तो पळुन जाइल म्हणुन पिडीतेच्या पतीने रोहीत कांबळेचे शर्ट पकडुन ठेवले. त्यावेळेस त्याची आई तेथे आली माफी मागीतली व ते घरी जाण्यास निघाले असता त्याचेसोबत असलेल्या त्याचा आतेभाऊ वैभव मानवतकर यांनी फोन करून रोहीत कांबळेचे काका अनिल विलास कांबळे व त्याची आजी सिंधुताइ कांबळे (सरपंच) (दोन्ही रा. शिरपुर जैन ता. मालेगाव जि वाशिम ) असे चारचाकी पांढ-या रंगाची कार ने कार्यक्रमाचे ठिकाणी आले, खाली उतरल्यानंतर अनिल विलास कांबळे यांनी त्यांचे गाडीची डिक्की उघडली त्यामधुन अनिल कांबळे यांनी लाकडी काठी काढुन एकदम पिडीताचे पती व देराचे अंगावर धावुन जावुन त्यांना लाठीने मारहाण केली. तेवढयात तेथे हजर असलेल्या लोकांनी ती लाठी पकडली. त्यानंतर तेथे हजर असलेले रोहीत कांबळे, त्याची आइ अनिता कांबळे, काका अनिल विलास कांबळे, आजी सिंधुताइ कांबळे, आत्येभाउ वैभव मानवतकर यांचेपैकी सिंधुताइ कांबळे यांनी पिडितेला म्हणत होते की आमची पोहच खुप दुर आहे आम्ही तुम्हाला कोणत्याही गुन्हयात अडकवु असे म्हणुन तुम्ही जाणार तेथे येवुन तुम्हाला मारून टाकील व तसेच अश्लील शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी रिसोड पोलिसांनी आरोपींच्या विरोधात गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे

# जिल्हाभरात कृषी विभागाची भरारी पथके सक्रिय

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशिम, दि. ९ :** खरीप हंगाम २०२५ साठी शेतकऱ्यांना दर्जेदार खते, बियाणे आणि कीटकनाशके उपलब्ध होण्यासाठी कृषी विभागाने जिल्ह्यात सात भरारी पथके नियुक्त केली आहेत. ही पथके उत्पादन व विक्री केंद्रांवर नियमित पाहणी करणार आहे. अधिक दराने विक्री होत असल्याचे आढळल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस. यांनी दिले.



कृषी निविष्ठा नियंत्रण समितीच्या ६ मे रोजी पार पडलेल्या आढावा बैठकीत सर्व निरीक्षकांना कारवाईचे आदेश देण्यात आले. याशिवाय, शेतकऱ्यांच्या तक्रारी त्वरित नोंदवण्यासाठी जिल्हास्तरावर तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्यात आला आहे. शेतकऱ्यांनी खते, बियाणे वा कीटकनाशकांबाबत तक्रार नोंदवायची असल्यास मोहीम अधिकारी गणेश गिरी यांचा व्हॉट्सअॅप क्रमांक कृषी विभागाकडून घेऊन त्यावर तक्रार नोंदवता येईल. सर्व विक्री व उत्पादन केंद्रांवर क्यूआर कोड लावण्यात येणार असून, तो स्कॅन करून पुराव्यासह तक्रार पाठवता येईल. शेतकऱ्यांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा परिषद कृषी विकास अधिकारी अभिजित देवगीरकर यांनी केले आहे.

अधिकचा नफा मिळिवण्याच्या लालसेपायी खताची लिंकिंग करणे आणि जादा दराने विक्री होत असल्यास संबधित कंपनी किंवा विक्रेता यांचेवर कठोर कारवाई करण्याच्याही सूचना जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस. यांनी कृषी निविष्ठा सनियंत्रण समिती आढावा सभेमध्ये कृषी विभागातील सर्व खते, बियाणे व कीटकनाशके निरीक्षक यांना दिल्या आहेत. निर्देशाचे तंतोतंत पालन करुन शेतकऱ्यांचे हित जोपासावे, अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या आहेत.

अजिंक्य भारत

# आपला जिल्हा

अकोला, शनिवार, दि. १० मे २०२५



## थोडक्यात

### राज्यमंत्री पंकज भोयर यांचा दौरा



**अकोला :** गृह (ग्रामीण), शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर हे आज अकोला जिल्ह्यात आहेत.
त्यांचा दौरा पुढीलप्रमाणे : १० मे रोजी वर्धा येथून सायंकाळी ७ वाजता अकोट येथे आगमन व गजानन मांगले यांच्याकडील विवाह समारंभास उपस्थिती, सायं. ७.३० वा. अकोट येथून शासकीय वाहनाने नागपूरकडे प्रयाण.

### स्वाधार योजनेच्या अर्जातील त्रुटी तत्काळ दूर करा

**अकोला :** भारतरत्न डॉ. बोबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचे अर्ज ऑनलाइन पद्धतीने मागविण्यात आले आहेत. त्यापैकी काही अर्जांमध्ये त्रुटी असून, त्याची पूर्तता करणे आवश्यक आहे. त्रुटी पूर्तता झाल्याशिवाय विद्यार्थ्यांना लाभ देणे शक्य नाही. त्यामुळे २० मेपूर्वी ऑनलाइन पूर्तता करण्याचे आवाहन सहायक समाजकल्याण आयुक्त डॉ. अनिता राठोड यांनी केले आहे. अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांना शिक्षण घेता यावे म्हणून भोजन, निवास व इतर शैक्षणिक सुविधा या विद्यार्थ्यांना स्वतः उपलब्ध करून घेण्यासाठी आवश्यक रक्कम संबंधित विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये थेट वितरीत करण्यासाठी शासनाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना सुरू केलेली आहे.
ज्या विद्यार्थ्यांचे अर्ज त्रुटी असल्याने ऑनलाइन परत पाठविण्यात आले आहेत, त्यांनी आपल्या लॉगिनमध्ये नमूद त्रुटींची पूर्तता करून स्वाधार योजनेच्या लॉगिनकडे २० मेपर्यंत पाठवावेत. ज्या विद्यार्थ्यांनी वसतिगृहासाठी अर्ज केले आहेत; परंतु ते अर्ज रिजेक्ट करण्यात आले आहेत, असे विद्यार्थ्यांनीसुद्धा आपले अर्ज पुन्हा रिसेट करून स्वाधार योजनेच्या लॉगिनकडे लवकरात लवकर पाठवावेत. त्रुटीमधील सेंट बँक केलेले अर्ज विहित मुदतीमध्ये फॉरवर्ड न झाल्याने अर्ज अपात्र ठरल्यास सर्वस्वी जबाबदारी ही विद्यार्थ्यांची राहील, याची गांभीर्याने नोंद घ्यावी, असे आवाहन डॉ. राठोड यांनी केले आहे.

### बालगृहातील ८ विद्यार्थिनींचे १२ वीच्या परीक्षेत यश

**अकोला:** येथील बालगृहांमध्ये राहून ८ विद्यार्थिनींनी बारावीच्या परीक्षेत चांगल्या गुणांनी उत्तीर्ण होऊन कुठल्याही विशेष शिकवणीशिवाय यश संपादन केले आहे. गायत्री बालिकाश्रमातील ४ व सूर्योदय बालगृहातील ४ विद्यार्थिनींनी कुठल्याही विशेष शिकवणीशिवाय १२ वीमध्ये यश संपादन केले आहे. महाविद्यालयाचे वर्ग, पाठ्यपुस्तकांचे वाचन या सामग्रीवर या विद्यार्थिनींनी अभ्यास करून बारावीची परीक्षा उत्तीर्ण केली आहे.
महिला व बालविकास विभागांतर्गत जिल्ह्यात ३ बालगृह व १ शिशुगृह कार्यरत असून बाल कल्याण समितीच्या आदेशाने ज्या बालकांना काळजी व संरक्षणाची गरज आहे, अशा बालकांना तेथे दाखल केले जाते.

### हाजी सय्यद अकबर उर्दू सायन्स ज्युनिअर कॉलेज, पातूरचा परीक्षेत ८५.७१% निकाल




**पातूर:** फेब्रुवारी २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेत, पातूर येथील लोकहित शिक्षण प्रसारक मंडळ संचालित हाजी सैय्यद अकबर उर्दू सायन्स ज्युनिअर कॉलेज, पातूर यांनी उत्तम यश मिळवले आहे. या परीक्षेसाठी एकूण ६३ विद्यार्थी बसले होते, त्यापैकी ५४ विद्यार्थी यशस्वीरीत्या उत्तीर्ण झाले. त्यामुळे कॉलेजचा एकूण निकाल ८५.७१% इतका लागला आहे. विद्यार्थ्यांनी मेहनतीने हा यशस्वी निकाल साध्य केल्याने, संपूर्ण शैक्षणिक क्षेत्रात समाधान व्यक्त होत आहे. विद्यार्थ्यांपैकी उल्लेखनीय गुण मिळवलेले विद्यार्थी असे आहेत. अमरीन फातेमा शे. शकील ६६.५०%,अशफिया फिरदौस शे. आसिफ ६५.५०%, मरयम अफिफ शे. अनिस ६२.३३%,देशमुख सना आफ्रिन मो. रफिक ६१.६७%, अनम फिरदौस मो. इद्रिस ६१.५०%,या यशस्वी विद्यार्थ्यांचा व त्यांच्या कष्टांचा गौरव करण्यासाठी, संस्थेचे अध्यक्ष सय्यद मुजाहीद इकबाल सय्यद मोहसीन, संस्थेचे सय्यद अकबर अब्दुल्ला सय्यद मोहसीन, प्राचार्य शेख नुसरतुल्लाह, तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वर्ग उपस्थित होता. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला व त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

# एकाच टेबलवर ठाण मारून बसलेल्या ४० अधिकाऱ्यांची उचलबांगडी

## जिल्हा परिषद प्रशासनाचा धडाकेबाज निर्णय

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. ९ :** जिल्हा परिषदेत गेल्या काही वर्षांपासून एकाच विभागात एकाच टेबलवर ठाण मारून बसलेल्या ४० अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या कार्यासन, टेबल बदल करण्याचा धडाकेबाज निर्णय जिल्हा परिषदेचे प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज जाधव यांच्या मार्गदर्शनात सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी दिगंबर लोखंडे यांनी घेतला आहे.




गेल्या काही वर्षांपासून जिल्हा परिषदेतील बहुतांश विभागात एकाच टेबलवर ठाण मारून बसलेल्या अधिकारी, कर्मचाऱ्यांचा मनमाणी कारभार वाढला होता. यासंदर्भात जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज जाधव यांच्या मार्गदर्शनात सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी दिगंबर लोखंडे यांनी धडाकेबाज निर्णय घेत जिल्हा परिषदेतील विविध विभागातील ४० अधिकाऱ्यांचे स्थानिक बदल करण्यात आले आहेत. ग्रामविकास विभागाच्या शासन निर्णय १५ मे २०१४ मधील प्रकरण १ मधील अनुक्रमांक ८ यातील (७) मध्ये जिल्हा परिषद कार्यालय, पंचायत समिती कार्यालयात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना एकाच टेबलावर जास्तीत जास्त ५ वर्ष काम करता येईल. एकाच टेबलवर तीन वर्ष झाल्यानंतर त्यांचे कार्यासन, टेबल बदलण्यात यावे तसेच ५ वर्षांनंतर एका विभागातून अन्य विभागात स्थानांतर करण्यात यावे, असे निर्देश आहेत. त्यानुसार सामान्य प्रशासन विभागाने मुख्यालयातील लिपीक वर्गीय संवर्गातील कार्यरत अधिकारी, कर्मचाऱ्यांना एकाच कार्यालयात ५ वर्ष पूर्ण झालेले आहेत. अशा कर्मचाऱ्यांचे स्थानिक बदलांतर्गत शुक्रवारी (ता.९) स्थानांतर करण्यात आले.

### या अधिकाऱ्यांचा समावेश

यामध्ये ५ कनिष्ठ प्रशासन अधिकारी, २ विस्तार अधिकारी (सां), १० वरिष्ठ सहायक, २३ कनिष्ठ सहायक अशा ४० कर्मचाऱ्यांचे स्थानिक बदल करण्यात आले आहेत.

# अवकाळी पावसाने कांदा, ज्वारी व लिंबू पिकाचे नुकसान; शेतकरी अडचणीत

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. ९ :** उरळ व निमकर्दा परिसरासह बाळापूर तालुक्यात अचानक आलेल्या वादळ-वाऱ्यासह पावसाने शेतकऱ्यांच्या नशिबावर पाणी फिरविले आहे. ४५ अंश सेल्सिअस तापमानात काबाडकष्ट करून उभा केलेला कांदा, ज्वारी व लिंबूचा माल या अवकाळी संकटात मातीमोल झाला आहे. काढणीच्या टप्प्यात असलेली कांदा बियाण्याची पिके वाऱ्याने कोलमडली, काही बी जमिनीत मिसळले, तर अनेकांनी साठविलेला कांदाही भिजून गेला आहे.
निमकर्दा गावात सुमारे २०० एकर क्षेत्रावर कांदा बियाण्याचे पीक असून काढणीच्या टप्प्यात असताना जोरदार वाऱ्यामुळे बी खाली कोसळले आहे.



काही बी जमिनीत मिसळल्यामुळे गुणवत्तेवर परिणाम झाला असून, मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. अनेक शेतकऱ्यांनी कांदा कापून झाडांच्या सावलीत ढीग करून ठेवला होता, तोही पावसामुळे भिजून खराब झाला. उन्हाळी ज्वारीदेखील आडवी होऊन पडल्याने काढणी अडचणीत आली आहे. लिंबू व आंब्याची फळे झाडावरून गळून गेल्याने फळबागदार शेतकरीही संकटात सापडले आहेत.या पार्श्वभूमीवर शासनाने तात्काळ पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी जोर धरत आहे.

> ४५ अंश तापमानात काबाडकष्ट करून पिकवलेला कांदा अवकाळी पावसामुळे मातीमोल झाला आहे. आधीच बाजारभाव नाही, त्यात निसर्गाच्या मारामुळे शेतकरी उद्ध्वस्त झाला आहे. शासनाने वेळ न दवडता तातडीने आर्थिक मदत जाहीर करावी, अन्यथा शेतकऱ्यांच्या रोषाला सामोरे जावे लागेल.
>
> **देवानंद साबळे,** जिल्हाध्यक्ष, संभाजी ब्रिगेड, अकोला.
>
> खरीप आणि रब्बी हंगामातील नुकसान भरपाईत बाळापूर तालुक्याला डावलण्यात आलं. आता उन्हाळी हंगामात कांदा, ज्वारी व लिंबू यांसारख्या पिकांचं प्रचंड नुकसान झालं आहे. शेतकऱ्यांची आशा पावसाने हिरावली. शासनाने तातडीने पंचनामे करून भरीव आर्थिक मदत द्यावी, ही आमची ठाम मागणी आहे.
>
> **गोपाल पोहरे,** शेतकरी पुत्र, उरळ.

# बाळापूर रुग्णालयात हलगर्जीमुळे रुग्णाचा ऑक्सिजनअभावी मृत्यू

## नातेवाइकांनी केला आरोप

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**बाळापूर, दि. ९ :** तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रातील (पीएचसी) दुर्लक्षामुळे एका डायलिसिस रुग्णाचा ऑक्सिजनअभावी मृत्यू झाल्याची संतापजनक घटना रविवारी घडली. मोहम्मद शोएब गुलाम शब्बीर (वय ५०, रा. बाळापूर) यांना अचानक श्वास घेण्यास त्रास होऊ लागल्याने नातेवाइकांनी त्यांना तातडीने बाळापूर पीएचसीत दाखल केले; मात्र तेथे ना डॉक्टर होते ना कर्मचारी, अशी माहिती पुढे आली आहे. नातेवाइकांचा आरोप आहे की तब्बल अर्धा तास मदत मिळाली नाही. रुग्णालयात ऑक्सिजन सिलिंडर उपलब्ध नव्हता आणि जो होता तोही रिकामा असल्याचा नातेवाइकांचा आरोप आहे.
रुग्णाची प्रकृती ढासळल्याने नातेवाइकांनी खासगी अंबुलन्स बोलावून अकोल्याकडे रवाना केले; मात्र वाटेतच ऑक्सिजनअभावी त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला असल्याचा आरोप मृताच्या नातेवाइकांनी केला आहे, या घटनेनंतर नातेवाइकांसह सामाजिक कार्यकर्त्यांनी आरोग्य यंत्रणेच्या कार्यप्रणालीवर गंभीर आरोप केले असून, तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. या घटनेनंतर संतप्त नातेवाइक आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी संबंधित डॉक्टर व कर्मचाऱ्यांवर तत्काळ कठोर कारवाईची मागणी केली आहे.

# सुकळी येथील पिण्याचे पाणी आणि घरकुल योजनेसह नमुना ८संबंधित आमरण उपोषणाची सांगता

## गटविकास अधिकारी यांनी लेखी पत्र देऊन उपोषणकर्त्यांना दिले आश्वासन

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**पातूर, दि. ९ :** पातूर तालुक्यातील सुकळी गावातील ग्रामसभेमध्ये सुकळी येथील उपसरपंच यांनी निवेदन दिले होते, ज्यामध्ये मातंग समाजाला रमाई घरकुल योजनेंतर्गत लाभ देण्यासाठी प्राधान्य प्रमाणे यादी तयार करण्याची मागणी केली होती, तसेच पातूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांना मौखिक आणि लेखी तक्रारी निवेदने दिले.
१० महिन्याचा कालावधी उलटूनही मागणी पूर्ण झाली नाही त्यामुळे ७ मे २०२५ पासून पातूर पंचायत समितीसमोर सुकळी येथील मातंग समाजाचे लाभार्थीनी आमरण उपोषण सुरू केले होते. सदरचे निवेदन ५ मे २०२५ ला पातूर पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी यांना देऊन त्यामध्ये रमाई आवास योजनेची यादी तयार करून त्यामध्ये मातंग समाजाचे लाभार्थींचा समाविष्ट करून अकरा टक्के राखीव प्रवर्गातून लाभ देण्यात यावा नमुना आठ संबंधी नमुना आठमध्ये नावे नोंदणी करून नमुना आठ देण्यात यावा. वार्ड क्रमांक तीनमध्ये शासकीय विहिरीमध्ये पिण्याच्या पाण्याची तत्काळ सोय उपलब्ध करून द्यावी, अशा मागण्या निवेदनात नमूद करून ईश्वर सुरेश भिसे, सहदेव चिटकुल भिसे, लखन नामदेव भिसे, सचिन भिसे, मनीष गवई, रामचंद्र हिवराळे,इतर दहा ते पंधरा लाभार्थी आदीनी उपोषण सुरु केले होते . यावेळी उपोषण मंडपाला पातुर शहर शिवसेना शहराध्यक्ष निरंजन बंड यांनी तथा सागर कढोणेयांनी भेट देऊन पाठिंबा दिला आणि न्यायाची मागणी केली होती त्याची दाखल घेऊन पातूर पं. सच्या गटविकास अधिकारी इंगळे मॅडम पं. स. सदस्य ॲडव्होकेट सुरज झडपे, पं. स. सदस्य गोपाल ढोरे आदिच्या उपस्थितीत उपोषणकर्त्यांना मोसंबी जूस देऊन उपोषण समाप्त केले.

# पातूर-अकोला महामार्गामुळे आणि पुलामुळे शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी रस्ताच नाही



दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**पातूर, दि. ९ :** येथील पातूर-अकोला महामार्ग झाल्यामुळे पातूर-अकोला महामार्गावरील पाचमोरीच्या ठिकाणी पूल केल्यामुळे पाचमोरी पुलाखालील रस्ता बंद झाला असून, शेतकऱ्यांना शेतरस्ता नसल्यामुळे शेतीची मशागतीची कामे थांबलेली आहेत तर पावसाळ्यापूर्वी शेतीची मशागत करण्यासाठी शेतकऱ्यांनी पाचमोरी नाल्यांमध्ये अडचणी दूर करून रस्ता उपलब्ध करून देण्याची मागणी ७ मे २०२५ ला पातूर तहसीलदार यांना निवेदन देऊन केली आहे.
सविस्तर वृत्त असे आहे की, शेत सर्वे नंबर १३७--३मध्ये शेतात शेती करतात, यामध्ये सद्यस्थितीत शेती मशागतीची कामे करावी लागत असून, रस्ता उपलब्ध नसल्यामुळे शेती मशागतीची कामे करण्यासाठी अडचणी येत आहे तथा विलंब सुद्धा होत आहे. आता थोड्या दिवसात पावसाळा सुरू होणार असून, त्यापूर्वी शेतीची मशागत करणे गरजेचे आहे; मात्र रस्ता नसल्यामुळे सदरची कामे खोळंबले आहे. शेतामध्ये जाण्यासाठी अकोला रोड लगत असलेल्या पाचमोरी नाला उपलब्ध असून, त्या नाल्यातून शेतामध्ये जात होते; मात्र नाल्यामध्ये काही काही ठिकाणी मोठमोठे दगड मातीचे ढीग साचले असल्यामुळे त्या नाल्याने जाणे कठीण जात आहे, करिता प्रशासनाच्या स्तरावर सदर नाल्यांमधील रस्त्यामध्ये अडचण ठरणारे दगड मातीचे ढीग हटविण्यात यावे जेणेकरून शेतामध्ये जाणे सोयीस्कर होईल, अशी मागणी निवेदनातून केली. निवेदनकर्त्यामध्ये यावर खान अब्बास खान, उमेश गाडगे, नारायण कुटे,योगेश शिवहरी काळे,प्रिया मंगेश मोकळकार,ओंकार महादेव पजई,संजय राऊत,राजूभाऊ हाडके,संजू पाटील, रमेश ठाकूर, रामकृष्ण तायडे, हरिभाऊ तायडे, सागर माहुलीकर आधी शेतकऱ्यांची उपस्थिती होती.

> शेतीची मशागतीची कामे कोळंबू नये आणि शेतकऱ्यांना शेतामध्ये जाण्यासाठी सोयीस्कर रस्ता करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग विभागाशी संपर्क साधून लवकरच रस्ता तयार करण्याचे सुचवले आहे. लवकरच शेतकऱ्यांच्या अडचणी दूर होतील. शेत रस्त्यासाठी त्यांनी कोणत्याही प्रकारची लोकवर्गणी करू नये.
>
> **डॉ. राहुल वानखडे,** तहसीलदार पातूर.

> राष्ट्रीय महामार्गाचे विभागाशी संबंधित कंत्राटदार आणि अभियंता यांच्याशी संपर्क साधला आहे. ते लवकरच पासमोरी नाल्यांमध्ये शेतरस्ता लवकर करून देतील.
>
> **श्याम खरडे,** अभियंता अमरावती विभाग.

# अकोटचे ४० नागरिक अडकले पठाणकोटमध्य; सर्वजण सुरक्षित

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोट, दि. ९ :**जम्मू-काश्मीर सीमेवर सुरक्षा यंत्रणांनी ब्लॅक अलर्ट जारी केल्यामुळे अकोट तालुक्यातील सुमारे ४० महिला, पुरुष व लहान मुले पठाणकोटमध्ये अडकले आहेत.या गटात भाजप युवा मोर्चा जिल्हा सरचिटणीस प्रवीण डिक्कर, राष्ट्रवादी काँग्रेस सोशल मीडिया जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर मानकर,सिव्हिल इंजिनियर रवी पवार,प्रवीण डिक्कर,ज्ञानेश्वर मानकर,रवी मनोहर पवार,चंदन चंडालिया,प्रवीण बानेरकर,संजय शेगोकार,परीक्षित बोचे,विठ्ठल डोबाळे,विशाल उपासे,सागर कोरडे,प्रवीण वाघ,गोपाल पाटील,अनिल तंवर यांचा समावेश आहे.सध्या सर्वजण सुरक्षित असून, जिल्हा प्रशासनाशी सातत्याने संपर्क सुरू आहे.अकोट येथील नागरिक पठाणकोटमध्ये सुरक्षितस्थळी थांबले आहेत. आता पठाणकोटमधून अकोट येण्यासाठी आम्ही स्वतः गाडीने निघालो, अकोट तहसील कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय अकोला, शहर पोलीस स्टेशन अकोट यांनी सर्व प्रवाशांची संपर्क साधला.

> आम्ही पठाणकोट येथे होतो तेथील स्थानिक पोलीस,आर्मी,नागरिक यांनी आम्हाला सहकार्य केले.आम्ही सर्वजण आता सुखरूप आहोत.अकोला प्रशासनाचे देखील धन्यवाद.

# पातूर शहरातील पाणीटंचाईवर राष्ट्रवादी काँग्रेसचे नगर परिषदेला निवेदन

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**पातुर, दि. ९ :** यशहर सध्या पाणीटंचाईच्या संकटात असून, नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी प्रचंड हाल सोसावे लागत आहेत. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे आ.अमोल मिटकरी, जिल्हाध्यक्ष मो. बदरुजमा यांच्या मार्गदर्शनात पातूर नगर परिषद मुख्याधिकारी यांना निवेदन देत तत्काळ उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली आहे.
निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, शहरातील अनेक भागांमध्ये पंधरा ते वीस दिवसांपासून नियमित पाणीपुरवठा होत नाही. महिलांना, वृद्ध नागरिकांना व लहान मुलांना या टंचाईचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. पाईपलाईन फ टीमुळे लाखो लिटर पाणी वाया जात असून, प्रशासनाकडे वारंवार तक्रारी करूनही त्यावर योग्य ती कारवाई केली जात नाही, ही अत्यंत गंभीर बाब असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेसने म्हटले आहे. पाणीपुरवठा विभागाचे कामकाज, नियोजन व नियंत्रण पूर्णतः अपयशी ठरत असल्याची तीव्र टीकाही निवेदनात करण्यात आली आहे.
निवेदनातील मुख्य मागण्याः
पाणीटंचाई दूर करण्यासाठी विशेष पथकाची स्थापना करून त्वरित उपाययोजना करावी, वारंवार फुटणाऱ्या पाईपलाईनचे कायमस्वरूपी दुरुस्ती काम हाती घ्यावे.
शहरातील प्रत्येक वॉर्डात आठवड्यातून किमान दोन वेळा पाणीपुरवठा नियमित करावा, पाणीटंचाईबाबत नागरिकांसमोर खुलासा करावा, दोषी अधिकाऱ्यांवर व ठेकेदारांवर शिस्तभंगाची कारवाई करावी, 'पाणी टंचाई नियंत्रण कक्ष' स्थापन करावा. राष्ट्रवादी काँग्रेसने प्रशासनाकडून तत्काळ सकारात्मक प्रतिसाद मिळावा, अन्यथा आंदोलनाचा इशारा दिला आहे.

### कृषी उत्पन्न बाजार समिती, खामगाव बाजार भाव

| वान | भाव |
|---|---|
| ज्वारी | २१००-२३०० |
| गहु | २२००-२४७५ |
| मका | १०५०-२०५० |
| उडीद | ६०००-६००० |
| मुग | ६६००-६९०० |
| तुर | ६५००-७२०० |
| हरभरा | ५५००-५६५० |
| भुईमुग | ४७०१-५८९० |
| सोयाबीन | ३६५०-४३२५ |

# एमआयडीसी नसल्याने तरुणांच्या हाताला कामही नाही

## जिल्ह्याच्या औद्योगिकरणाचे स्वप्न अधांतरी !

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
बुलडाणा , दि.९

**बुलढाणा जिल्हा हा शेतीप्रधान जिल्हा आहे. मोठे उद्योग नसल्याने इथले अर्थकारण हे शेतीवरच अवलंबून आहे, आणि शेतीची अवस्था ही अत्यांत बिकट झाली आहे.गेल्या काही वर्षांपासून राज्यातील आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांमध्ये बुलढाणा जिल्ह्याचा समावेश होतो.**

आर्थिक कोंडी होत असल्याने जिल्ह्यामध्ये आत्महत्येचे प्रमाण अर्थातच मोठ आहे. यावर उपाय म्हणून जिल्ह्यातील एमआयडीसी विकसित करणे व उद्योगधंद्यांची रेलचेल करून तरुणांच्या हाताला इथेच काम देणे हा पर्याय उपलब्ध असला तरी राजकीय इच्छाशक्तीच्या उदासीन-पणामुळे जिल्ह्याच्या औद्योगीकरणाचे स्वप्न अद्यापही अधांतरीच आहे. बुलढाणा, चिखली, खामगाव या ठिकाणी एमआयडीसीत थोडेफार उद्योग उभे राहि-ले मात्र ''औद्योगिक हब '' अशी ओळख या ताल-ुक्यांना निर्माण करता आलेली नाही. इतर तालुक्यांमध्ये तर एमआयडीसीला अद्याप जागाही मिळवयाची आहे. असे भीषण वास्तव आहे. जिल्ह्याने अनेक मंत्री राज्याला दिले. मात्र, जिल्ह्याचा औद्योगिक तोंडवळा बदलला गेला नाही. १९६० मध्ये महाराष्ट्रा-ची निर्मिती झाली. त्याानंतर काँग्रेस , भाजप व मित्र पक्षा सह अनेक राजकीय पक्षा-ची सरकारे बुलडाणा जिल्ह्याने अनुभवली.



तरीही इथल्या तरूणाला रोजगाराच्या शोध-ार्थ मुंबई, पुणे सारखी मोठी शहरे धुंडाळावी लागतात. आता महाराष्ट्रात शिवसेना, काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे एकत्रित सहभाग असलेले महाविकास आघाडीचे सरकार आले. त्याामुळे तरूणांच्या आशा उंचावल्या असून, आता जिल्ह्यात नवे उद्योग उभे राह-तील. अशी आशा आहे. बुलडाणा जिल्ह्याच्या आजवरच्या राजकीय इतिहासावर नजर टाकली असता अण्णासाहेब देशमुख, भाऊसाहेब लोढे, तात्यासाहेब बोंद्रे, तर अलीकडच्या काळात सुबोध सावजी, खा. प्रतापराव जाधव, डॉ. राजेंद्र शिंगणे, आ.डॉ. संजय कुटे इत्यादी मंत्री जिल्ह्याने महाराष्ट्राच्या राजकारणाला दिले आहे. परंतु मंत्री पदाचा उपयोग जिल्ह्यामध्ये कोणतेच मोठे उद्योग आणण्यात यशस्वी ठरला असे म्हणता येत नाही.बुलडाण्यासह मलकापूर, खामगाव, मेहकर, चिखली खली आदी ताल-ुक्यात एमआयडीसीसाठी जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे. मात्र, खामगाव, मलका-पूर तर, काही प्रमाणात चिखली वगळता इतर कोणत्याही तालुक्यात एमआयडीसीच्या जागेवर रोजगाराच्या संधी देणारे मोठे उद्योग सुरू नाहीत. काही तालुक्यातील एमआयडीसीच्या जागेवर लोकांनी चक्क अतिक्रमण करून शेती करणे सुरू केल्याचे दिसते. जिल्ह्यात अनेक ठिकाणी पाण्याची मुबलक सुविधा आहे. कच्चा माला-ची सोय आहे. पुरेसे मनुष्यबळ आहे. वाहतुकी योग्य रस्ते आहेत. मात्र, असे असताना उद्योग आणण्यात राजकीय महत्वाकांक्षा कुठे कमी पडत आहे. हे एक कोडेच म्हणावे लागेल. जिल्ह्याला औद्योगिक हब करण्यासाठी सर्व राजकीय पक्षांच्या नेत्यांनी एकत्रित येवून कार्य करण्याची गरज आहे. आता बुलडाणा जिल्ह्यात सत्तांतर झाले असल्याने नवनियुक्त सर्वच आमदारांनी जिल्ह्याच्या औद्योगिकरण व वकासासाठी पुढा-कार घेणे आवश्यक आहे. यामुळे बेरोजगार तरूणांच्या हातालाही काम मिळेल व मागास ही ओळख देखील पुसली जाईल हे नक्कीच.

> शाळा कॉलेजमधून डिग्री घेतल्यानंतर तरुण वर्ग पुणे मुंबई औरंगाबाद सुरत हैदराबाद अशा ठिकाणी धाव घेतात.बुलढाणा जिल्ह्यामध्ये औद्योगिकरण असल्याने तरुणांच्या हाताला काम नाही. शिक्षण आणि उच्च शिक्षण घे-ऊन इथला तरुण दुसऱ्या राज्यात व जिल्ह्यात जाऊन काम करतो मात्र जिल्ह्यातच त्याला संधी उपलब्ध झाल्यास तरुणांच्या हाताला काम व शेतकऱ्यांच्या घरात दाम मिळेल. यामुळे आत्महत्येच्या दृष्ट चक्रात अडकलेल्या शे-तकरी कुटुंबांनाही नक्कीच हातभार मिळू शकतो.

## थोडक्यात

### डोंगरखंडाळा गावासाठी टँकर मंजूर

**दे.राजा** : पाणी टंचाईची तीव्रता लक्षात घेता बुलढाणा तालुक्यातील डोंगरखंडाळा गावासाठी पाणी पुरवठ्याकरिता टँकर मंजूर करण्यात आले आहे. आदेशात ठरवून दिल्याप्रमाणे नियमित टँकरव्दारे पाणी पुरवठा केल्या जाणार आहे, अशी माहिती बुलढाणा उपविभागीय अधिकारी यांनी दिली. डोंगरखंडाळा येथे १ हजार ६०३ पशुधन व ८ हजार लोकसंख्येसाठी एक टँकरद्वारे १६ हजार लिटर्स पाणी पुरवठा दररोज करणार आहेत. पाणी टंचाईची तीव्रता लक्षात घेता पाणी पुरवठ्याकरिता टँकर मंजूर करण्यात आले आहे. टँकरने केलेल्या खेपांची ग्रामपंचायतीला नोंद घेण्यात यावी. नोंदवहीची तपासणी नियमितपणे गटविकास अधिकारी यांनी करावी. निवीदाधारकाने टँकर नादुरूस्त झाल्यास त्वरित दुसरे टँकर उपलब्ध करून द्यावे, असे उपविभागीय अधिकारी यांनी प्रसिद्धीपत्रकाव्दारे कळविले आहे.

### माजी सरपंच बिस्मिल्लाह खां यांचे निधन

**देऊळघाट** : राजकीय दृष्ट्या महत्वाचे मानले जाणाऱ्या देऊळघाट गावाचे २ वेळा सरपंच राहिलेले बिस्मिल्ला खां किश्वर खां यांचे आज ८ मे रोजी सकाळी ६ वाजेच्या सुमारास बुलढाणा येथील एका खाजगी रुग्णालयात उपचारादरम्यान दुःखद निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ८५ वर्ष होते. त्यांच्या जाण्याने देऊळघाट परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. सुरुवातीपासूनच काँग्रेस पक्षाशी एकनिष्ठ राहिलेले देऊळघाटचे माजी सरपंच बिस्मिल्ला खां हे बुलढाण्याचे माजी आमदार तथा काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांचे अत्यंत निकटवर्तीय होते. २ वेळा त्यांनी देऊळघाट येथील सरपंच पद भूषविले आहे, ५ दिवसा अगोदर त्यांना बुलढाणा येथील एका खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले होते, परंतु आज गुरुवारी सकाळी प्राणज्योत मालवली.त्यांना देऊळघाट येथील कब्रस्तान मध्ये सुपूर्द ए खाक करण्यात आले. अंत्याविधीच्या कार्यक्रमात जिल्हाभरातील सर्व धर्मीय नागरिक मोठ्या संख्येत उपस्थित होते.

### महात्मा ज्योतिबा फुले कनिष्ठ महाविद्यालयाचा १०० टक्के निकाल

**लाखनवाडा** : येथील महात्मा ज्योतिबा फुले कनिष्ठ महाविद्यालय लाखनवाडा यांच्या विद्यार्थ्यांनी बारावीच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे. वर्ग बारावीच्या सर्व ४९ विद्यार्थी परीक्षेला बसले व पूर्ण पास झाले. प्रथम क्रमांक ओम कवडकर ७६.८३, व्दितीय शितल शिरसाट ६८.००, तृतीय प्रियंका देऊळकर ६५.३३ घेऊन कला शाखेमध्ये उत्तीर्ण झाले आहेत. उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे प्राचार्य रवींद्र चाटे प्राध्यापक सुमित वाकोडे प्राध्यापक मिलिंद वाकोडे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

# माहुली फाट्यावर भीषण अपघात; दोन चिमुकल्यांचा दुर्दैवी मृत्यू

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
जळगाव जा. दि.९

तालुक्यातील माहुली फाटा येथे भरधाव टिप्परने दुचाकीला जोरदार धडक दिल्याने भीषण अपघात झाला. या अपघातात दोन निरागस बालकांचा मृत्यू झाला असून, दोन जण गंभीर जखमी झाले आहेत. ही दुर्दैवी घटना ९ मे २०२५ रोजी सकाळी १० ते १०:३० च्या सुमारास घडली.

फिर्यादी प्रफुल प्रकाश खेडकर हे आपल्या कुटुंबीयांसह मोटारसायकलवर शेगाव येथे लग्न सोहळ्यासाठी निघाले होते. माहुली फाटा येथे त्यांच्या वडिलांच्या दुचाकीला गिट्टीने



भरलेल्या २८ ८४८९ क्रमांकाच्या टिप्परने मागून जोरदार धडक दिली. या भीषण धडकेत त्यांच्या आई साधना खेडकर (५५) आणि वडील प्रकाश खेडकर (६०) गंभीर जखमी झाले, तर भाचे पार्थ अक्षय चोपडे (६) आणि युवराज मोहन भागवत (५) या दोन निष्पाप मुलांचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला.अपघाताची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले. त्यानंतर फिर्यादीच्या तक्रारीवरून टिप्पर चालकाविरोधात कलम २८१, १२५(ब), १०६(१) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोउपनी स्नेहा शेंडगे करत आहेत.

या दुर्दैवी घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. रस्त्यावरील बेफाम वेग आणि निष्काळजीपणामुळे निष्पाप जिवांचे बळी जात असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. प्रशासनाने यावर कठोर उपाययोजना करावी, अशी मागणी होत आहे.

# स्वाभिमानीचा तहसील कार्यालयात ठिय्या

## पीक विम्याच्या पैशावर सरकारची नजर

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
मलकापूर दि.९

मलकापूर कंपनी च्या नियमाप्रमाणे शेतकऱ्यांना पिक विमा देण्यात यावा. कंपनीचा नियम असा सांगतो क्लेम केल्यानंतर सर्वे झाल्यावर पंधरा ते वीस दिवसाच्या आत शेतकऱ्यांच्या खात्यात मदत मिळायला पाहिजे. विमा काढून क्लेम करून २ वर्ष ३ वर्ष कंपनी पिक विमा देत नसेल तर शेतकऱ्यांच्या पिक विम्याच्या पैशावर सरकारची नजर आहे. असा आरोप संघटने कडून होत आहे.

कोणत्या शेतकऱ्यांना जास्त पैसे कोणत्या शेतकऱ्यांना कमी असा दुजा भाव कंपनी शेतकऱ्यानं सोबत करत आहे. अनेक मंडळाचे पर्जन्य मापक बंद आहे. बाजूच्या मंडळावरून बंद असलेल्या मंडळाला अंदाजे मदत केली जाते मग ज्या मंडळाचे पर्जन्यमापक चालू आहे त्या मंडळात हेक्टरी २५ हजार ३० हजार असा पिक विमा येतो आणि त्याच मंडळावरून ज्या मंडळाचे पर्जन्यमापन बंद आहे त्यांना हेक्टरी २ हजार ३ हजार असा पिक विमा देण्यात येतो. हा कोणता न्याय आहे. यावर अजूनही शेतकऱ्यांना ठोस उत्तर मिळाले नाही. मलकापूर नांदुरा तालुक्यातील अजूनही बहुसंख्य शेतकऱ्यांना पिक विमा मिळाला नाही.



शेतकऱ्यांच्या विविध योजनांचे पैसे सरकार थांबवून स्वतः वापरते या सर्व धोरणा मुळे शेतकरी कर्ज बाजारी झाला असून सरकार शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यास ही नाकार देत आहे. शेतकऱ्यांच्या नावावर तिजोरी खाली केली जाते व नेते मंत्री आमदार यांची घर भरली जातात असा आरोप करत स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे आज मलकापूर तहसील कार्यालयात ठिय्या. सरकारने एकदा शेतकऱ्यांना सांगून द्यावं आम्ही जगावं की मराव. १० दिवसाचा अल्टिमेटम मागण्या मान्य न झाल्यास आता शांततेच्या मार्गाने आलो उद्या संघटनेचे कार्यकर्ते भगतसिंगाच्या मार्गाने येतील.

या वेळी युवक जिल्हाध्यक्ष निलेश नारखेडे, स्वाभिमानी शेतकरी संघटना नांदुरा तालुका अध्यक्ष चरणसिंह राजपूत, युवक तालुकाध्यक्ष नांदुरा गोलू पाटील, नानाभाऊ इंगळे, सचिन राणे, हर्षल नारखेडे इतर शेतकरी हजर होते.

# नि:शुल्क किलबिल वाचनालयाचे उदघाटन; कस्तुराई बहुउद्देशीय संस्थेचा उपक्रम

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
शेगाव दि.९

शेगाव कस्तुराई बहुउद्देशीय संस्था शेगाव व युवा विकास बहु उद्देशीय संस्था अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने ८ मे २०२५ रोजी माने नगर शेगाव येथे मुलांकरिता किलबिल या निशुल्क वाचनालयाचे उद्घाटन व पालकांकरिता समुपदेशन आयोजित करण्यात आले होते सर्वप्रथम कार्यक्रम चे अध्यक्ष प्राध्यापक योगेश जी शर्मा सर, विशेष उपस्थिती तहसीलदार दीपक जी बाजड साहेब. विद्यार्थी पालक शिक्षक समुपदेशक अरविंद जी शिंगाडे सर प्रा अहिर मॅडम संस्थेच्या अध्यक्षा कालिंदी असंबे व गोपाल जवुळकर यांनी महाराजांचे प्रतिमा पूजन करून वाचनालयाचे उद्घाटन केले. सर्व मान्यवरांना पुष्पगुच्छ, वृक्ष व पुस्तक भेट देऊन सन्मान करण्यात आला. तहसीलदार व शर्मा सर यांनी मुलांना पुस्तक वाचनाविषयी जागरूक केले. मस्कुजी बुरुंगले कला व विज्ञान महाविद्यालय शेगाव यांनी संस्थेच्या या वाचनालय करिता २०० पुस्तके उपलब्ध करून दिलेत. त्याबद्दल संस्थेच्या वतीने त्यांचे आभार व्यक्त करण्यात आले.कार्यक्रम करिता वनश्री विठ्ठलजी मिरगे, खुशी वानखडे,सुहानी पिसे,गुंजन पिसे , ईरा पाटील, हिमांशू, कृतिका सूर्यवंशी, मीरा दगडखेर, सह सर्व संस्थेच्या सदस्यांचे सहकार्य लाभले

# वादळी वाऱ्यामुळे केळीचे पीक उध्वस्त

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
जळगाव जा. दि.९

तालुक्यातील धामणगाव गोतमारे येथील भगवान राम रतन गोतमारे यांचे धामणगाव शिवारातील गट क्रमांक ७ मधील क्षेत्रफळ १ हेक्टर वरील काढणीला आलेले केळी पिक हे जमीन दोस्त झाल्याने केळी उत्पादक शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान होऊन त्यांना आर्थिक फटका बसला आहे. दि .६ मे च्या संध्याकाळच्या सुमारास एकाकी वादळ आल्याने केळीचे घडा सहित झाडांचा सुपडा साफ झाला. त्याचबरोबर गावातील प्रल्हाद गोतमारे, प्रकाश गोतमारे, व अरुण रहाटे या शेतकऱ्यांचे ही केळी पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. आधीच कर्जबाजारी असलेल्या शेतकऱ्यांवर असे अस्मानी संकट ओढवून आल्याने शेतकऱ्यांचे जीवन विस्कळीत झाले आहे. तरी शासनाकडून त्वरित पंचनामे करून व नुकसान भरपाईची मागणी संबंधित शेतकऱ्यांकडून होत आहे..



# अपात्र शिधापत्रिका मोहीम राबविण्यासाठी रास्त धान्य दुकानदारांना आदेश

## ३१ मे पर्यंत अहवाल सादर करावा लागणार

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
साखरखेर्डा दि.९

संपूर्ण महाराष्ट्रात अपात्र शिधापत्रिका मोहीम राबविण्यासाठी रास्त दुकानदारांना आदेश पारित करण्यात आले असून अंत्यादय अन्न सुरक्षा योजना आणि प्राधान्य कुटुंब योजना अशा दोन गटांत विभागणी करण्यात आली आहे.

सिंदखेडराजा तालुक्यातील १३५ रास्त धान्य दुकानदार आहेत. आजही बोगस राशन कार्ड धारक यांची संख्या अधिक आहे. बोगस राशन कार्ड धारक यांची नावे कमी करण्यासाठी ही मोहीम २९ जून २०१३ शासन निर्णय आणि १ फेब्रुवारी २०१४ राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम २०१३ ची अंमलबजावणी सुरू आहे. अंत्योदय अन्न सुरक्षा योजना व प्राधान्य कुटुंब योजना अशा दोन गटांत लाभार्थ्यांचे विभाजन करण्यात आले आहे . शासन निर्णय क्रमांक ३ अन्वये अंत्योदय अन्न सुरक्षा योजना व प्राधान्य कुटुंब योजना गटातील उत्पन्न तपासणीसाठी नवीन हमीपत्राचे प्रारुप विहित करण्यात आले आहे. लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्था ( नियंत्रण ) आदेश २०१५ मधील तरतुदीनुसार शिधापत्रिका तपासणी मोहीम ही निरंतर प्रक्रिया आहे. सद्यस्थितीत देण्यात आलेल्या अंत्योदय व प्राधान्य कुटुंब लाभार्थी केशरी व शुभ्र सर्व प्रकारच्या शिधापत्रिका तपासणी करण्यासाठी दरवर्षी १ एप्रिल ते ३१ मे या कालावधीत शोधमोहीम राबविण्यात येणार आहे. शिधापत्रिका धारकांना फॉर्म विनामूल्य उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

संबंधित गावातील रास्त दुकानदारांना जोडलेल्या शिधापत्रिका धारकांना रहिवासी पुरावा जोडणे आवश्यक आहे. त्याच बरोबर इतर आवश्यक माहिती भरुन अर्ज रास्त दुकानदारांना भरून देणे आवश्यक आहे. असा आदेश तहसीलदार अजित दिवटे यांनी दिले आहेत .

# वाढदिवसाला देशभक्तीची किनार: उभा केला सैनिक कल्याण निधी

## अवयवदानाच्या संकल्पाने जयश्रीताई शेळके यांचा वाढदिवस ठरला लक्ष्यवेधी !

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
बुलडाणा. दि.९

सामाजिक बांधिलकी जपत आपला वाढदिवस साजरा करण्याची परंपरा कायम ठेवत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या प्रवक्त्या ॲड. जयश्रीताई शेळके यांनी यावर्षी अवयवदानाचा संकल्प करून वाढदिवस साजरा केला. तसेच वर्तमान परिस्थिती पाहता बुके व शाल श्रीफळ न आणता कुठली भेटवस्तू देण्याची इच्छा असेल तर त्यांनी सैनिक कल्याण निधी-ला निधी द्यावे असे आवाहन केल्याने वाढदिवसानिमित्त मोठा निधी देखील जमा करता आला. स्थानिक गर्दे वाचनालय येथे शेळके यांच्या वाढदिवसानिमित्त दिवसभर विविध उपक्रम राबविण्यात आले. जयश्रीताई शेळके यांनी आजवर अनेक विधायक उपक्रमांतून आपला वाढदिवस साजरा केला आहे गरजू मुलांना शिक्षणासाठी दत्तक घेणे, महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी भांडवल उपलब्ध करुन देणे, रक्तदान शिबिरांचे आयोजन करणे यांसारख्या उपक्रमांमुळे त्यांची सामाजिक संवेदनशीलता अधोरेखित होते. यावर्षी त्यांनी अवयवदानाचा संकल्प करत समाजासमोर एक सकारात्मक आदर्श ठेवला आहे.




भारतात दरवर्षी लाखो रुग्ण किडनी, लिव्हर, हृदय व डोळ्यांसारख्या अवयवांच्या प्रत्यारोपणाची प्रतीक्षा करत असतात. मात्र, उपलब्धतेअभावी अनेकांना प्रचंड वेदना सहन कराव्या लागतात आणि काही वेळा प्राणही गमवावे लागतात. दरवर्षी सुमारे ५ लाख रुग्णांना अवयवांची गरज असते, पण केवळ १०,००० अवयवच उपलब्ध होतात. त्यामुळे दर तासाला एका रुग्णाचा मृत्यु फक्त अवयव न मिळाल्यामुळे होतो. भारतामध्ये १० लाख लोकांमागे फक्त ०.५२ लोक अवयवदान करतात. दरवर्षी किडनीसाठी २ लाख लोकांना गरज असते, पण ८,००० प्रत्यारोपणच शक्य होतात. यकृतासाठी ५०,००० रुग्णांपैकी फक्त १,५०० जणांनाच ते मिळते. १५,००० लोकांना हृदयाची गरज असते, परंतु केवळ २५० प्रत्यारोपण होतात. डोळ्यांसाठी १० लाख रुग्णांमध्ये फक्त ५,००० जणांनाच डोळे मिळतात. या पार्श्वभूमीवर ॲड. जयश्रीताई शेळके यांचा निर्णय समाजप्रबोधन आणि प्रेरणादायी कृतीचा उत्तम आदर्श ठरतो आहे. कार्यक्रमावेळी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे जिल्हा संपर्कप्रमुख मा.नरेंद्रभाऊ खेडेकर, जिल्हाध्यक्ष मा. जालिंदरभाऊ बुधवत, राजर्षी शाहू ग्रामीण सहकारी पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष भाऊसाहेब शेळके, जिल्हा समन्वयक संदीपदादा शेळके, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा कार्याध्यक्ष मा. नरेशभाऊ शेळके, सुनिलभाऊ सपकाळ, सतिषभाऊ मेहेंद्रे, आशिषबाबा खरात, लखनभाऊ गाडेकर,किसन धोंडगे, विजय इतवारे, अशोकराव गव्हाणे, मोहम्मद सोफियान, गजानन उबरहंडे, एकनाथ कोरडे, अनिकेत गवळी, संजय शिंदे इ. मान्यवर उपस्थित होते.



अजिंक्य भारत
आपलं अमरावती
शनिवार, दि. १० मे २०२५

# थोडक्यात

## चिचखेडची पलक गडलिंग बारावीत प्रथम



**पूर्णानगर :** येथून जवळच असलेल्या निरूळ गंगामाई येथील प्रागतिक शिक्षण संस्था, द्वारा संचालित प्रागतिक कनिष्ठ महाविद्यालय मधून इयत्ता बारावी मधून चिचखेड उमरापूर येथील पलक जयंती गडलिंग ही शाळेतून ९२.८३% गुण मिळून तिने शाळेतून प्रथम क्रमांक पटकविल्याने तिचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. मार्च २०२५ मधे घेण्यात आलेल्या एचएससी परीक्षेसाठी एकूण २५ विध्यार्थी बसले होते, त्यात २२ उत्तीर्ण झाले असून शाळेचा एकूण ८८% निकाल लागल्याचे प्राचार्य गजाननराव तांबडे यांनी प्रतिनिधीला भ्रमणध्वनी द्वारे सांगितले पलक आपल्या येशाचे श्रेय आई, वडील व शिक्षक यांना देते.

## तीन उपसरपंच अविरोध

**अमरावती :** जिल्ह्यात पाच तालुक्यातील पाच ग्रामपंचाययतींमध्ये मंगळवारी सरपंच, उपसरपंच पदाकरिता निवडणुक घेण्यात आली. यामध्ये तीन उपसरपंच अविरोध झाले असून पुसला ग्रामपंचायतींमध्ये मात्र निवडणुक घेण्यात आली. माहूली जहागिर येथील सरपंच पदाच्या निवडणुकीवर न्यायालयाचा स्थगनादेश प्राप्त झाल्याने सदरची निवडणुक रद्द करण्यात आली. जिल्ह्यात ग्रामपंचायतींमध्ये सरपंच, उपसरपंच पदाच्या रिक्त जागांवर जिल्हाधिकारी यांच्या आदेशावरून निवडणुका घेतल्या जात आहेत. अशातच वरूड तालुक्यातील पुसला उपसरपंच, अमरावती तालुक्यातील वलगाव उपसरपंच, अंजनगाव सुर्जी तालुक्यातील टाकरखेडा मोरे उपसरपं, अचलपूर तालुक्यातील वासणी ब्रु.उपसरपंच तसेच अमरावती तालुक्यातील माहूली जहागिर सरपंच पदाकरिता मंगळवारी निवडणुक घेण्याबाबतचे आदेश देण्यात आले होते. यातील माहूली जहागिर येथील निवडणुक रद्द करण्यात आल्याने चार ग्रामपंचायतींमध्ये उपसरपंच पदाकरिता सकाळी ११ वाजतापासून निवडणुक प्रक्रिया सुरू करण्यात आली. पुसला वगळता अन्य तीन ग्रामपंचायतींमध्ये एकमेव अर्ज दाखल झाल्याने येथील निवडणुक अविरोध झाली. पुसला येथे सिमा संदीप काळे ह्या निवडून आल्या आहेत. वलगाव उपसरपंच पदी दशरथ गोविंद मानकर, टाकरखेडा मोरे उपसरपंच ज्योती प्रविण सोनटक्के व वासणी उपसरपंचपदी अश्विनी अंकूश मेहरे अविरोध झाल्या आहेत. निवडीनंतर गावात जल्लोष साजरा करण्यात आला.

## नवनीत राणा यांच्यामुळे शिक्षक भरती टीएआयटी विध्यार्थ्यांचा मार्ग मोकळा



**अमरावती :** अमरावतीच्या माजी खासदार नवनीतताई रवी राणा यांनी राज्यातील लाखो बीएड, डीएड. विद्यार्थ्यांना शासनाचे शालेय शिक्षण मंत्री व शिक्षण परिषद आयुक्त ओक व प्रधान सचिव देओल यांच्या सोबत संपर्क साधून त्यांना हा विद्यार्थ्यांचे टर्निंग पॉईंट असलेला बीएड, डी एड विध्यार्थी यांचे बाबत विषय शासनस्तरावर पटवून देऊन शासनाचे कडून शासन निर्णय काढून घेतला ज्या मुळे हजारो विद्यार्थ्यांना शिक्षक बनन्याचे स्वप्नं साकार होणार आहे.याबाबत नवनीत रवी राणा यांचे घरी आलेल्या सर्व विद्यार्थ्यांनि नवनीत रवी राणा यांनी शासन स्तरावरून पाठपुरावा करून समस्या सोडविणेबाबत केलेल्या प्रयत्न त्यांना आलेले यश याबाबत शासनाने सुधारित शासन निर्णय निर्गमित केला असून ज्या निर्णयामुळे लाखो विद्यार्थ्यांना त्याचा फायदा होणार आहे.याबाबत नवनीत रवी राणा यांचे उपस्थित स विध्यार्थी पुरुष, महिला सर्वांनी विशेष आभार मानले आहे व अभिनंदन केले आहे.

## आंबा-मिलेट महोत्सवातून ग्राहक, उत्पादकांना लाभ होणार : जिल्हाधिकारी



अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अमरावती, दि. ९ :** कृषी पणन मंडळातर्फे आंबा व मिलेटस् हा चांगला महोत्सव राबविण्यात येत आहे. यामुळे उत्पादकांना ग्राहक मिळण्यासोबतच ग्राहकांनाही उत्कृष्ट उत्पादन मिळणार आहे. त्यामुळे नागरिकांनी या महोत्सवाला भेट द्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी केले.

महोत्सवाचे उद्घाटन प्रथम येणाऱ्या ग्राहकाच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी सौरभ कटियार उपस्थित होते. यावेळी सहकारी संस्था सहनिबंधक चैतन्य नसाणे, जिल्हा उपनिबंधक श्री. कुंभार उपस्थित होते.जिल्हाधिकारी श्री. कटियार म्हणाले, कृषी पणन मंडळाचा उपक्रम स्तुत्य असून यामध्ये मध्यस्तांची संख्या कमी होऊन शेतकरी आणि प्रक्रियादार हे ग्राहकांच्या जवळ येतील. यामुळे ग्राहकांना आवश्यक असणाऱ्या उत्पादनाची जाणीव शेतकऱ्यांना होईल. आंबा महोत्सवामुळे हापूस, केशर आणि गावरान आंब्याला चांगली बाजारपेठ उपलब्ध होण्यासोबतच ग्राहकांनाही चांगल्या दर्जाचा आंबा उपलब्ध झाला आहे. मिलेटस आणि त्यापासून बनवलेल्या पदार्थांना बाजारपेठ उपलब्ध होतील. महोत्सवातून ग्राहक आणि शेतकऱ्यांना लाभ होणार असल्याने महोत्सवाला सहपरिवार उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी यांनी केले.शेतकरी आणि शेतकरी उत्पादक कंपनी प्रक्रियादार यांना मिलेट आणि हापूस, केशर, गावरान आंबा या फळांना बाजारपेठ उपलब्ध व्हावी, यासाठी राज्य कृषी पणन मंडळातर्फे आंबा मिलेटस महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. दि. १२ मेपर्यंत हा महोत्सव जाधव पॅलेस येथे सुरू राहणार आहे. यात ४५ उत्पादक आणि कंपन्यांनी सहभाग घेतला आहे.पणन मंडळाचे उपसरव्यवस्थापक दिनेश डागा यांनी वीस वर्षापासून विविध महोत्सव आयोजित करून शेतकऱ्यांच्या मालाला बाजारपेठ उपलब्ध करून देण्यात येत आहे. तसेच केंद्र शासनाच्या मिलेट धोरणानुसार ज्वारी, बाजरी, भगर, नाचणी आदी मिलेटसला बाजारपेठ उपलब्ध व्हाव्यात यासाठी महोत्सव घेण्यात येते. असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# संगोपनाचा ७१७९ बालकांना लाभ

## सावित्रीवाई फुले बालसंगोपन योजना, १ हजार ८६ लाभार्थी प्रतीक्षेत

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अमरावती, दि. ९ :** क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजना ही ० ते १८ वयोगटातील अनाथ, निराश्रित, बेघर आणि इतर प्रकारे अडचणीत असलेल्या बालकांना मदत करण्यासाठी आहे. या योजनेअंतर्गत, अशा बालकांना संस्थाबाह्य आणि कौटुंबिक वातावरणात संगोपन आणि संरक्षण पुरविले जाते. अमरावती जिल्ह्यात आतापर्यंत ८ हजार २६५ जणांचे अर्ज महिला व बालकल्याण विभागाला प्राप्त झाले असून; यापैकी पात्र ठरलेल्या ७ हजार १७९ लाभार्थ्यांना लाभ देण्यात आलेला आहे, तर अजुनही १ हजार ८६ लाभार्थी अनुदानाच्या प्रतीक्षेत आहेत.

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बाल संगोपन ही २००५ मध्ये केंद्र शासन व राज्य शासन अंतर्गत सुरु करण्यात आलेली एक महत्त्वपूर्ण योजना आहे. परंतु, ही योजना केंद्र शासनाच्या अंतर्गत जरी चालवली जात असली, तरी संपूर्ण योजना पूर्णपणे महाराष्ट्राज्याच्या निधीतून राबवली जाते. फक्त महाराष्ट्रातील लाभार्थीच या योजनेचा लाभ घेऊ शकतात. ही योजना महिला व बालविकास विभागाच्यावतीने राबविली जात आहे. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बाल संगोपन योजनेअंतर्गत प्रत्येक महिन्याला लाभार्थी बालकाला रुपये २२५० आर्थिक मदत केली जाते व ही मदत थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा होते. या सावित्रीबाई फुले बाल संगोपन योजनेतर्गत या पात्र मुलांना २२५० रुपये दर महिन्याला मिळतात, असे एका वर्षाला २७००० रुपये मिळतात. हे पैसे वय १८ पूर्ण होईपर्यंत, दर महिन्याला मिळत जातात. सद्यास ऑनलाइन पद्धतीने हे पैसे जमा केले जात असल्यामुळे संबंधित लाभार्थ्यांना आपले बँक खाते आधार कार्डसोबत सिडींग करून घ्यावे लागत आहेत. त्यामुळे या विविध टप्प्यातील प्रक्रियेचा फटका लाभार्थ्यांना बसत असल्याचे दिसून येत आहे. अर्ज केल्यानंतर बालकल्याण समितीसमोर मुलांना समक्ष नेऊन पडताळणी करावी लागते. अर्जदारांची गृह चौकशी होते. विविध टप्प्यातील प्रक्रियेत प्रचंड विलंब होतो,असा अनुभव काही पालकांनी व्यक्त केला आहे. त्यामुळे विविध अडी अडचणी व समस्या सोडविण्यासाठी लाभार्थी महिला व बाल कल्याण विभागाकडे येऊन चौकशी करीत असल्याचे दिसून येत आहे. बँक खाते आधार कार्डसोबत सिडींग करणे आवश्यक बालसंगोपन योजनेचा लाभ मिळविण्याकरिता आपल्या मुलांचे बँक खाते उघडणे अनिवार्य आहे. महिला व बालविकास विभाग आयुक्तालयामार्फत डीबीटीद्वारे बालसंगोपन योजनेचा लाभ देण्यात येत आहे. त्यामुळे लाभार्थी मुला-मुलींचे बँक खाते उघडणे आवश्यक आहे. ज्या मुला-मुलींचे वय १० वर्षांवरील आहे, त्यांचे बँक खाते त्यांच्याच नावाने उघडून घ्यावे लागणार आहे. ज्या मुला-मुलींचे वय १० वर्षांखालील आहे. अशा लाभार्थी मुला-मुलींचे पालकांसोबत जॉईन खाते उघडावे लागणार आहे. संबंधित सर्व मुलांचे बँक खाते बँकेशी संपर्क साधून आधार कार्डसोबत सिडींग करून घ्यावे. सदरची कार्यवाही न केल्यास पात्र लाभार्थ्यांना लाभाची रक्कम मिळणार नाही, याची नोंद घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

या योजनेत अर्ज करण्यासाठी, संबंधित जिल्ह्याच्या महिला आणि बाल विकास विभाग कार्यालयात संपर्क साधावा. अर्जदाराला आवश्यक कागदपत्रे आणि माहिती सादर करावी लागते.

### असा आहे योजनेचा उद्देश

अनाथ, निराधार आणि असुरक्षित मुलांना सुरक्षित आणि योग्य देखभाल प्रदान करणे. मुलांच्या शारीरिक, मानसिक आणि सामाजिक विकासासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे. मुलांना योग्य शिक्षण आणि कौशल्ये विकसित करण्यासाठी मदत करणे. मुलांना कुटुंब आणि समाजात करण्यासाठी मदत करणे.

"प्रत्येक लाभार्थ्यांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजनेत अमरावती जिल्हा राज्यातून दुसऱ्या क्रमांकावर आहे. अमरावतीत अत्यंत चांगल्या पद्धतीने ही योजना राबविली जात आहे. त्यामुळे यंदा आपला जिल्हा पहिला क्रमांकावर येण्याची शक्यता आहे. लाभार्थ्यांना दर महिन्याला २२५० रुपयांचा लाभ दिला जात आहे. अमरावती जिल्ह्यातील प्रत्येक लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवून, त्यांना लाभ देण्यासाठी प्रयत्न केले जाते आहे.

**डॉ. उमेश टेकाळे,** जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी

# अमरावती खरेदी विक्री संघ काळ्या यादीत

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अमरावती, दि. ९ :** अमरावती सहकारी शेतकी खरेदी विक्री संघाने सोयाबिन खरेदी दरम्यान अनियमितता केल्याचा ठपका ठेवत या संस्थेला कायमस्वरूपी काळ्या काळ्या यादीत टाकण्यात आले आहे.त्यामुळे आगामी हंगामातील कोणतीही शासकीय खरेदी करण्यास निर्बंध घालण्यात आले आहे. दी विदर्भ को ऑप.मार्केटिंग फ`डरेशन लि. ने सदरची कारवाई केली आहे. अमरावती तालुक्यात २०२४-२५ या वर्षात नाफेडव्दारे सोयाबिन खरेदी प्रक्रिया अमरावती खरेदी विक्री संघातर्फे राबविण्यात आली होती. ही संपुर्ण प्रक्रिया ऑनलाईन असताना या संस्थेकडून ऑफलाईन प्रक्रिया राबविल्याने यामध्ये अनियमितता केल्याचा ठपका होता. याची दखल घेत अशा संस्थांना काळ्या यादीत टाकण्याची शिफारस शासनाच्या सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या वतीने दी विदर्भ को ऑप.मार्केटिंग फ`डरेशन लि.नागपूरला केली होती. फेडरेशनकडून जामोद, मलकापुर, पिंपळी गवळीसह अमरावती खरेदी विक्री संघाला काळ्या यादीत टाकण्यात आल्याचा आदेश काढला. परंतु या दरम्यान या संस्थेने १२८९ शेतकऱ्यांची ऑनलाईन तुर खरेदीची नोंदणी केली आहे. यातील १२५० शेतकऱ्यांना त्यांनी खरेदी करिता कॉल दिले आहे. त्यामुळे या संस्थेकडून तुर खरेदीची प्रक्रिया पुर्ण करुन पुढील सर्व हंगामाकरिता अमरावती खरेदी विक्री संस्थेला कोणतीही तसेच हंगाम २०२४-२५ मधील तुर, हरभरा खरेदी प्रक्रियेकरिता या केद्राची सबएजंट म्हणून केलेली नियुक्ती देखील या आदेशान्वे रद्द करण्यात आली आहे. सदरचे आदेश दी विदर्भ को ऑप.मार्केटिंग फेडरेशन लि.चे कार्यकारी संचालक एस.हरीबाबु यांनी काढले.

# युवतीचे फोटो व्हायरल करण्याची धमकी

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अमरावती, दि. ९ :** राजापेठ पोलिस ठाण्यांतर्गत येत असलेल्या फिर्यादी युवती सोबत गेल्या तीन वर्षापासून प्रेमसंबंध होते. दोघेही एकमेकांना भेटून फोटो काढत होते. युवती व युवकासोबत काही दिवसापूर्वी वाद झाल्याने युवतीने बोलने बंद केले होते. त्यामुळे युवक हा तिला फोटो व्हायरल करण्याची धमकी देत होता. युवतीच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला. आरोपी संकेत सुनील काळबांडे, १९ रा. शेनगाव जि. हिंगोली याचे गेल्या तीन वर्षापासून प्रेमबंध होते. काही महिन्यापासून युवती व त्याच्या वाद झाला.

त्यामुळे युवतीने त्याचे सोबत संबंध तोडले. त्यानंतर आरोपी तीचा पाठलाग करीत होता. युवतीच्या मैत्रिणीला भेटून तिला माझ्या सोबत बोलायला सांग नाही तर फोटो व्हायरल करेल सदर घटनेची तक्रार राजापेठ पोलिस ठाम्यात दिली.

# पंचायत राज अभियानात जि.प.ला राज्यात दुसरा क्रमाक

## विभागात धारणी व्दितीय तर अचलपुरला तिसरा पुरस्कार

अजिंक्य भारत । प्रतिनिधी




**अमरावती, दि. ९ :** ग्राम विकास विभागाकडून राबविण्यात आलेल्या यशवंत पंचायत राज अभियानातील पुरस्काराची मंगळवारी घोषणा कण्यात आली. अमरावती जिल्हा परिषदेने यामध्ये राज्यातून दुसऱ्या क्रमांक पटकाविला आहे. तर विभागात धारणी पंचायत समितीला व्दितीय तर अचलपुर पंचायत समितीला तिसरा पुरस्कार मिळाला आहे.

राज्यातील अत्युत्कृष्ट जिल्हा परिषद व पंचायत समित्या यांना महसूली विभागस्तरीय व राज्यस्तरीय पुरस्काराकरिता नामांकन करण्यात आले होते. याअंतर्गत जिल्हा परिषद व पंचायत समित्यांची समितीकडून तपासणी करण्यात आली. याचा निकाल मंगळवारी ग्राम विकास विभागाने जाहिर केला. राज्यात पंचायत राज संस्थांचे व्यवस्थापन व विकास कार्यात अत्युत्कृष्ट काम करणाऱ्या जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व ग्रामपंचायतींसाठी सन २००५-२००६ या आर्थिक वर्षापासून विभागस्तर व राज्यस्तरावर ''यशवंत पंचायत राज अभियान'' ही पुरस्कार योजना सुरु करण्यात आलेली आहे. पंचायत राज प्रशासन व विकास कार्यात उत्कृष्ट काम करणाऱ्या जिल्हा परिषदा व पंचायत समित्या यांनी सन २०२२-२३ या आर्थिक वर्षामध्ये केलेल्या कामाचे मूल्यमापन विचारात घेऊन महसूली विभागस्तर व राज्यस्तर अशा दोन स्तरावर यशवंतराव चव्हाण पंचायत राज अभियान अभियानांतर्गत राज्यातील अत्युत्कृष्ट तीन जिल्हा परिषदा व तीन पंचायत समित्यांची पुरस्कारासाठी राज्यस्तरावर निवड करण्यात आली. राज्यस्तरीय पुरस्कारामध्ये राज्यात सीईओ संजिता महापात्र यांच्या मागदर्शनात अमरावती जिल्हा परिषदेने दुसरा क्रमांक पटकाविला आहे. राज्यात पंचायत समित्यांना यश आले नसले तरी विभागात मात्र दोन पंचायत समित्यांनी पुरस्कार पटकाविला आहे. यामध्ये धारणी व्दितीय व अचलपुर पंचायत समितीला तिसरा क्रमांक मिळाला आहे. त्यामुळे सीईओ संजिता महापात्र यांनी अधिकारी व पंचायत समित्यांच्या अधिकाऱ्यांचे कौतुक केले आहे.

# उड्डाणपुलासाठी दिला १५ दिवसांचा अल्टीमेटम

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अमरावती, दि. ९ :** २०१७-१८ या आर्थिक वर्षात चित्रा चौक-इतवारा उड्डाण पुलाचे बांधकाम सुरू करण्यात आले होते. दोन वर्षांत हा उड्डाण पूल पुर्ण होईल. असे संबधित करारनाम्यात नमुद होते. परंतु, सहा वर्ष होऊनही अजुनही पुलाचे बांधकाम पुर्ण झाले नाहीत. ठेकेदार आणि प्रशासन निधी नसल्याचे कारण पुढे करत आपली जबाबदारी झटकत आहे. त्यामुळे संतप्त नागरिकांनी डॉ अलीम पटेल यांच्या नेतृत्वात जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले. तसेच १५ दिवसांच्या आत काम सुरू न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा यावेळी निवेदनातून देण्यात आला आहे.

निवेदनात म्हटले आहे की, निधी उपलब्ध करून काम पुर्ण करणे ही शासन प्रशासनाची जबाबदारी आहे. बांधकाम विभागाकडून या पुलाचे बांधकाम कसे लवकर पुर्ण होईल याकडे दुर्लक्ष केले गेले आहे. या संदर्भात जानेवारी २०२५ रोजी पत्र देण्यात आले होते. तसेच पालकमंत्री चंद्रकांत बावनकुळे यांना प्रत्यक्ष भेटून या विषयावर २८मार्च रोजी पत्र दिले होते. सर्वसामान्य व्यक्ती शासनाला कर देतो, त्यामुळे वेळेवर काम पूर्ण करण्याची शासन प्रशासनाची जबाबदारी आहे. त्यामुळे १५ दिवसात तत्काळ निर्णय घ्यावा. अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे.यावेळी माजी लेफ्टनंट कमांडर डॉ अलिम पटेल, किरण गुडधे, काझी अन्जार, हाफीज अहफाज खान, फरीद खान, इस्माईल राराणी आदी उपस्थित होते.

# ३१ वर्षांपासून सावित्रींच्या लेकींची शासनाकडून एक रुपयावर बोळवण!

## जिल्हा परिषदची सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजना बंद

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अमरावती दि. ९ :** अनुसूचित जाती-जमाती व भटक्या-विमुक्त समाजातील पहिली ते चौथीपर्यंत शिकणाऱ्या मुलींसाठी सन १९९२ पासून शासनाकडून प्रोत्साहन उपस्थिती भत्ता देण्यात येतो. मात्र, तब्बल ३१ वर्षानंतरही या योजनेंतर्गत विद्यार्थिनींना दररोज फक्त १ रुपयाच भत्ता मिळतो आहे. महागाईने सर्वच क्षेत्रांमध्ये उच्चांक गाठलेला असताना या भत्त्यात एक पैशाचीही वाढ झालेली नाही.

या योजनेचा उद्देश मुलींच्या शालेय उपस्थितीत वाढ करणे आणि त्यांना शाळेकडे आकर्षित करणे हा आहे. मात्र, महागाईच्या तुलनेत हा भत्ता सध्याच्या काळात अत्यंत अपुरा आणि नाममात्र असल्याचे चित्र आहे. जिल्हा परिषदेच्या शाळांमधील विद्यार्थिनींसाठी दिला जाणारा हा भत्ता दारिद्र्यरेषेखालील तसेच आदिवासी क्षेत्राबाहेरील अनुसूचित जाती-जमाती व भटक्या समाजातील मुलींना लागू होतो.

२०२१ मध्ये मंत्रिमंडळाने या भत्त्यात वाढ करून तो पाच रुपये करण्याची शिफारस केली होती. मात्र, चार वर्षांचा कालावधी उलटूनही शासनाकडून कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही. शिक्षण विभाग किंवा लोकप्रतिनिधीयांच्याकडूनही या विषयाकडे गांभीर्याने पाहिले जात नसल्याचे दिसून येते. या भत्त्यात तातडीने वाढ करून विद्यार्थिनींना खऱ्या अर्थाने प्रोत्साहन देण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे. शासनाने सावित्रीच्या लेकींची ही थट्टा थांबवावी, अशी संतप्त प्रतिक्रिया पालकांतून व्यक्त होत आहे.



### योजना ठरत आहे औपचारिक

या योजनेला क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे नाव देण्यात आले असून, त्यांनी मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली होती. त्यांच्याच नावाने सुरू झालेल्या या योजनेच्या माध्यमातून विद्यार्थिनींना केवळ एक रुपया देण्यात येत असल्याने ही योजना केवळ औपचारिक ठरते आहे, अशी टीका पालक आणि शिक्षण क्षेत्रातून व्यक्त होत आहे.

मुलींच्या शिक्षणासाठी दिला जाणारा एक रुपयाचा भत्ता म्हणजे केवळ तोंडाला पाने पुसण्याचा प्रकार असल्याचे पालकांचे म्हणणे आहे. विशेष म्हणजे हा एक रुपयादेखील अनेकदा वेळेवर मिळत नसल्याच्या तक्रारी आहेत.

अमरावती जिल्हातील शिक्षक, पालक,

शिक्षणप्रेमीनी अनाथ,गरजू मुलिंन करीता दरवर्षाला ५००/-या प्रमाणे शाळेतील एका मुलिला देण्या करीता स्वतः निधि जमा केला होता.ही रक्कम लाखोच्या घरात गेली.हा निधी महाराष्ट्र बँक व शिक्षक सहकारी बँकेत मुदत ठेवी स्वरुपात जमा आहे.यावर ३१मार्चला मिळणाऱ्या व्याजाच्या रक्कमेवर मुलिंना आर्थिक मदत केली जात होती.यावर नियंत्रण करण्या करीता एक समिती सुध्दा होती. पण गेल्या कीत्येक वर्षा पासुन मुलींना या निधीचा लाभ मिळत नाही. प्राथमिक शिक्षक समितीने वारंवार शिक्षण विभागाला या बाबत विचारणा केली आहे. याची माहीती जिल्हास्तरावरील कार्यरत शिक्षण विस्तार अधिकारी यांना माहीत आहे.आणि त्यांच्या कडेच या रक्कमेचा हिशोब आहे.दरवर्षाला या ठेवी पावत्या रीनिव्हर कराव्या लागतात. यावर मिळणारे व्याज त्यात जमा करतात पण हा निधी अनाथ, गरजू मुलींना देत नाही. शिक्षक समितीने वारंवार मागणी केली की प्रत्येक जि.प.शाळेतील प्रत्येकी दोन मुलिंना १ हजार रुपये मदत देण्यात यावी आणि रक्कम थेट लाभार्थी मुलिंच्या खात्यावर पाठविण्यात यावा अशी मागणी प्राथमिक शिक्षक समितीने केली आहे. अशी माहिती सरीता काठोळे, जिल्हाध्यक्ष, महीला आघाडी, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती जिल्हा शाखा अमरावती यांनी दिली.



"जि. प. शाळांमधील मुलींची उपस्थिती वाढावी, यासाठी शासन दररोज एक रुपयाप्रमाणे भत्ता देते. परंतु, ३१ वर्षामध्ये सोन्याचे भाव दोन हजार रुपये प्रति तोळ्यावरून एक लाखांवर गेले, तरी मुलींना मात्र १ रुपयाच मिळत आहे. शिक्षक समिती या भत्त्यामध्ये वाढ करण्याची मागणी करत आहे.

**राजेश सावरकर,**
राज्य प्रसिध्दी प्रमुख, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती

अजिंक्य भारत

# अमरावती जिल्हा

शनिवार, दि. १० मे २०२५



## थोडक्यात

### शिवसेनेच्या नेतृत्वात शेतकऱ्यांची जिल्हा कृषी कार्यालयावर धडक



**नांदगाव खंडेश्वर :** राज्य सरकारने एक रुपयात पीकविमा योजना बंद केल्याने व पीकविमा योजनेतील नैसर्गिक आप्पतीची अट रद्द केल्याने नव्याने पिक कापणी प्रयोगाची अट लादल्याने शिवसेनेचे प्रकाश मारोटकर यांच्या नेतृत्वात शतकऱ्यांनी जिल्हा कृषी अधिक्षक यांचे कार्यालयात धडक देऊन राज्याचे कृषी मंत्री माणिक कोकाटे यांच्या फोटोला चप्पलांचा हार घालून प्रचंड घोषणाबाजी करून एक रुपयात पीकविमा योजना सुरु ठेवावी अशी मागणी केली एक रुपयांत पिक विम्याचि गेल्या २ वर्षांपासून सुरु असलेली योजना आता गुंडाळण्यात आली आहे. तसेच पीकविम्या पोटी संरक्षित पीकविमा रक्कम शेतकऱ्यांना भरावी लागणार आहे. तसेच नैसर्गिक आप्पत्तीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या पिकांचे पंचनामे होऊन नुकसान भरपाई मिळत असे तसेच पिक पेरणी ते कापणी पिकाला विम्याचे संरक्षण मिळायचे मात्र यात राज्य सरकारने बदल करून पिक कापणी प्रयोगावर विमा संरक्षण मिळेल असा निर्णय घेतला आहे. शेतकऱ्यांत प्रचंड रोष निर्माण झाला असून शिवसेनेसह शेतकऱ्यांनी जिल्हा कृषी अधिक्षक कार्यालयावर धडक देऊन पूर्वीची एक रुपयांत पिक विमा योजना सुरु ठेवावी अन्यथा तीव्र आंदोलन छेडू असा इशारा दिला यावेळी शिवसेनेचे विधानसभा समन्वयक प्रकाश मारोटकर निलेश इखार वासुदेव लोखंडे लीलाधर चौधरी रवी ठाकूर प्रफुल ठाकरे गोपाल बनकर गुणवंत चांदुरकर शुभम वीरूळकर गजानन गावंडे निलेश मारोटकर भूमेश्वर गोरे गजानन तायडे आदित्य देशमुख यांचेसह शिवसैनिक व शेतकरी उपस्थित होते.

### जात निहाय जनगणना निर्णयाचे स्वागत

**अंजनगाव सुर्जी :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने जातीय जनगणना करण्याचा ऐतिहासिक व दूरदृष्टीपूर्ण निर्णय घेतला आहे.हा निर्णय समाजातील प्रत्येक घटकाला न्याय देणारा,समावेशक विकासाला चालना देणारा आणि सामाजिक समतोल प्रस्थापित करणारा ठरेल, याच उद्देशाने या ऐतिहासक निर्णयाचे आज ४ मे भारतीय जनता पार्टी अंजनगाव सुर्जी शहर व ग्रामीण मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी आठवडी बाजार चौकात जल्लोषात स्वागत केले.दरम्यान फटाक्यांची आतिषबाजी व नारेबाजी करुन हा ऐतिहासिक निर्णय मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात पदाधिकाऱ्यांकडून साजरा करण्यात आला.ही ऐतिहासिक घोषणा म्हणजे सबका साथ,सबका विकास,सबका विश्वास आणि सबका प्रयास या प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टीपूर्ण संकल्पनेची साक्ष आहे.या निर्णायक पावलासाठी भारतीय जनता पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी मोदी सरकारचे आभार व्यक्त केले.याप्रसंगी माजी नगराध्यक्ष अँड.कमलकांत लाडोळे, भाजपा महामंत्री डॉ.विलासराव कविटकर,शहर मंडल अध्यक्ष मनिष मेन,ग्रामीण मंडल अध्यक्ष सुधीर गोळे, कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती अँड.जयंत साबळे,मनोहर मुरकुटे,सचिन जायदे,महीला शहर अध्यक्ष सौ.हेमलताताई लेंधे, तालुकाध्यक्ष सौ.निताताई बोचरे, सौ.विद्याताई घडेकर,वर्षाताई बारब्दे, गजानन लेंधे,प्रविण पटुकले,विक्रम पाठक,सतीश मठ्ठे,आशिष टिपरे, मिलिंद गोतमारे, विजय धुमाळे,प्रमोद खंडेराय,रतन भाष्कर, गौरव चांदुरकर,हर्षल पायघन,यांच्यासह भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### रामकृष्ण चिखलकर यांना गुणवंत कामगार पुरस्कार



**अमरावती :** महाराष्ट्र दिनी १ मे ला महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी महावितरण अमरावती परिमंडळातर्फे गुणवंत कामगार पुरस्कार वितरण सोहळा प्रादेशिक प्रशिक्षण केंद्र मोर्शी रोड, अमरावती येथे पार पडला. या सोहळ्यात विद्युत भवन अमरावती येथील यंत्रचालक तथा महाराष्ट्र कामगार सेना पतसंस्थेचे अध्यक्ष रामकृष्ण विठ्ठलराव चिखलकर यांना गुणवंत कामगार पुरस्काराने मुख्य अभियंता ज्ञानेश कुलकर्णी यांच्या हस्ते सन्माननित करण्यात आले. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीमध्ये विज उपकेंद्राचे उत्कृष्ठ संचालन व सुव्यवस्थापन करुन कार्यतत्परता, निष्ठा राखणा-या उत्कृष्ठ यंत्रचालक म्हणून गुणवंत कामगार पुरस्कारासाठी रामकृष्ण चिखलकर यांची निवड झाली. त्यांना महाराष्ट्र दिनी उपस्थीतीत मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र, स्मृतीचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन गुणवंत कामगार पुरस्काराने सन्माननित करण्यात आले. या पुरस्कार वितरण सोहळयाला मुख्य अभियंता ज्ञानेश कुलकर्णी , अमरावती परिमंडळ रुपेश देशमुख, सहाय्यक महाव्यवस्थापक(मास)अमरावती परिमंडळ प्रदिप पुनसे, कार्यकारी अभियंता मधुसूदन मराठे, उपमुख्य औद्योगिक अधिकारी प्रशांत लहाने, उपविधी अधिकारी फुलसिंग राठोड, कार्यकारी अभियंता अमरावती परिमंडळ राजेश माहुलकर, कार्यकारी अभियंता अनिरुद्ध आलेगावकर, कार्यकारी अभियंता अमरावती शहर विभाग संजय सराटे व अमरावती परिमंडळाचे अधिकारी उपस्थित होते. रामकृष्ण चिखलकर यांना पुरस्कार प्रदान झाल्याबद्दल सर्वच स्तरातून त्यांचे स्वागत होत आहे.

# अतिक्रमण धारकांवर चालला बुलडोझर

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**मोर्शी, दि. ९ :** मोर्शी नगरपरिषद क्षेत्रात मुख्य रस्त्यालगत दोन्ही बाजूला मोठ्या प्रमाणात करण्यात आलेले अतिक्रमण आज दि.५ मे रोजी काढण्यात आल्यामुळे अतिक्रमण धारकांमध्ये तीव्र नाराजीचा सूर ऐकिवात येत आहे. आज सकाळी ७ वाजतापासून मुख्याधिकारी पराग वानखडे यांच्या नेतृत्वात नगरपरिषदतर्फे अतिक्रमण हटाव मोहीम राबविण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली होती.सर्वप्रथम मोर्शी ते सिंभोरा रोडवर अतिक्रमण करून थाटण्यात आलेली भाजीपाला दुकानासह इतरही दुकाने हटविण्यात आली. दरम्यान एसटी डेपो व महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळाच्या मध्यभागातून अप्पर वर्धा वसाहत इतरही कॉलनी परिसराकडे जाणाऱ्या मार्गावरील हॉटेल्स,पानटपरी यासह इतरही अतिक्रमण धारकांनी केलेले अतिक्रमण काढण्यात आले.पंचायत समिती ते पेठपुरा मार्गावरील थाटण्यात आलेली दुकाने तसेच स्थानिक जयस्तंभ चौक येथील नगरपरिषदेच्या गांधी मार्केटच्या दुकानासमोरील भाजीपाला,फळ फळांची दुकाने तसेच मेन जयस्तंभ चौक येथील मुख्य व्यापारी बाजारपेठ समोर अतिक्रमण करून थाटण्यात आलेली फळ फळांच्या दुकानासह इतरही अतिक्रमण काढण्यात आले. रोडच्या दोन्ही बाजूला तसेच वर्दळीच्या चौकात खूप मोठ्या प्रमाणात वाढलेल्या अतिक्रमणांमुळे रहदारीस अडथळा निर्माण होऊन सतत अपघाताच्या घटना घडत असल्याने तसेच टू व्हीलर,फोर व्हीलर वाहने दुकानासमोर उभी राहत असल्यामुळे वाहतुकीची मोठ्या प्रमाणात कोंडी निर्माण होत असलेल्या तक्रारी नगरपरिषदेला वारंवार प्राप्त होत असल्याचे गांभीर्य लक्षात घेऊन तसेच कुठलाही अनुचित घटना घडू नये याकरिता नगर परिषद प्रशासनाच्या वतीने टोकाचे पाऊल उचलून शहरातील अतिक्रमण हटविण्याची मोहीम हातात घेण्यात आली आहे. तरी शहरातील उर्वरित अतिक्रमण धारकांनी स्वयंस्फूर्तीने आपले अतिक्रमण काढून होणारे नुकसान टाकावे व नगर परिषदेस सहकार्य करावे.असे आवाहन नगर परिषदेचे मुख्याधिकारी पराग वानखडे यांनी केले आहे.अतिक्रमण काढतांना कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी ठाणेदार नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक तुषार चव्हाण,अरुण लांडे, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक पंकज साबळे,गोपनीय विभागाचे योगेश सांभारे,विजय वागतकर,सुनील गावडे व महिला पोलीस कर्मचारी मुख्याधिकारी पराग वानखडे यांच्यासह नगर परिषदेचे अधिकारी कर्मचारी महिला कर्मचारी उपस्थित होते.

# क्रीडा प्रशिक्षण शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अमरावती, दि. ९ :** जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातर्फे आयोजित ग्रीष्मकालीन क्रीडा प्रशिक्षण शिबिराला खेळाडूंचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. जिल्ह्यात विविध ठिकाणी सुरू झालेल्या या शिबिरांमध्ये खेळाडूंच्या सुप्त गुणांना वाव देण्यासोबतच क्रीडा कौशल्ये विकसित करणे, शारीरिक तंदुरुस्ती राखणे आणि खेळाची आवड निर्माण करणे यावर लक्ष केंद्रित केले जात आहे. जिल्हा क्रीडा संकुलात धनुर्विद्या, सॉफ्टबॉल, बॅडमिंटन, व्हॉलीबॉल, स्क्वॅश, टेबल टेनिससह विविध खेळांचे प्रशिक्षण सकाळ आणि संध्याकाळच्या दोन सत्रांमध्ये खेळाडू घेत आहेत. प्रशिक्षणादरम्यान खेळासोबतच व्यक्तिमत्व विकास, योग्य आहार, दुखापतींवरील उपचार, फिजिओथेरपी आणि क्रीडा मानसशास्त्र तज्ज्ञांचे मार्गदर्शन दिले जात आहे. जिल्हा क्रीडा संकुलामध्ये धनुर्विद्या खेळासाठी प्रफुल डांगे, बॅडमिंटनसाठी. रितेश अनंतवार, व्हॉलीबॉलसाठी राहुल निवडुंगे, सॉफ्टबॉलसाठी स्वप्नील चांदेकर आणि स्क्वॅशसाठी गणेश तांदळे मार्गदर्शक आहेत. शिबिरामध्ये शिवाजी कुचे यांनी खेळाडूंना मेडिटेशनचे महत्त्व आणि स्पर्धेतील उपयुक्तता याबद्दल मार्गदर्शन केले.

तसेच, खेळाडू, पालक आणि प्रशिक्षकातील समन्वयाबाबत विचार व्यक्त केले. कविता शेंडे यांनी झुम्बा आणि एरोबिक्सचे प्रशिक्षण दिले. शिबिरात शहर आणि ग्रामीण भागातील खेळाडूंनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला आहे, असे जिल्हा क्रीडा अधिकारी गणेश जाधव यांनी कळविले आहे.

# १९९७ च्या आंदोलनातील शहीद शेतकरी स्मारकाचा लोकार्पण सोहळा

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



## शहीद झालेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबातील सदस्यांचा सत्कार

**चांदुर रेल्वे, दि. ९ :** कापूस पिकाला योग्य भाव मिळावा म्हणून १२ डिसेंबर १९९७ रोजी शेतकऱ्यांकडून संपूर्ण महाराष्ट्रात आंदोलन करण्यात आले होते, याच दिवशी चांदुर रेल्वे तालुक्यातील चांदुर रेल्वे पुलगाव रोडवरील राजना फाट्यावर बाबासाहेब गावंडे यांच्या नेतृत्वात चक्का जाम आंदोलन झाले होते, रोडवर जागोजागी बैल बंड्या सोडून संपूर्ण रस्ता जाम झाला होता, आंदोलनात सहभागी झालेल्या शेतकरी व जनता रस्त्यावरून उठायला तयार नव्हती,आंदोलनाचे उग्ररूप बघता दिनांक १३/१२/ १९९७ रोजी पोलिसाकडून आंदोलनात सहभागी झालेल्या शेतकऱ्यावर गोळीबार करण्यात आला होता, या गोळीबारात तालुक्यातील नेक नानपूर येथील प्रकाश काळे यांच्या डोक्याला गोळी लागून ते ठार झाले होते, तसेच निमगावंचे रामदास कडव, व खरबीचे शरद काळे हे गोळ्या लागून जखमी झाले होते,

तसेच १४/१२/१९९७ रोजी धामणगाव तालुक्यातील भातकुली गावाच्या चौफुलीवर काही शेतकऱ्यांकडून चक्काजाम आंदोलन करण्यात आले होते यावेळी सुद्धा तळेगाव दशा पोलिसांनी केलेल्या गोळीबारात धामणगाव तालुक्यातील हिरपूरचे शेतकरी प्रमोद जवळकर व रेणुकापूर येथील गणेश शिंदे हे सुद्धा शहीद झाले होते, तर अनेक शेतकरी यावेळी झालेल्या लाठी मारामुळे जखमी झाले होते, गोळीबारात शहीद झालेले शेतकरी प्रकाश काळे रा नेकनानपूर, प्रमोद जवळकर रा हिरपूर तसेच गणेश शिंदे रा, रेणुकापूर या शहिदांचे स्मृति म्हणून स्थानीय तालुक्यातील नेकनानपुर या गावात हुतात्मा स्मारक उभारण्यात आले आहे त्या हुतात्मा स्मारकाचा लोकार्पण सोहळा आज मंगळवारी सकाळी नऊ वाजता मान्यवरांचे उपस्थितीत संपन्न होणार आहे,

या कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून माजी आमदार सरोजताई काशीकर,यांच्या हस्ते होणार असून कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून ललित बहाडे अध्यक्ष शेतकरी संघटना महाराष्ट्र,अनिल धनवट राष्ट्रीय अध्यक्ष स्वा,भा,प, शैलजाताई देशपांडे मा,अध्यक्ष शे,म,प,मधुसूदन हरणे प्रांत अध्यक्ष स्वा,भा,प महाराष्ट्र, अंजलीताई पातुरकर मा,अध्यक्ष स्वा,भा,प, राजाभाऊ पुसदेकर अध्यक्ष बळीराज्य विदर्भ प्रदेश, माधवराव गावंडे जिल्हा परिषद अमरावती, दिलीप भोयर मा जि प शे सं, एड दिनेश शर्मा ज्येष्ठ नेते शेतकरी संघटना, प्रज्ञा ताई बापट अध्यक्ष शे सं,आ, हे गुणवंत हंगरगेकर मा अध्यक्ष शे, महाराष्ट्र, सतीश धनी मा अध्यक्ष शे यु आ, विजय नवल मायाताई पूसदेकर,श्रद्धाताई प्रमोद राऊत, यांच्या उपस्थितीत संपन्न होणार असल्याची माहिती सोमवार ०५ मे रोजी झालेल्या पत्रकार परिषद मध्ये देण्यात आली, यावेळी राजाभाऊ पुस्तेकर, शिवाजीराव चौधरी, दिनकर निस्ताने, सुधाकर फेटे, दिवाकर राऊत, सागर गावंडे,नितीन टाले, हे सदस्य प्रामुख्याने उपस्थित होते,

# नवनीत राणा यांनी जाणून घेतल्या आयटीआय विद्यार्थ्यांच्या समस्या

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**अमरावती, दि. ९ :** माजी खासदार भाजपा नेत्या नवनीत रवी राणा यांची मोठ्या संख्येने जमा होऊन एकत्रीत भेट घेऊन दि.२९/०४/२०२५ रोजी महावितरण कंपनी कडून, येत्या २० ते २२ मे २०२५ रोजी महावितरण विद्युत सहाय्यक साठी होणाऱ्या परीक्षा पॅटर्न मध्ये अचानक परीक्षेच्या अवघ्या २० दिवस आधी मोठा बदल करण्यात आला, ज्यामध्ये ज्या विषयाचा विद्यार्थ्यांनी मागील दोन वर्षापासून टेक्निकल (तांत्रिक) या विषयाचा जास्त अभ्यास केला आणि या विषयाचे गुण कमी करून नॉन टेक्निकल (अ-तांत्रिक) विषयाला जास्त गुण देऊन सर्व विद्यार्थ्यांवर अन्याय आहे. अशी समस्या सांगून यावर भाजपा नेत्या नवनीत राणा यांचे कडून न्याय मिळून देणेबाबत विनंती केली.

वरील प्रकारामुळे सर्व विद्यार्थ्यांना निराशा पसरलेली होती, त्ते सर्व विद्यार्थी यांनी १ मे २०२५ रोजी सर्व विद्यार्थी मिळून मोठ्या संख्येमध्ये नवनीत राणा यांचे घर गाठले. भाजपा नेत्या नवनीत राणा यांनी विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेऊन त्यांनी लगेचत्यांचा मुद्दा समजून घेतला व तात्काळ मंत्रालयातील ऊर्जा खात्यातील सचिव आभा शुक्ल मॅडम यांच्याशी संपर्क साधला, त्यांना सविस्तर हा विषय समजून, त्यांना रिक्वेस्ट केली की लवकरात लवकर आपल्या मागणी बद्दल विचार करावा, नवनीत राणा याचाच प्रभाव म्हणजे आधीचा सिलॅबस पॅटर्न आज परत रिव्हाईस करून दिला. नवनीत राणा यांनी विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेऊन तत्परता दाखवून शासन स्तरावरून न्याय मिळून देणेबाबत. संपूर्ण महाराष्ट्रातील आयटीआय इलेक्ट्रिशन आणि वायरमेनच्या विद्यार्थ्यांकडून नवनीत यांचे मनापासून खूप खूप आभार व्यक्त केले आहे. महापारेषण विद्युत सहाय्यक रिझल्ट साठी नवनीत राणा यांनी फोन केला होता, तर त्यांनी सुद्धा तीन-चार दिवसांमध्ये रिझल्ट लागेल असे सांगितलं नवनीत राणा यांनी विद्यार्थी हिताचा निर्णय घेतला आहे.

# जीवनोन्नती अभियान अंतर्गत वार्षिक सभा

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**लोणी टाकळी, दि. ९ :** महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान उमेद अंतर्गतबेलोरा हिरापूर नुकतीच २ री वार्षिक सर्वसाधारण सभा घेण्यात आली.त्यामध्ये नवीन पदाधिकारी निवड करण्यात आली सर्व कॅडर चे अहवाल वाचन करण्यात आले. गावातील सरपंच माधुरी चौधरी, सविता सवाई, सीआरपी अर्चना धवणे, सविता आठवले, करुणा धावणे ग्रामपंचायत सदस्य हजर होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून सविता बहादूरे यांनी महिलाना उद्देशून समूहातील एकजूट, दशसूत्रीचे महत्व वार्षिक सभासद फी चे महत्व, वार्षिक सर्वसाधारण सभेचे महत्व, आपल्या हाताला कसे काम मिळवता येईल व महिला सामाजिक आर्थिक व राजकीय विकास कसा घडवून आणू शकते याचे उदाहरण देऊन स्पष्ट केले, मगेश जामाणिक सर वेलकम इण्डस्ट्रीचे सहसंचालक यांनी महिलांच्या सुप्त गुणांचा कसा वापर करून आपण महिला कार्य क्षेत्रात मागे नाही याचे उदाहरण देऊन महिलाना साध्या सोप्या पद्धतीने मार्गदर्शन केले गावातील प्रथम नागरिक माधुरी चौधरी,प्रीती आठवले यांनी देखील महिलाना मार्गदर्शन केले. व कॅडर चे कौतुक केले.ग्रामसंघा तील नवीन पदाधिकारी यांना शुभेच्छा दिल्या, कार्यरत अध्यक्ष सारिका घुगरे यांनी महिलाना मार्गदर्शन केले, सचिव अर्चना सवाई यांनी देखील त्या कार्यरत असताना काय अडचणी आल्या व त्या कशा मात केल्या याची माहिती त्यांनी त्याच्या मनोगतातून भावना व्यक्त केल्या.

# पाककृती स्पर्धेत उत्तमसरा शाळेच्या संगिता कराळे यांना व्दितीय बक्षिस

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

## भातकुली तालुक्यातील १६ शाळांचा सहभाग



**भातकुली दि. ९ :** शिक्षण विभाग पंचायत समिती भातकुली अंतर्गत प्रधान मंत्री पोषण शक्ती निर्माण योजना अन्वये पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी दीपकजी कोकतरे साहेब तसेच नरेंद्रजी गायकवाड साहेब अधीक्षक शालेय पोषण आहार विभाग यांच्या मार्गदर्शनात तालुकास्तरीय पाककृती स्पर्धे चे आयोजन धामोरी विद्यालय धामोरी येथे करण्यात आले. होते या स्पर्धेचा निकाल घोषित झाला असुन गणोरी केंद्रातील जि.प.प्राथमिक शाळा उत्तमसराच्या संगिता कराळे यांचा व्दितीय क्रमांक आला.त्यांना १मे महाराष्ट्र दिना निमित्य उत्तमसरचे सरपंच धर्मेद्र मेहरे व शाळा व्यवस्थापण समितीचे अध्यक्ष रत्नदीप सवाई,उपाध्यक्षा प्रिया मानकर यांच्या हस्ते ३५००/-रुपयाचा धनादेश देण्यात आला. या तालुकास्तरीय पाककृती स्पर्धेत सुदृढ बालकाच्या पोषणाकरिता तृणधान्य आधारित आहाराचे महत्त्वाचे आहे.यावेळी संगिता कराळे यांनी विविध प्रकारचे पदार्थ तयार केले होते त्यामध्ये बाजरीची खिचडी, कुटकीचा भात,भगरचा भात, ज्वारीची आंबील, तांदळाची इडली, नाचणीची इडली, राजगिरा लाडू, ज्वारीचे अप्पे, गव्हाची पुरणपोळी, तांदुळाचा लाडू, नाचणीच्या पिठाचा लाडू, मसूर डाळीचे पकोडे, तांदुळाचे मोदक वाफेवरचे, ज्वारीचा पापड, गव्हाचा पापड, तांदळाचा पापड, नाचणीचा पापड, मेंदू वडे, गव्हाचा रोडगा, शेवग्याचे सूप, शेवग्याचा पराठा, शेवग्याची भाजी, नाचणीची इडली, तांदळाची खीर, मेथी पराठा, पालक पराठा, वांग्याची भाजी, शेवग्याचा सांभार, गव्हाचे मोदक, मके की रोटी, सरसो का साग, ज्वारीची भाकर, बाजरीची भाकर, नाचणीची भाकर, तांदळाची भाकर, नाचणीचा पराठा, तांदुळाची शेव, बाजरीची शेव, तांदुळाचे अनारसे, ज्वारीच्या खारोड्या तांदुळाच्या लाह्याचे लाडू, हरभऱ्याच्या हिरव्या पानाची भाजी, गव्हाच्या कणकेचे लाडू, बाजरीची चकली, तांदुळाची चकली, गव्हाचे मोदक, गव्हाचे सरगुंडे, गव्हाचे बटुळे, लुप्त होणारा पदार्थ, नाचणीची नानकटाई, बाजरीचे शंकरपाळे,बाजरीच्या चकल्या,गव्हाचे शिंगोळे,गव्हाचे गोड शंकरपाळे,गव्हाचे खारे शंकरपाळे,नाचणीचा डोसा, नाचणीचीपॅटीस,दही वडा, गिलावडा,मुंग पकोडे, समोसा, साधी पुरी, पाकातील पुरी ,लवकिचा पराठा, कचोरी, तांदूळ व डाळ डाळीची खिचडी, भिजवलेल्या हरभऱ्याचा झुणका. असे ६६वाण शाळे तर्फे सादर करण्यात आले, त्या व्यतिरिक्त शाळेचा परस बागेतील भाजीपाला सादर करण्यात आला.महत्वाची गोष्ट म्हणजे ज्या तृण धान्यापासून हे पदार्थ बनविण्यात ते सर्व धान्य प्रत्यक्ष सादर करण्यात आले. उदा. गहू, ज्वारी, नाचणी, तांदूळ,मका,बाजरा, भगर, कुटकी हे सर्व धान्य सादर केले होते. या तालुका स्तरीय पाककृती स्पर्धेमध्ये ९ केंद्रामधून एकूण १६ शाळांनी सहभाग नोंदविला. यामध्येपालकांनी , मुख्याध्यापकांनी तसेच स्वयंपाकी, मदतनीस यांनी तृणधान्यावर आधारित नाचणी मका, बाजरी, गहू इ. पासून विविध प्रकारचे पदार्थ, फोर्टीफाईड तांदुळापासून बनवलेले चवदार पदार्थ सुंदर रीतीने मांडणी करून स्टॉल सजविण्यात आले होते.

संगिता कराळे यांना व्दितीय बक्षिस मिळाल्या बद्दल भातकुली पं.स.चे गटविकास अधिकारी तुषार दांडगे, सहा गटविकास अधिकारी प्रविण वानखेडे, गटशिक्षणाधिकारी दिपक कोकतरे, शालेय पोषण आहार अधिक्षक नरेंद्र गायकवाड,गणोरी केंद्राच्या केंद्रप्रमुख निता सोमवंशी, सरपंच तथा शाळा व्यवस्थापण समिती सदस्य धर्मेंद्र मेहरे,शाळा व्यवस्थापण समिती अध्यक्ष रत्नदिप सवाई,उपाध्यक्ष प्रिया मानकर, मुख्याध्यापिका मिनाक्षी इंगळे, स.शि. राजेश सावरकर, गजानन येलोणे, प्रमोद कांबळे, अर्पणा झाडे सह पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

## घटना-घडामोडी



### हरसुल वृद्धाश्रमाला सेवानिवृत्त शिक्षकाकडून धम्मदान

**महागाव :** येथील ८१ वर्षीय सेवानिवृत्त शिक्षक हरीश भवरे यांनी दिग्रस तालुक्यातील हरसुल येथील नागसेन मानकर वृद्धाश्रमास नुकतेच एकवीस हजार रुपयांचे धम्मदान दिले. त्यांच्या स्मृतीशेष पत्नी, सामाजिक कार्यकर्त्या व महागाव ग्रामपंचायतीच्या माजी सदस्य वेणू भवरे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ हे दान देण्यात आले. यापूर्वीही भवरे यांनी चापर्डा येथील ज्ञानभूमीस त्यांच्या मातोश्री तुळसाबाई मारोतराव भवरे यांच्या स्मरणार्थ एकवीस हजारांचे धम्मदान दिले होते. याप्रसंगी हरसुल वृद्धाश्रमात नांदेड येथील प्रभाकर भगत, वंदना भगत, विजयराव भवरे तसेच वृद्धाश्रमाचे कर्मचारी उपस्थित होते. हरीश भवरे यांच्या या दातृत्वाने समाजासमोर एक चांगला आदर्श ठेवला आहे.



### महाराणा प्रतापसिंह यांची जयंती साजरी

**आर्णी :** येथील मातोश्री सुशिलाबाई नागपूरे वृद्धाश्रमात शुक्रवारी (दि. ९) महाराणा प्रतापसिंह यांची जयंती साधेपणाने साजरी करण्यात आली. डीजे व शोभायात्रा टाळून राजपूत समाज बांधवांनी वृद्धाश्रमातील वृद्धांना भोजन दिले. समाजातील गरजू व वंचितांना मदतीचा हात देण्याचा पायंडा त्यांनी जपला. यावेळी महाराणा प्रतापसिंह यांना अभिवादन करण्यात आले. वृद्धाश्रमाचे संचालक खुशाल नागपुरे, शैलेशसिंह जनवार, सुनिल ठाकूर, प्रफुलसिंह बघेल, अभिजीत बैस, राजेश श्रीवास, अतुल देशमुख, सोहम चंदेल, सुशांत शुक्ला, पंकज चंदेल, गोपाल शर्मा, निखिल ब्रम्हकार, अक्षय माहुरे, अमोल इंगोले, शुभम सुकाडीया, श्रावन चव्हाण, पिंटू चोपडे, अमय बंगिनवार, सूरज लाड, आकाश दीपेवार व इतर समाजबांधव उपस्थित होते.



### गटई कामगारांना छत्री व किटचे वाटप

**आर्णी :** राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे विदर्भ अध्यक्ष संभाजी वाघमारे यांनी मंगळवारी (दि. ६) येथे भेट दिली. यावेळी त्यांनी आर्णी गटई कामगारांना छत्री व किटचे वाटप केले. गुरु रविदास महाराज बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष सुधाकर वाडेकर, सचिव श्रीकांत वानखडे, उपाध्यक्ष अनिल खंडारे, कोषाध्यक्ष संतोष पाचखंडे, सदस्य मनोज माघाडे, गजानन गोडवे, राजू वाडेकर, विष्णू पिंगळे, राजेश विरुडकर व इतर सदस्य यावेळी उपस्थित होते. यानंतर वाघमारे यांनी पत्रकार मनोज माघाडे यांच्या मुलाच्या, कीयांशच्या वाढदिवस समारंभास उपस्थित राहून आशीर्वाद दिले व माघाडे परिवारास संत शिरोमणी रविदास महाराज यांची प्रतिमा भेट दिली.



### नेर येथे ३ दिवसीय श्रामणेर शिबिर

**नेर :** येथील मैत्री बौद्ध विहार चॅरिटेबल ट्रस्टच्यावतीने वटफळी (वटफळा) येथील महाबली बुद्ध विहारात रविवार (दि. ११) ते मंगळवार (दि. १३) मे २०२५ या कालावधीत तीन दिवसीय श्रामणेर शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. बुद्ध पौर्णिमेचे औचित्य साधून, आधुनिक युगातील मुला-मुलींना मानसिक, बौद्धिक व शारीरिक स्वास्थ्यासाठी तसेच बौद्ध धम्म तत्वज्ञान व संस्कृतीची ओळख करून देण्याच्या उद्देशाने हे शिबिर होत आहे. सात वर्षांवरील मुला-मुलींनी यात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. मार्गदर्शक भदंत अश्वघोष (थेरो), अध्यक्ष लक्ष्मण वानखडे व सचिव रुपेश मिसळे यांच्याशी नावनोंदणी व अधिक माहितीसाठी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### हळदीचे पोते लंपास

**उमरखेड :** हळदीचे पोते लंपास केल्याची घटना घडली. याप्रकरणी ट्रक वाहन क्र. एम.एच. २६ बीई ७२२६ यामध्ये ५९५ पोते हळदीचे भाडे घेवुन जात असतांना अज्ञात चोरट्याने त्यामधील १८ हळदीचे पोते किंमत ९०,००० रूपये चोरून नेले. याप्रकरणी खंडु मसनाजी वाघमारे यांच्या तक्रारीवरून अज्ञात चोरट्याविरूध्द गुन्हा नोंद केला. गेल्या काही दिवसांपासून उमरखेड तालुक्या चोरी, घरफोडी अशा घटनांमध्ये कमालीची वाढ झाली आहे.

# 'बांधवांनो, तुमचे व्यसन मला द्या'

## सत्यपाल महाराज : छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त प्रबोधनात्मक कार्यक्रम

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**महागाव, दि. ९ :** 'व्यसनामुळे कुटुंबांची वाताहत होत आहे, अनेक कुटुंबे देशोधडीला लागली आहेत. हे थांबवण्यासाठी व्यसनाधीन व्यक्तींनी माझ्यासमोर व्यसनाचा त्याग करावा, तुमचे व्यसन मला द्या,' असे कळकळीचे आवाहन राष्ट्रीय कीर्तनकार, सप्तखंजेरीवादक सत्यपाल महाराज यांनी महागाव येथील गावात आयोजित प्रबोधनात्मक कार्यक्रमात केले.

महागाव तालुका पत्रकार संघातर्फे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त सत्यपाल महाराज यांच्या प्रबोधनात्मक कीर्तनाचा आणि विविध सामाजिक कार्यकर्त्यांच्या सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तालुका जिनिंग प्रेसिंगचे अध्यक्ष, नगरसेवक संभाजीराव नरवाडे होते. कार्यक्रमास भाजप जिल्हा समन्वयक नितीन भुतडा, नगराध्यक्षा सुनंदा कोपरकर, उपनगराध्यक्ष प्रमोद भरवाडे, माजी जिल्हा परिषद सदस्य साहेबराव पाटील, काँग्रेस तालुकाध्यक्ष शिवाजीराव देशमुख, महेंद्र कावळे, अजय पुरोहित, राष्ट्रवादी काँग्रेस तालुकाध्यक्ष प्रवीण पाटील ठाकरे, माजी जिल्हा परिषद सदस्य अनिल नरवाडे, माजी नगराध्यक्षा करुणा शिरबिरे, महेश काळेश्वरकर, नरेंद्र जाधव, नितीन पेंशनवार, शिवसेना तालुका प्रमुख राजू राठोड, दीपक आडे, भाजप मंडळ अध्यक्ष योगेश वाजपेयी, श्रीधर भवानकर, 'पॉलिटिक्स स्पेशल'चे कार्यकारी संपादक यु.एन.वानखेडे, निजधाम संस्थेचे अध्यक्ष वानखेडे, प्रा. शरदचंद्र डोंगरे, विदर्भ जनआंदोलन समितीचे जगदीश नरवाडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. नवचैतन्य बाल मंडळाच्यावतीने मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. कैलास राऊत यांनी संचालन, महेश कामारकर यांनी प्रास्ताविक, तर रवी कावळे यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी पत्रकार संघाचे मार्गदर्शक रितेश पुरोहित, अध्यक्ष महेश कामारकर, उपाध्यक्ष किरण नरवाडे, सचिव रमेश देशमुख, मार्गदर्शक विजय सूर्यवंशी, संजय नागरगोजे, माजी अध्यक्ष संतोष जाधव, ज्ञानेश्वर ठाकरे, रवी कावळे, संजय पाटे, शेरखान पठाण, संजय नरवाडे, निलेश नरवाडे, विशाल डहाळे, विजय देशमुख, सागर नरवाडे, केतकी पांडे यांनी परिश्रम घेतले.

### 'कीर्तन महर्षी' किताबाने गौरव!

समाजातील अंधश्रद्धा, वाईट चालीरीतींवर प्रहार करत, शेतकरी आत्महत्या आणि व्यसनमुक्तीसाठी दशकांपासून प्रबोधन करणारे सत्यपाल महाराज यांच्या कार्याची दखल घेण्यात आली. त्यांच्या समाजप्रबोधनाच्या कार्यामुळे प्रभावित होऊन महागाव तालुका पत्रकार संघाच्या वतीने सर्व पदाधिकाऱ्यांच्याहस्ते त्यांना 'कीर्तन महर्षी' हा मानाचा किताब प्रदान करून त्यांच्या अमूल्य योगदानाचा सन्मान करण्यात आला. हा त्यांच्या कार्याचा यथोचित गौरव ठरला.

### समाजरत्नांचा सन्मान

या सोहळ्यात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांना पुरस्काराने गौरविण्यात आले. श्री एकवीरा देवी संस्थानला सामाजिक कार्यासाठी, अमृतराव देशमुख व विनोद मैंद यांना कृषीभूषण, कीर्ती राजेश चिंतामणी यांना तालुका भूषण, तर हभप तानाजी बापू यांना समाजभूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला. तसेच, एमबीबीएस पूर्ण केलेले डॉ. प्रद्युम्न सुधीर नरवाडे यांचाही सत्कार झाला.

# यवतमाळात रविवारी सामूहिक विवाह मेळावा

## १०८ जोडपी बांधणार लग्नगाठ; आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना मोठा आधार

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**यवतमाळ, दि. ९ :** निसर्गाच्या लहरीपणामुळे हवालदिल झालेल्या शेतकरी, शेतमजूर कुटुंबातील मुलामुलींचे विवाह कर्जबाजारीपणाशिवाय व्हावेत, या उदात्त हेतूने यवतमाळ येथे रविवार, दि. ११ मे रोजी श्री सत्यसाई सर्वधर्मीय सामूहिक विवाह सोहळा आयोजित करण्यात आला आहे. यात १०८ जोडपी विवाहबद्ध होतील.

भगवान श्री सत्यसाईबाबा यांच्या शतक जन्मोत्सवानिमित्त, सत चिकित्सा प्रसारक मंडळ आणि हृदय स्पंदना साई मेरू मठी ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने हा सोहळा हॉटेल व्हेनेशियन, जाम



बायपास रोड येथे सायंकाळी ६:४५ वाजता संपन्न होईल. यामध्ये आत्महत्याग्रस्त शेतकरी, आर्थिकदृष्ट्या दुर्बळ घटक आणि शेतमजूर कुटुंबातील मुलामुलींच्या विवाहांना प्राधान्य देण्यात आले आहे. समाजातील दानशूर व्यक्ती व सामाजिक संस्थांच्या देणगीतून जमा होणाऱ्या निधीतून सोहळ्याचा संपूर्ण खर्च केला जाणार आहे. आयोजकांतर्फे वर-वधूंना कपडे, मंगळसूत्र, संसारोपयोगी भांडी तसेच ७० वऱ्हाडींच्या भोजनाची सोय केली जाणार आहे. विवाह जोडप्यांच्या धर्मानुसार रितीरिवाजांप्रमाणे लावले जातील. सर्वधर्मीय पद्धतीने विवाह लावून धार्मिक एकतेचा संदेश देण्याचा प्रयत्न गेली ३१ वर्षे सातत्याने सुरू आहे. पात्र जोडप्यांना शासनाच्या कन्यादान योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठीही मदत केली जाते. हे विवाह संमेलन यशस्वीरीत्या पार पाडण्याकरता सर्वधर्मीय सामूहिक विवाह संमेलनाचे संयोजक डॉ. प्रकाश नंदुरकर यांच्या मार्गदर्शनात आयोजन समितीचे पदाधिकारी अजय मुंदडा, प्रकाश जाजू, सचिन जीरापुरे, प्रमोद बाविस्कर, कृपाल नेटके, पूनम जाजू, नीलिमा मंत्री, ज्योती बाविस्कर आदी परिश्रम घेत आहेत.

### मान्यवरांची उपस्थिती

सन १९९४ पासून सुरू असलेल्या या उपक्रमात हजारो जोडपी विवाहबद्ध झाली आहेत. यंदाच्या सोहळ्याला बेंगळूरुचे द्वारकानाथ स्वामी, माजी केंद्रीय राज्यमंत्री हंसराज अहीर, पालकमंत्री संजय राठोड, मंत्री डॉ. अशोक उईके, खासदार संजय देशमुख, आमदार बाळासाहेब मांगुळकर, देहू संस्थानाचे पुरुषोत्तम दत्तात्रेय मोरे महाराज, माणिकराव महाराज मोरे, डॉ. सतीश खोडे, डॉ. प्रकाश नंदूरकर आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

# पुसदच्या स्वप्निलचे बीएएमएसमध्ये सुवर्णयश

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**पुसद, दि. ९ :** येथील स्वप्निल नारायण चव्हाण याने सावंगी मेघे येथील दत्ता मेघे इन्स्टिट्यूटमधून बीएएमएस भाग एक परीक्षेत विद्यापीठात सर्वाधिक गुण मिळवित पंधरा वर्षांचा विक्रम मोडला आहे. या देदीप्यमान कामगिरीसाठी त्याला मंगळवारी (दि. ६) संस्थेच्या वतीने 'स्वर्गीय ट्विंकल निखाडे मेमोरियल गोल्ड मेडल' प्रदान करून गौरविण्यात आले.

स्वप्निल हा बंजारा काशी पोहरादेवी डेव्हलपर्सचे संचालक नारायण चव्हाण यांचा सुपुत्र असून, तो कोशटवार दौलतखान विद्यालयाचा माजी विद्यार्थी आहे. त्याने यापूर्वी शालांत परीक्षेतही प्रावीण्य मिळविले होते. आपल्या यशाचे श्रेय स्वप्निलने त्याचे




मोठे काका-काकू शंकर चव्हाण व ज्योती चव्हाण, आई-वडील नारायण चव्हाण व जया चव्हाण, प्रा. विशाल जाधव, पत्रकार जय राठोड आणि सर्व शिक्षकवृंदांना दिले आहे. त्याच्या या यशाने पुसद तालुक्यासह चव्हाण कुटुंबियांच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# मंगरुळमध्ये शिवार फेरीतून शेतकऱ्यांना मार्गदर्शन




**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**मंगरूळ, दि. ९ :** नेर तालुक्यातील मंगरूळ या गावामध्ये गुरुवारी (दि. ८) नानासाहेब देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाअंतर्गत (पोखरा योजना टप्पा दोन) शिवार फेरी काढण्यात आली.

यावेळी कृषी सहायक नगराळे यांनी शेतकऱ्यांना शेतात प्रत्यक्ष भेट देऊन हवामानाधारित शेती, पाणी अडविणे व जिरविणे, गावाचे नकाशे, पर्यावरण समतोल, हवामान बदल जनजागृती तसेच नैसर्गिक शेती यावर सखोल माहिती दिली. सरपंच पूजा प्रेमदास डोंगरे यांच्या नेतृत्वाखाली आणि कृषी सहायक नगराळे यांच्या मार्गदर्शनाखाली ही शिवार फेरी यशस्वी झाली. यामध्ये नागसेन प्रेमदास डोंगरे, प्रभुदास नंदा गवळी, अक्षय सूर्यवंशी, अंकुश राठोड, मनीष राठोड, सुनील खोब्रागडे, माजी पंचायत समिती सदस्य भीमराव खोब्रागडे, सुनील अलोन, नवनीत बारसे यांच्यासह गावातील बहुसंख्य शेतकरी सहभागी झाले होते.

# राळेगावात बांबूच्या ट्रकला अपघात

**राळेगाव, दि. ९ :** येथील राज्य महामार्ग ३६१ वर वडकीकडून यवतमाळकडे बांबू घेऊन जाणाऱ्या आयशर ट्रकने उभ्या असलेल्या ट्रकला मागून धडक दिल्याने आयशर ट्रक पलटी झाला. बुधवार (दि. ७) मे २०२५ रोजी सकाळी ७ वाजताच्या सुमारास ग्रामीण रुग्णालयासमोर ही घटना घडली. सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नाही व आयशर चालक सुखरूप आहे. मात्र, एम.एच. २१ एक्स ३७९५ क्रमांकाच्या आयशर ट्रकचे मोठे नुकसान झाले. त्याने एम.एच. ३४ बी.जी. २२८६ क्रमांकाच्या उभ्या ट्रकला धडक दिली. अपघातामुळे महामार्गाच्या मधोमध ट्रक पलटी झाल्याने काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती. पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून वाहतूक सुरळीत केली.

# राष्ट्रनिर्मितीत श्रमिकांचे योगदान महत्त्वपूर्ण

## डॉ. प्रवीण बनसोड : राणी अमरावती येथे व्याख्यानाचे आयोजन

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**बाभूळगाव, दि. ९:** ही पृथ्वी शेषाच्या फणीवर नसून श्रमिकांच्या हातावर तरली आहे. या अण्णाभाऊ साठे यांच्या वाक्याने श्रमिकांच्या श्रमाचे महत्त्व विशद केले असून राष्ट्रनिर्मितीत श्रमिकांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे, असे मत डॉ. प्रवीण बनसोड यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र दिन व कामगार दिनाचे औचित्य साधून तालुक्यातील राणी-अमरावती येथे अखिल भारतीय किसान सभेच्या वतीने व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास डॉ. प्रवीण बनसोड प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून शजमीर बेग मिर्झा, गुलाबराव उमरतकर यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी श्रीकृष्ण परोपटे होते.



उपसरपंच इमरान काझी, गजेश फाळे, दुर्गेश राऊत, सुधाकर खडतकर, नरेश जीरापुरे, संजय दातार यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. प्रमुख वक्ते डॉ. प्रवीण बनसोड यांनी पुढे, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा जोतिराव फुले, छत्रपती शाहू महाराज तसेच बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्यावर प्रकाशझोत टाकला. शेतकरी व कामगार यांच्या समन्वयातून राष्ट्र उभारणी होऊ शकते, असे सांगितले. अध्यक्षीय भाषणात श्री. परोपटे यांनी, 'सर्व धर्मातील नवीन पिढीतील युवकांनी समतेने राहण्याचा सल्ला दिला.' कार्यक्रमाचे संचालन संदेश कावलकर यांनी केले. किसान सभेचे जिल्हा सचिव गुलाबराव उमरतकर यांनी प्रास्ताविक केले. पांडुरंग भुसारी यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी उमेश दातार, निखिल चांदोरे, नीलेश केवटे, शेखर मेंढे, प्रमोद उईके, संजय वाघाडे, संजय गावंडे, देवानंद जाधव, जयवंत उमरतकर, राजू डहाके, शुभम तिखे, महेश उमरतकर व अमर दातार आदींनी पुढाकार घेतला.

# मुस्लिम तेली समाजाचा अभूतपूर्व विवाह सोहळा

## २४ नवदांपत्ये विवाहबंधनात, शहर पोलिस लाईनवर ५३ गोत्रांचा महासंगम, सामाजिक एकोप्याचे दर्शन

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**यवतमाळ, दि. ९ :** शहर पोलिस लाईनवर नुकताच मुस्लिम तेली समाजाचा ५३ गोत्र मेळावा आणि भव्य सामूहिक विवाह सोहळा अभूतपूर्व उत्साहात संपन्न झाला. या ऐतिहासिक सोहळ्यात समाजातील २४ जोडपी मोठ्या संख्येने उपस्थित ज्ञातीबांधव आणि मान्यवरांच्या आशीर्वादाने विवाहबद्ध झाली.

या दिमाखदार सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी संयोजन समितीने अथक परिश्रम घेतले. यामध्ये प्रामुख्याने मोहम्मद शफी



चिकटकर, हाजी रौफभाई लखानी, मोईन मलनस, शाकीर जिंद्रान तसेच बजा ग्रुपचे सदस्य अफरोज सोलंकी, सलीम गोरी, अशपाक सोलंकी, अकबर मलनस, अन्सार जिंद्रान, शब्बु मलनस आणि आदिली मेमन खालील यांनी महत्वाची भूमिका बजावली. मेळाव्याला केवळ यवतमाळ शहरातूनच नव्हे, तर हैदराबाद, छत्तीसगड, इंदोर, जबलपूर, अकोला, चंद्रपूर, नागपूर, पुणे, मुंबई, हिंगणघाट, दिग्रस, नांदेड, औरंगाबाद आणि अगदी तिरुपतीसारख्या दूरदूरच्या शहरांमधूनही समाजबांधवांनी उत्स्फूर्तपणे मोठ्या संख्येने उपस्थिती लावून कार्यक्रमाची शोभा वाढवली. नवचैतन्य बाल मंडळाच्यावतीने मान्यवरांचे स्वागत करण्यात आले, तर स्वागत समारंभाची धुरा दादुभाई पेंटर आणि हाजी सलीमभाई सोलंकी यांनी सांभाळली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान आझादभाई बागवान यांनी भूषवले. त्यांच्या समयोचित अध्यक्षीय भाषणाने उपस्थितांची मने जिंकली. सोहळ्यादरम्यान, मौलाना याकुब मिया, हाजी मुस्तकिम पटेल, एजाज पहेलवान, नासीर शेखानी, फिरोज शेख, जावेद पटेल यांसारख्या मान्यवरांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. या विवाह सोहळ्यामुळे समाजातील गरीब व गरजू कुटुंबांना मोठा आधार मिळाला असून, अशा उपक्रमांची समाजाला नितांत गरज असल्याचे मत अनेकांनी व्यक्त केले. मोहम्मद शफी चिकटकर यांचा त्यांच्या विशेष योगदानाबद्दल सत्कार करण्यात आला, या प्रसंगी त्यांनी समाजाच्या मार्गदर्शनामुळेच हे कार्य शक्य झाल्याची भावना व्यक्त केली. कार्यक्रमात अली विहान आणि मेरूळपूरचे शेख शराफतअली यांनी उपस्थितांना मोलाचे मार्गदर्शन केले, ज्यातून समाजाला नवी दिशा मिळाली. सामाजिक कार्याबद्दल मोहम्मद शफी चिकटकर यांचा विशेष गौरव करण्यात आला. गफारभाई पठाण आणि इलियास गफार गणाई यांनी उपस्थितांचे आणि यशस्वीतेसाठी झटलेल्या सर्वांचे आभार मानले. आयोजन समितीच्या असंख्य कार्यकर्त्यांनी या सोहळ्यासाठी अथक परिश्रम घेतले.

## थोडक्यात

### जिल्हा काँग्रेसचे आजचे आंदोलन स्थगित

**यवतमाळ :** जिल्हा काँग्रेस कमिटीने शनिवार, दि. १० मे २०२५ रोजी आयोजित केलेले जनआंदोलन भारत-पाकिस्तान युद्धासदृश परिस्थितीमुळे आणि सीमेवरील तणावाच्या पार्श्वभूमीवर तत्काळ स्थगित केले आहे. देशहिताला सर्वोच्च प्राधान्य देत, सध्या संपूर्ण देशाने एकजुटीने सैन्याच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याची गरज असल्याचे जिल्हाध्यक्ष प्रफुल्ल मानकर यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

### युवकावर काठीने हल्ला

**यवतमाळ :** युवकावर काठीने हल्ला केल्याची घटना घडली. याप्रकरणी युवक घटनास्थळावर फोनवर बोलत असताना अज्ञात आरोपीने अचानक युवकाच्या मागुन येवुन चेहऱ्यावर पोते टाकुन काठीने मारहाण करून जखमी केले. ही घटना ८ मे ला घडली. याप्रकरणी अजय रमेश माहुरे (२२) यांच्या तक्रारीवरून अज्ञात चोरट्याविरूध्द गुन्हा नोंद केला.

### जुन्या भांडणातून वाद

**बाभुळगाव :** जुन्या भांडणातुन वाद केल्याची घटना घडली. याप्रकरणी एकाच गावातील रहीवासी असणाऱ्यामध्ये जुन्या भांडणाच्या कारणावरून वाद करून शिविगाळ केली व जिवाने मारण्याची धमकी दिली. तसेच जमिनीवर आपटल्याने कपाळळाच्या उजव्या बाजुला लागल्याने इसम जखमी झाला. याप्रकरणी सतीश मनोहर राठोड यांच्या तक्रारीवरून अश्विन माणिक राठोड विरूध्द गुन्हा नोंद केला.

### दारूच्या नशेत धिंगाणा

**कळंब :** दारूच्या नशेत धिंगाणा केल्याची घटना घडली. याप्रकरणी दारूच्या नशेत विनाकारण शिविगाळ करून जिवाने मारण्याची धमकी देवून काठीने डोक्यावर मारून जखमी केले. ही घटना ७ मे रोजी घडली. याप्रकरणी प्रदीप गुणवंत नन्नावरे यांच्या तक्रारीवरून गौरव रंजन चौधरी, भग्या प्रमोद चौधरी, पप्या विरूध्द गुन्हा नोंद केला.

### जेवणाच्या बिलातून वाद

**दारव्हा :** जेवणाच्या बिलातुन वाद केल्याची घटना घडली. याप्रकरणी जेवणाचे बिल मागितले असता बिल देण्याच्या कारणावरून वाद करून शिविगाळ केली व जिवे मारण्याची धमकी देवून लाथाबुक्याने मारहाण करून डोके फोडुन जखमी केले. याप्रकरणी तुषार सुरेश वझरकर यांच्या तक्रारीवरून निलेश सुरेश दुधे, तुषार भेंडे विरूध्द गुन्हा नोंद केला.

# अवैध गोवंश वाहतुकीचा पर्दाफाश

## देवधारी घाटात पोलिसांची मोठी कारवाई; आयशर ट्रकमधून २४ जनावरांची सुटका

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**राळेगाव, दि. ९ :** नागपूर-हैदराबाद राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४४ वर देवधारी घाटात, वडकी पोलिसांनी आज (शुक्रवारी) दुपारी धडक कारवाई करत गोवंशाची अवैध वाहतूक करणारे दोन आयशर ट्रक पकडले. या कारवाईत २४ बैलांची सुटका करण्यात आली असून, तिघांना अटक करण्यात आली आहे. या कारवाईत ४४ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



### थरारक पाठलाग: एक चालक पसार, दुसरा जाळ्यात!

- पोलिसांनी दोन्ही आयशर ट्रक तपासणीसाठी थांबविल्यानंतर, एमएच ४० सीटी ८८६४ क्रमांकाच्या ट्रकचालकाने संधी साधून ट्रकसह पळ काढण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी तत्काळ त्याचा पाठलाग सुरू केला. अखेर वेडशी गावाजवळ हा ट्रक अडवण्यात पोलिसांना यश आले. मात्र, या ट्रकचा चालक अंधाराचा फायदा घेऊन पळून जाण्यात यशस्वी झाला, तर दुसऱ्या ट्रकचालकासह इतर दोघांना पोलिसांनी अटक केली.

नागपूर-हैदराबाद राष्ट्रीय महामार्गावरून सातत्याने जनावरांची तस्करी होत असल्याची माहिती पोलिसांना मिळत होती. याच पार्श्वभूमीवर ठाणेदार सुखदेव भोरकडे आणि त्यांच्या पथकाने देवधारी घाटात नाकाबंदी केली. दुपारी सुमारे अडीच वाजताच्या सुमारास नागपूरकडून हैदराबादकडे जाणारे दोन आयशर ट्रक (एमएच ४० बीजी ७९८७ आणि एमएच ४० सीटी ८८६४) तपासणीसाठी थांबवले. या दोन्ही ट्रकमध्ये प्रत्येकी १२ याप्रमाणे एकूण २४ गोवंशीय बैल अत्यंत निर्दयतेने कोंबून, कोणत्याही चाऱ्या-पाण्याची सोय न करता अवैधपणे वाहतूक करत असल्याचे निदर्शनास आले. पोलिसांनी तत्काळ दोन्ही ट्रक आणि त्यातील जनावरे ताब्यात घेतली. अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये अब्दुल सादिक जाकीर (वय २२, रा. नागपूर), आशिक शेख फारुख (वय ३७, रा. नागपूर) आणि मोहम्मद जावेद खान (वय ३७) यांचा समावेश आहे. त्यांच्याविरुद्ध महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम कलम ५, ५(अ), ५(ब) तसेच प्राण्यांना क्रूरतेने वागवण्यास प्रतिबंध अधिनियम कलम ११ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास वडकी पोलिस करत आहेत. या कारवाईमुळे अवैध प्राणी वाहतूक करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

# शहरातील जीर्ण इमारती अपघातांना आमंत्रण

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**✦ जय राठोड**

**दिग्रस, दि.९ :** शहरातील जामा मशीद आणि कमान गेट परिसरातील अनेक जुन्या, जीर्ण झालेल्या इमारती मोठ्या अपघातांना निमंत्रण देत आहेत. या धोकादायक वास्तूंमुळे नागरिकांच्या जिवाला धोका निर्माण झाला असून, पालिका प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज निर्माण झाली आहे.

दिग्रस शहरातील जामा मशीद आणि कमान गेट परिसर हा अत्यंत वर्दळीचा भाग आहे. येथे खासगी शाळा, वाचनालय, मशीद, मंदिर, किराणा दुकाने, भाजीपाला बाजार, फळविक्रेते, सराफा लाइन तसेच कापड दुकाने असल्याने दिवसभर नागरिकांची मोठी ये-जा असते. याच परिसरात अनेक दुमजली जुन्या इमारती उभ्या आहेत. यापैकी बऱ्याचशा इमारती सुमारे शंभर वर्षे जुन्या असल्याचे



सांगितले जाते. त्यांच्या बांधकामात वापरलेले लाकूड आता जीर्ण झाले असून, विटांचे बांधकामही कमकुवत झाले आहे. काही संकुलामध्ये लाकडी छताच्या आणि विटांनी बनवलेल्या या जर्जर इमारती कधीही कोसळू शकतात, अशी भीती व्यक्त होत आहे. स्थानिक नगर परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांनी या गंभीर बाबीकडे तातडीने लक्ष देऊन, शहरातील सर्व जीर्ण आणि धोकादायक इमारतींचे सर्वेक्षण करावे. ज्या इमारती अत्यंत धोकादायक स्थितीत आहेत, त्या त्वरित पाडण्यात याव्यात, अशी जोरदार मागणी केली जात आहे.

# शिवसेनेचा ट्रॅक्टर मोर्चा स्थगित

## राजेंद्र गायकवाड यांची माहिती, सैन्यदलांना ताण येऊ नये म्हणून निर्णय

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**यवतमाळ, दि. ९ :** शेतकरी कर्जमाफीच्या मागणीसाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने शुक्रवारी (दि. ९) आयोजित केलेला भव्य ट्रॅक्टर मोर्चा देशातील युद्धजन्य परिस्थितीमुळे स्थगित करण्यात आला आहे. या स्थितीत एकसंघ राहणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन शिवसेना संपर्क प्रमुख राजेंद्र गायकवाड यांनी केले.

येथे पत्रकार परिषदेत गायकवाड यांनी सांगितले की, सध्या देशाला एकदिलाने राहण्याची गरज असून, सैन्य व पोलिसांना सतर्कतेच्या सूचना आहेत. शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची आठवण करून देणारा हा पूर्वनियोजित मोर्चा, देशाच्या सुरक्षेला प्राधान्य देत



व सुरक्षा दलांवरील ताण टाळण्यासाठी स्थगित केला आहे. शिवसेना नेते अरविंद सावंत, खासदार संजय देशमुख, खासदार नागेश पाटील-आष्टीकर, आमदार संजय देरकर, माजी आमदार श्रीकांत मुनगीनवार उपस्थित राहणार होते. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी नागरिकांना दक्ष राहण्याचे आवाहन केले असून, गरज भासल्यास शिवसेना राष्ट्रकार्यासाठी, जखमी सैनिकांसाठी रक्तसंकलनासह अन्य मदतीस सज्ज राहील. पत्रकार परिषदेस जिल्हा प्रमुख प्रवीण शिंदे, किशोर इंगळे, माजी नगराध्यक्ष बाळासाहेब चौधरी, उपजिल्हाप्रमुख प्रवीण पांडे, गजानन पाटील, विकास पवार, चंद्रकांत उडाखे, कमल मिश्रा उपस्थित होते.

### आजपासून उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण शिबिर

**यवतमाळ, दि. ९ :** जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व विविध जिल्हा क्रीडा संघटनांच्या संयुक्त विद्यमाने यवतमाळ येथे शनिवार, दि. १० मे ते मंगळवार, दि. २० मे २०२५ या कालावधीत नि:शुल्क उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर सकाळी ६ ते ८ व सायंकाळी ६ ते ८:३० या वेळेत होणार आहे. यात मल्लखांब व रोप मल्लखांबचे प्रशिक्षण किसन प्रजापती व मनोज राठोड, योगासनाचे वंशिक वडे, जिम्नॅस्टिक्सचे गजभिये, तर जंप रोपचे प्रशिक्षण प्रशांत चौधरी देतील. राष्ट्रीय खेळाडूंद्वारे हे प्रशिक्षण दिले जाईल. शिबिराचे आयोजन जिल्हा क्रीडा गुणवत्ता मार्गदर्शक तसेच कबड्डी व राष्ट्रीय क्रीडा रत्न पुरस्कार प्राप्त संजय सातारकर यांनी केले आहे.

# रखडलेल्या कामांना गती द्या!

## ॲड. विजय भूरे : निम्न पैनगंगा प्रकल्प समर्थकांचा आक्रमक पवित्रा

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**यवतमाळ, दि. ९ :** यवतमाळ-नांदेड सीमेवरील निम्न पैनगंगा प्रकल्पाच्या समर्थनार्थ आता प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. काही विरोधकांमुळे मागील २०-२५ वर्षांपासून रखडलेल्या या प्रकल्पाला गती मिळावी, अशी जोरदार मागणी घाटंजीचे निम्न पैनगंगा प्रकल्प, निर्माण समस्या निर्वाण आणि पुनर्वसन कल्याणकारी संस्थेचे अध्यक्ष ॲड. विजय भूरे यांनी केली आहे. अन्यथा तिव्र आंदोलन करण्याचा इशाराही त्यांनी यावेळी दिला.

प्रकल्प समर्थकांचे म्हणणे आहे की, अनेक वर्षांपूर्वी सर्व स्तरांवर मान्यता मिळूनही केवळ काही लोकांच्या विरोधामुळे प्रकल्पाचे काम वारंवार थांबत आहे. यामुळे प्रकल्पांतर्गत



येणाऱ्या शेतकऱ्यांची आणि नागरिकांची आर्थिक पिळवणूक होत आहे. शासन प्रकल्पाला गती देण्यास तयार असले, तरी विरोधकांच्या धोरणामुळे काम संथ गतीने सुरू आहे. परिणामी, अंदाजे २५ वर्षांपासून या भागातील शेतजमिनींचे खरेदी-विक्री व्यवहार ठप्प असून, जमिनीला योग्य भाव मिळत नाही व विकासकामेही रखडली आहेत. अनेक शेतकऱ्यांना जमीन अधिग्रहण होऊनही प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्रे वेळेत न मिळाल्याने त्यांच्या मुलांच्या शासकीय नोकरीच्या संधी हुकल्या. आता पुढील पिढीचे नुकसान टाळण्यासाठी प्रकल्पाला गती देण्याची मागणी घाटंजीचे निम्न पैनगंगा प्रकल्प, निर्माण समस्या निर्वाण आणि पुनर्वसन कल्याणकारी संस्थेचे अध्यक्ष ॲड. विजय भूरे, सचिव रफिक पटेल, माजी सरपंच बळीराम राठोड, विठ्ठलराव नाईक, ॲड. धीरज बन्सोड, यांनी केली आहे. स्थानिक धरणग्रस्तांना शासन आणि विरोधकांच्या संघर्षात नाहक त्रास सहन करावा लागतोय. त्यामुळे, धरण समर्थक आता एकजूट होऊन प्रकल्पाच्या शीघ्र पूर्ततेसाठी आग्रही झाले आहेत. विरोधकांना अनेक बुडीत क्षेत्रांतील गावांमध्ये प्रवेश करण्यासही स्थानिकांकडून विरोध होत असल्याचे चित्र आहे. येत्या काळात सर्व समर्थकांना एकत्र करून प्रकल्पाला गती देण्यासाठी मोठे आंदोलन उभारण्याचे नियोजन असल्याचे या शेतकऱ्यांनी म्हटले आहे.

# धरणविरोधी समितीने धरणाचे काम बंद पाडले

## खंबाळा येथील आंदोलनात विदर्भ-मराठवाड्यातील धरणग्रस्त शेतकरी सहभागी

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**महागाव, दि. ९:** पाटबंधारे विभागाने निम्न पैनगंगा प्रकल्पाचे काम बुधवारी, दि. ७ मे रोजी सुरू केल्याची माहिती मिळताच, बुडीत क्षेत्रातील संतप्त झालेल्या धरण विरोधी संघर्ष समितीचे पदाधिकारी व शेतकऱ्यांनी गुरुवारी, दि. ८ मे रोजी खंबाळा येथे धडक देत सुरू असलेले काम बंद पाडले.



महागाव तालुक्यातील खंबाळा येथे पाटबंधारे विभागाने बुधवारी धरणाच्या कामाला सुरुवात केली होती. ही बाब समजताच निम्न पैनगंगा धरण विरोधी संघर्ष समिती (विदर्भ-मराठवाडा) आणि शेतकरी आक्रमक झाले. गुरुवारी सकाळी दहा वाजता समितीचे अध्यक्ष प्रल्हादराव पाटील जगताप, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष तथा समितीचे प्रसिद्धी प्रमुख व संघटक सचिव मुबारक तंवर यांच्या नेतृत्वात प्रल्हादराव गावंडे, बंडू नाईक, विजय पाटील राऊत, विजय समगिरे, बंटी पाटील जोमदे, नीलेश कुमरे, माणिक कोवे, गुलाब मेश्राम, विजय पाझारे, गजानन डाखोरे, जयराम मिश्रा, विठ्ठलराव अडकिने, विलास गावंडे, उत्तमराव भेंडे, अतुल वानखेडे, पंजाबराव जगताप, विष्णू गावंडे, बंडू कुलसंगे, रवी भोंगडे, सुभाष मिरासे, प्रमोद जगताप, रितेश राऊत, कैलास देशमुख, संतोष बोटारे यांच्यासह अनेक धरणविरोधी कार्यकर्ते आणि शेतकऱ्यांनी घटनास्थळी पोहोचून धरण रेषेचे काम बंद पाडले. यावेळी कोणताही अनुचित प्रकार घडला नाही. निम्न पैनगंगा प्रकल्पाचे अभियंता पवार, मांडवी पोलिस ठाण्याचे ठाणेदार शेख, माहूर पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक शिवप्रकाश मुळे आणि सिंदखेडचे सहायक पोलिस निरीक्षक रमेश जाधव यांनी मोठ्या प्रमाणावर पोलिस बंदोबस्त ठेवला होता. या आंदोलनामुळे परिसरातील वातावरण काही काळ तणावपूर्ण झाले होते.

### जिल्हा बँकेची सहकार परिषद स्थगित

**यवतमाळ, दि. ९:** आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष २०२५ निमित्त यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतर्फे शनिवार, दि. १० मे रोजी आयोजित केलेली सर्वपक्षीय सहकार परिषद सध्याच्या युद्धजन्य परिस्थितीमुळे स्थगित करण्यात आली आहे. परंतु, बँकेचे अध्यक्ष मनीष पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित रोगनिदान व चिकित्सा शिबिर शनिवार, दि. ० मे रोजी सकाळी दहा ते दुपारी दोन वाजेपर्यंत दारव्हा मार्गावरील कोल्हे सभागृहात आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरात नाक, कान, घसा, डोळे, हृदय, उच्च रक्तदाब आणि रक्त तपासणीची सोय उपलब्ध असेल. नागरिकांनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक समिती, सहकार परिषद व स्वर्गीय उत्तमराव पाटील मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटी यवतमाळ यांनी केले आहे.

# आदर्श शिक्षिका ज्योती राठोड प्रथम पारितोषिकाने सन्मानित



**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**यवतमाळ, दि.९ :** महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणेतर्फे आयोजित राज्यस्तरीय दर्जेदार शैक्षणिक व्हिडिओ निर्मिती स्पर्धेत आर्णी तालुक्यातील तळणी येथील जिल्हा परिषद शाळेतील शिक्षिका ज्योती राठोड यांनी प्रथम पारितोषिक पटकावले. 'झरपाडा' या आदिवासी समाज जीवनावरील त्यांच्या व्हिडिओला हा बहुमान मिळाला आहे.

विद्यार्थ्यांना अधिक दर्जेदार ज्ञान मिळावे, या उद्देशाने ही स्पर्धा मागील वर्षी घेण्यात आली होती. यवतमाळ जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेत झालेल्या पुरस्कार वितरण समारंभात माध्यमिक शिक्षणाधिकारी डॉ. जयश्री राऊत यांच्या हस्ते ज्योती राठोड यांना दहा हजार रुपये, प्रशस्तिपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. यावेळी 'डायट'चे प्राचार्य डॉ. प्रशांत गावंडे अध्यक्षस्थानी, तर ज्येष्ठ अधिव्याख्याता व स्पर्धेचे समन्वयक डॉ. देवानंद सावरकर, ज्येष्ठ अधिव्याख्याता डॉ. राऊत, डॉ. मधुमती सांगळे, डॉ. वायवाळ, किरण रापर्तीवार, गटशिक्षणाधिकारी इक्बाल, आनंद कसंबे, लिचडे आदी उपस्थित होते. जिल्ह्यातून ८६ व्हिडिओ सहभागी झाले होते.

# पाणी स्त्रोतांची शंभर टक्के तपासणी करा

## सीईओ मंदार पत्की : जिल्ह्यात मान्सूनपूर्व पाणी गुणवत्ता तपासणी अभियानाला सुरुवात

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**यवतमाळ, दि. ९ : ग्रामीण भागात शुद्ध पाणीपुरवठा करण्यासह नागरिकांचे आरोग्य उत्तम राखण्यासाठी ग्रामपंचायतींनी पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांची शंभर टक्के रासायनिक व जैविक तपासणी करावी, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की यांनी केले आहे. जिल्ह्यात मान्सूनपूर्व पाणी गुणवत्ता तपासणी अभियान सुरू झाले आहे.**





> **नागरिकांचे आरोग्य जपण्यासाठी प्रत्येक ग्रामपंचायतीने पाणी तपासणी करणे बंधनकारक आहे. पाणी गुणवत्ता सनियंत्रण व सर्वेक्षण कार्यक्रमांतर्गत सुरू झालेल्या या मोहिमेत रासायनिक व जैविक तपासणी यशस्वीपणे पूर्ण करावी.**
>
> **मंदार पत्की, मुख्य कार्यकारी अधिकारी**

जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यातील पाणी स्त्रोतांची नियमित तपासणी आवश्यक आहे. ग्रामस्तरावर पिण्याच्या पाण्यात नायट्रेट, फ्लोराईडचे वाढते प्रमाण गंभीर असून, त्यामुळे कायमचे अपंगत्व येऊ शकते. तसेच, जैविकदृष्ट्या दूषित आणि नियमित निर्जंतुकीकरण न केलेल्या पाण्यामुळे साथीचे रोग पसरून जीवितहानीही होऊ शकते. ३० जूनपर्यंत चालणाऱ्या या अभियानात प्रत्येक तालुक्यातून दररोज प्रत्येकी २० रासायनिक व जैविक पाणी नमुने घेतले जात आहेत. हे नमुने केंद्र शासनाच्या पोर्टलवर नोंदवल्यानंतरच तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठवले जातात. तालुकास्तरावरील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी ही तपासणी शंभर टक्के पूर्ण करावी आणि यात कुणाकडूनही दुर्लक्ष होणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे स्पष्ट निर्देश प्रकल्प संचालक प्रकाश नाटकर यांनी दिले आहेत. या अभियानाचा मुख्य उद्देश ग्रामीण भागातील नागरिकांना सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे हा आहे, जेणेकरून त्यांचे आरोग्यमान उंचावेल व पाण्यामुळे होणाऱ्या आजारांना प्रतिबंध बसेल.

# गौण खनिज तस्करांना महसूलचा दणका

## तीन ट्रॅक्टर जप्त; अवैध रेती, मुरूम वाहतूक करणाऱ्यांवर कारवाई

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**महागाव, दि. ९:** तालुक्यात फोफावलेल्या गौण खनिज तस्करीला आळा घालण्यासाठी महसूल प्रशासनाने आक्रमक पवित्रा घेतला आहे. गुरुवारी, दि. ८ मे रोजी रात्री उशिरापर्यंत केलेल्या धडक कारवाईत रेती व मुरुमाची अवैध वाहतूक करणारे तीन ट्रॅक्टर जप्त करण्यात आले आहेत.



उपविभागीय अधिकारी सखाराम मुळे आणि तहसीलदार अभय मस्के यांच्या मार्गदर्शनात ही कारवाई करण्यात आली. अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतुकीतून पैसा कमावण्याचा धंदा फोफावला असून, यात विविध क्षेत्रांतील व्यक्तींचा सहभाग असल्याचे दिसून येते. काही राजकीय व्यक्तींचे तस्करांना संरक्षण असल्याचीही बाब लपून राहिलेली नाही. तहसीलदार अभय मस्के यांनी या अवैध धंद्यात स्थिर झालेल्या तस्करांचे अड्डे उद्ध्वस्त करण्याचा संकल्प केला आहे. गुरुवारी रात्री केलेल्या कारवाईमुळे तालुक्यातील गौण खनिज माफियांचे धाबे दणाणले आहेत. उटी शिवारात नारायण मारोती नवघरे यांच्या ट्रॅक्टरमधून रेतीची तस्करी होत असताना रात्री आठच्या सुमारास तहसील पथकाने ते वाहन ताब्यात घेतले. त्यानंतर, सवना शिवारात दोन ट्रॅक्टरमधून मुरुमाची अवैध वाहतूक होत असल्याची माहिती मिळाल्यावर पथकाने रात्री साडेदहाच्या सुमारास धाड टाकून दोन्ही वाहने जप्त केली. ही सर्व वाहने तहसील कार्यालयाच्या प्रांगणात लावण्यात आली आहेत. याप्रकरणी संबंधितांवर दंडात्मक व फौजदारी कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती महसूल प्रशासनाने दिली. ही मोहीम यशस्वी करण्यासाठी नायब तहसीलदार जी.एम. राठोड, मंडळ अधिकारी राम पंडित, मंडळ अधिकारी गोविंद ठाकरे, ग्राम महसूल अधिकारी संजय धुळे, महसूल सहायक नीलेश मुकाडे, भगवान गरडे, आकाश कन्नाके, विजय पोटे, सूरज लोणकर, नीलेश आखडकर, शंकर चव्हाण, दीपक वैरागडे यांनी परिश्रम घेतले.